CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह


**आजचा सामना**
MUMBAI INDIANS VS DELHI CAPITALS
मुंबई इंडियन्स वि. दिल्ली कॅपिटल्स्
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : वानखेडे स्टेडियम, मुंबई

सोलापूर | बुधवार, २१ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १९२ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आम्ही केवळ कोणत्याही विशिष्ट समुदायाची किंवा वर्गाची सेवा करण्यास नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राची सेवा करण्यास वचनबद्ध आहोत. प्रत्येक भारतीयाला भारतमातेचे पुत्र असल्याचा अभिमान वाटण्याचा अनुभव प्राप्त करून द्यावा, अशी आमची प्रतिज्ञा आहे.
**- पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष, भारतीय जनसंघ

# राज्यभर मुसळधार पावसाची हजेरी

## सोलापुरात सलग चौथ्या दिवशी पावसाची हजेरी | पुण्यात पाणीच पाणी, अनेक दुचाकी गेल्या वाहून | विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने नागरिकांची तारांबळ

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २० मे**

राज्यातील अनेक जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाने जोरदार हजेरी लावली. यामुळे विविध भागांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. कुठे झाडं कोसळली, कुठे मोबाईल टॉवर जमीनदोस्त झाला, तर कुठे पत्र्याची छते उडाली. काही ठिकाणी वीज पडून जनावरांचा मृत्यू झाल्याचीही माहिती समोर आली आहे. या अवकाळी पावसाने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडवली आहे.

मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी, नाशिक अशा प्रमुख जिल्ह्यांसह कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्यात पावसाने झोडपले आहे. काही भागांत पूरपरिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. नागरिकांनी सुरक्षित राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच, हवामान विभागाने पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. मुंबईच्या पश्चिम उपनगरांत सायंकाळी पावसाला सुरुवात झाली. अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, भागांत मुसळधार पाऊस सुरू आहे.

**रत्नागिरीत पावसामुळे रेल्वेसेवेवरही परिणाम**

दुसरीकडे, रत्नागिरी जिल्ह्यातही पावसाने कहर केला असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. अवकाळी पावसाचा परिणाम रेल्वेसेवेवरही दिसून आला आहे. मुंबईकडे जाणाऱ्या जनशताब्दी एक्स्प्रेस व तेजस एक्स्प्रेस या गाड्या नियमित वेळेपेक्षा दोन तास उशिराने धावत आहेत.

**नाशिकमध्ये झाड उन्मळून पडले**

नाशिक जिल्ह्यात सायंकाळपासून सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस सुरू आहे. या पावसामुळे कॉलेज रोडसह





अन्य भागांत झाडे उन्ममळून पडल्याच्या घटना समोर आल्या आहेत. यामध्ये अनेक वाहनांचे नुकसान झाले असले तरी सुदैवाने जीवितहानी टळली. विद्युत पुरवठ्यावर मात्र मोठा परिणाम झाला असून अनेक भागांत वीजपुरवठा खंडित झाला आहे.

**बार्शीमध्ये शेड कोसळले, १ जखमी**

सोलापूर जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली आहे. बार्शीमध्ये पावसामुळे कॅन्टीनचे पत्र्याचे छत कोसळल्याची दुर्घटना घडली. यामध्ये एक व्यक्ती जखमी झाली असून पाच जणांना आपत्ती व्यवस्थापन पथकाने सुखरूप बाहेर काढले.

### सोलापुरात दोन दिवसात १६ मिलीमीटर पावसाची नोंद

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात मंगळवारी दुपारीच दोनच्या सुमारास वातावरणात बदल होवून मेघगर्जना सुरू झाल्या आणि रात्री उशिरापर्यंत अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या. दरम्यान, गेल्या आठवड्यापासूनच पावसाने सुरूवात केल्याने तापमानातही कमालीची घट आली असून, मे महिन्याच्या पंधरवड्यापासूनच यंदा पावसाळा सुरू झाला असल्याने जाणकार नागरिकांतून आश्चर्य व्यक्त होत आहे. सोमवारी ८.९ मिलीमीटर पावसाची तर मंगळवारी सायंकाळी ५.३० पर्यंत ७.२ मिलीमीटर पावसाची नोंद हवामान ख्यातात झाली आहे.

### मंगळवेढयात विजांच्या कडकडाटाने हादरले

आंगावर शहारे आननार्या विजा कडाडत आहेत, अचानक वादळी वारे सुटून विजांच्या कडकडाटाला प्रारंभ झाला. पावसापेक्षा विजांचा कडकडाट आधिक होतो. गेली दोन दिवस दूपार नंतर वादळी वारे सुटत होते. मात्र पाऊस पडला नाही. मंगळवेढा परिसरात मंगळवारी रात्री ९.३० वातता अचानक आकाशात ढग येऊन पावसाला सुरवात झाली. पावसांपेक्षा विजांचा कडकडाटच खूप आसल्याने मंगळवेढा शहर हादरून गेले.

### पुण्यात होर्डिंग कोसळले, गाड्यांचे नुकसान

पुण्यात सलग दुसऱ्या दिवशी दुपारनंतर पावसाच्या जोरदार सरी कोसळल्याचे पाहायला मिळाले. सोसाट्याच्या वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे पुणे-अहिल्यानगर रस्त्यावर वाघोलीजवळ सणसवाडी येथे एक होर्डिंग पडल्याची घटना घडली. या होर्डिंग्जखाली ७-८ दुचाकी अडकल्या होत्या.

# छगन भुजबळांचा मंत्रिमंडळात समावेश

## मुंडेंचे खाते मिळण्याची शक्यता

◆ **मुंबई, २० मे**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी मंगळवारी सकाळी १० वाजता राजभवनात मंत्रिपदाची शपथ घेतली आणि गेल्या वर्षभरापासून नाराज असलेले भुजबळ अखेर महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात सामील झाले.

विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधान सभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे झालेल्या छोटेखानी समारंभात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी भुजबळ यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, उद्योग, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध व्यवसाय विकास विभाग मंत्री अतुल सावे, खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे तसेच भुजबळ यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

छगन भुजबळ यांच्याकडे माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे अन्न व नागरी पुरवठा खात्याची जबाबदारी देण्यात येण्याची शक्यता आहे.

(तभा वृत्तसेवा)



### भुजबळांची प्रतिक्रिया

सर्व ८ दिवसांपूर्वीच ठरले होते. मंगळवारी सर्व मंत्री उपस्थित असतात म्हणून मंत्रिपदाची शपथ मंगळवारी घेण्याचे ठरले होते. असे भुजबळांनी सांगितले. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रिद्वय अजित पवार, एकनाथ शिंदे, यांचे आभार मानले.

## महत्त्वाचे

### महावितरणच्या कंत्राटी कर्मचाऱ्याने स्विकारली लाच

**सोलापूर** : कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करताना साहेबांची मर्जी सांभाळण्यासाठी त्यांना लाच स्विकारावी लागते. हा प्रकार मंगळवारी सोलापूर महावितरण कार्यालयात केलेल्या कारवाईनंतर उजेडात आला. सोलापूर महाविरतणमधील अतिरिक्त कार्यकारी अभियंता भारत व्हनमाने व सहाय्यक अभियंता स्वाती सलगर यांच्यासाठी कंत्राटी कर्मचा-याने आठ हजाराची लाच स्विकारल्याचे लाच लुचतपतने केलेल्या कारवाईनंतर समोर आले. योगीनाथ म्हेत्रे असे त्या कंत्राटी कर्मचा-याचे नाव आहे. पीएम सूर्यघर योजनेतून लोकांच्या घरावर सौरउर्जा पॅनल बसविण्याचे काम करतो. यातील तक्रारदार करत असलेल्या कामाची स्थळ पाहणी करून त्यास मंजुरी देऊन मीटर बसविण्याकरीता आरोपी कंत्राटी कर्मचारी म्हेत्रे याने तक्रारदाराकडे अतिरिक्त कार्यकारी अभियंता भारत व्हनमाने व सहाय्यक अभियंता स्वाती सलगर यांना प्रती वॅट एक हजार प्रमाणे १६ हजार दयावे लागतील असे तक्रारदाराला सांगितले. त्यानंतरच तुमचे काम करण्यात येईल असे सांगण्यात आले. यादरम्यान तक्रारदाराने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तकार नोंदविली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने १६ व १९ मे रोजी पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये आरोपी क्रमांक एकसाठी पाच हजार व दोनसाठी तीन हजार अशी लाचेची मागणी करून आरोपी म्हेत्रेकडे देण्यास सांगितले. याप्रकरणी लाच लुचपत विभागाने महावितरण कार्यालयात सापळा लावून लाच स्विकारताना आरोपी म्हेत्रेला रंगेहाथ पकडले. त्याच्याविरूध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार, पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले, पोसई चडचणकर, एएसआय कोळी, पोलीस नाईक नरोटे, किणगी, हटखिळे, सुरवसे यांनी पार पाडली.

### केरळात चार दिवसांत येणार मान्सून

**नवी दिल्ली** : प्रखर उन्हाचे चटके सहन करीत असलेल्या देशवासीयांना भारतीय हवामान खात्याने मंगळवारी सुखद बातमी दिली. अंदमानात दाखल झाल्यानंतर झपाट्याने प्रगती करीत असलेला मान्सून पुढील चार ते पाच दिवसांमध्ये केरळात दाखल होणार असल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे. यापूर्वी हवामान खात्याने केरळात २७ मेपर्यंत मान्सून दाखल झालेला असेल, असे भाकीत वर्तवले होते. मात्र, सध्या मान्सून ज्या गतीने प्रगती करीत आहे, ती पाहता तो २४ किंवा २५ मे पर्यंत केरळात दाखल होण्याची दाट शक्यता असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. अपेक्षित कालावधीत मान्सून केरळात दाखल झाल्यास २००९ नंतर प्रथमच मान्सून निर्धारित वेळेच्या आधी दाखल होण्याची ही पहिलीच वेळ असेल. २००९ मध्ये मान्सूनचे केरळात २३ मे रोजी आगमन झाले होते. मान्सूनसाठी सध्याची परिस्थिती अतिशय पोषक आहे. केरळच्या दिशेने त्याची वेगाने वाटचाल सुरू आहे, असे हवामान खात्याने आज दुपारी जारी केलेल्या बुलेटिनमध्ये म्हटले आहे. साधारणपणे मान्सूनचे केरळात १ जून रोजी आगमन होत असते आणि त्यानंतरच्या आठ दिवसांच्या कालावधीत तो महाराष्ट्रात दाखल होऊन ८ जुलैपर्यंत संपूर्ण देश आपल्या कवेत घेत असतो.

# 'माझे घर-माझे अधिकार'

◆ **मुंबई, २० मे**

**सर्वसामान्य, दुर्बलांचे घराचे स्वप्न सहज साकारणारे 'माझे घर-माझे अधिकार' अंतर्गत राज्याच्या नवीन गृहनिर्माण धोरणाला आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. याबाबतची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सर्वांसाठी घर उपलब्ध व्हावे, यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास असा सर्वांगीण कार्यक्रम राबवला जाणार असून, यासाठी ७० हजार कोटींची गुंतवणूक केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

- **राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण**
- **सर्वांसाठी उपलब्ध होणार घर**
- **७० हजार कोटींची गुंतवणूक**
- **मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा**



राज्यातील सर्वसामान्य, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना परवडणारी घरे मिळण्याचा मार्ग राज्याच्या नव्या गृहनिर्माण धोरणामुळे प्रशस्त झाला आहे. हे एक क्रांतिकारी धोरण असून, यामुळे राज्याच्या नगरविकास आणि गृहनिर्माणाला एक नवे रूप मिळेल. शिवाय या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येऊन महाराष्ट्राच्या १ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टास मोठे बळ मिळेल, असे यावेळी उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज माझे घर-माझे अधिकार हे ब्रीदवाक्य असलेल्या राज्य गृहनिर्माण धोरणला मंजुरी देण्यात आली. हे धोरण आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसह सर्व घटकांना परवडणारी, शाश्वत आणि समावेशक घरे दिली जाणार असून, राज्य शासनाने २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटांसाठी ३५ लाख घरे उभारण्याचे उद्दिष्ट आहे.

**गृहनिर्माण माहिती पोर्टल**

यात ज्येष्ठ नागरिक, नोकरदार महिला, विद्यार्थी, औद्योगिक कामगार, पत्रकार, दिव्यांग, माजी सैनिक या सर्वांच्या घरांचा विचार करण्यात आला आहे. यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करून राज्य गृहनिर्माण माहिती पोर्टल केंद्रीकृत डिजिटल प्लॅटफॉर्म म्हणून तयार करण्यात येईल. घरांची मागणी आणि पुरवठा संदर्भात डेटा, सदानिकांचे जिओ टॅगिंग, निधी वितरण, जिल्हानिहाय भूमी अधिकोष आणि महारेरा, महाभुलेख आणि पीएम गती शक्तिसारख्या प्रणालींशी याद्वारे समन्वय साधला जाईल.

**शासकीय जमिनींची बँक**

निवासी वापरासाठी योग्य असलेल्या शासकीय जमिनींची एक बँक निर्माण करण्यात येईल. महसूल व वन विभाग, एमएसआरडीसी, एमआयडीसी, जलसंपदा विभागाच्या समन्वयाने २०२६ पर्यंत ही राज्यव्यापी लॅण्ड बँक विकसित केली जाणार आहे.

(तभा वृत्तसेवा)


### वॉक टू वर्क

पंतप्रधानांनी नेहमीच कामाच्या ठिकाणाजवळ घरे असावी, अशी संकल्पना मांडली आहे. वॉक टू वर्क या संकल्पनेच्या अनुषंगाने या धोरणात रोजगार केंद्रांच्या जवळ, विशेषतः औद्योगिक क्षेत्रांतील घरांच्या विकासावर भर देण्यात आला आहे. एमआयडीसी क्षेत्रातील सुविधा भूखंडाकरिता आरक्षित असणाऱ्या २० टक्के जागेपैकी १० ते ३० टक्के जागा केवळ निवासी वापरासाठी राखीव ठेवण्याचे ठरविण्यात आले आहे. वाढते शहरीकरण पाहून केवळ १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मोठ्या महानगरपालिकाच नव्हे, तर सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांना सर्वसमावेशक घरांचा आदेश देण्यात आला आहे.

# ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. नारळीकर यांचे निधन

◆ **पुणे, २० मे**

ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचे पुणे येथे त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते. डॉ. नारळीकर यांचे काल सोमवारी झोपेत निधन झाल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले. डॉ. नारळीकर हे केवळ खगोलशास्त्रज्ञच नव्हते तर विज्ञान लेखकही होते. त्यांनी नाशिक येथे झालेल्या ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही भूषविले होते.



नारळीकरांचा जन्म कोल्हापूर येथे १९ जुलै १९३८ रोजी झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे एक प्रसिद्ध गणितज्ञ आणि वाराणसी बनारस हिंदू विद्यापीठाच्या गणित शाखेचे प्रमुख होते. त्यांची आई सुमती विष्णू नारळीकर या संस्कृत विदुषी होत्या. जयंत नारळीकरांचे शालेय शिक्षण वाराणसी येथे झाले. इ.स. १९५७ मध्ये त्यांनी विज्ञान विषयात पदवी प्राप्त केली. या परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रिज येथे गेले. तेथे त्यांनी बीए, एमए व पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय, रँग्लर खगोलशास्त्राचे टायसन मेडल, स्मिथ पुरस्कार व इतर अनेक पुरस्कार मिळाले.

१९६६ मध्ये नारळीकर यांचा विवाह गणितज्ञ असलेल्या मंगला सदाशिव राजवाडे यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत. त्यांनी मुंबई येथील टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागात प्रमुख म्हणून पद भूषविले होते. तर १९८८ मध्ये त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली होती.

(वृत्तसंस्था)


महर्षी काळाच्या पडद्याआड (पान ४ वर)

# प्रख्यात अणुवैज्ञानिक श्रीनिवासन यांचे निधन

◆ **उधगमंडलम्, २० मे**

प्रख्यात अणुवैज्ञानिक आणि अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष एम. आर. श्रीनिवासन् यांचे मंगळवारी सकाळी निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते. देशाला अणुऊर्जा कार्यक्रमात आत्मनिर्भर बनविण्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान होते.

डॉ. श्रीनिवासन् यांचे आज सकाळी निधन झाले, अशी माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी एका निवेदनातून दिली.



श्रीनिवासन् हे सप्टेंबर १९५५ मध्ये अणुऊर्जा आयोगात रुजू झाले होते. त्यांनी सुरुवातीला आयोगाचे सचिव म्हणून कार्यभार सांभाळला. देशातील पहिल्या अणुसंशोधन भट्टी विकसित करण्यात त्यांनी डॉ. होमी भाभा यांच्यासोबत काम केले होते. अप्सरा असे नाव असलेली ही अणुभट्टी अतिशय महत्त्वाची ठरली होती. १९५९ मध्ये श्रीनिवासन् यांना देशाच्या पहिल्या अणुऊर्जा केंद्रात प्रकल्प अभियंता म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनात देशाचा अण्वस्त्र कार्यक्रम अधिक मजबूत होत गेला. १९६७ मध्ये त्यांनी मद्रास अणुऊर्जा कार्यक्रमाचे मुख्य प्रकल्प अभियंता म्हणून सूत्रे स्वीकारली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनकड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निधनावर दु:ख व्यक्त केले.

(वृत्तसंस्था)

# क्रिप्टोकरन्सीवर बंदी हा पर्याय नाही

## सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण

◆ **नवी दिल्ली, २० मे**

भारतात क्रिप्टोकरन्सी, विशेषतः बिटकॉईन संदर्भात स्पष्ट धोरण तयार नसल्याने यावर सर्वोच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. न्यायालयाने बिटकॉईन व्यवहाराची तुलना हवाला व्यवसायाशी केली आणि त्याच्या आर्थिक परिणामांबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. क्रिप्टोकरन्सीवर बंदी घालणे योग्य नाही, त्यासाठी नियमावली तयार करायला हवी असे निरीक्षण न्यायासनाने नोंदवले.

गुजरातमधील एका बिटकॉईन फसवणूक प्रकरणात जामीन अर्जावर सुनावणी करताना, न्या. सूर्य कांत आणि न्या. एन. कोटीश्वर सिंह यांच्या न्यायासनाने म्हटले की, केंद्र सरकार क्रिप्टोकरन्सीचे नियमन करण्यासाठी स्पष्ट धोरण का बनवत नाही? एक समांतर बेकायदेशीर बाजार अस्तित्वात आहे, जो देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करू शकतो. धोरण बनवून यावर लक्ष ठेवता येते. यावेळी न्या. सूर्य कांत यांनी बिटकॉईनचे वर्णन बेकायदेशीर व्यापार, हवालासारखे केले आणि क्रिप्टोकरन्सीसाठी त्वरित नियम करण्याची गरज असल्याचे म्हटले. बिटकॉईन घोटाळ्यातील आरोपी शैलेश बाबूलाल भट्ट यांच्या जामीन अर्जाच्या सुनावणीदरम्यान न्यायासनाने ही टिप्पणी केली. भट्ट यांच्यावर गुंतवणूकदारांना मोठ्या नफ्याचे आश्वासन देऊन फसवणूक करण्याचा आणि काही प्रकरणांमध्ये त्यांचे अपहरण करण्याचा आरोप आहे.

(वृत्तसंस्था)

# गुप्तचर विभागाच्या संचालकांना मुदतवाढ

◆ **नवी दिल्ली, २० मे**



केंद्र सरकारने गुप्तचर विभागाचे संचालक तपन कुमार डेका यांना एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. त्यांचा कार्यकाळ ३० जून रोजी संपणार होता. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेटच्या नियुक्ती समितीने त्यांच्या सेवेच्या विस्ताराला मान्यता दिली. त्यामुळे आता डेका ३० जून २०२६ पर्यंत या पदावर कार्यरत राहतील.

डेका यांच्या उत्कृष्ट कार्यशैलीमुळे आणि देशाच्या अंतर्गत सुरक्षेतील योगदानामुळे त्यांना सलग दुसऱ्यांदा एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. जून २०२२ मध्ये त्यांची पहिल्यांदा दोन वर्षांच्या कालावधीसाठी गुप्तचर विभागाचे संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी आपल्या कारकिर्दीचा बहुतांश काळ या विभागातच घालवला आहे. त्यांनी दहशतवाद आणि अतिरेकीवादाशी संबंधित अनेक महत्त्वाची प्रकरणे हाताळली. विशेषतः जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवाद आणि लक्ष्य हत्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये त्यांची भूमिका निर्णायक राहिली आहे.

(वृत्तसंस्था)

# भारतात कोरोनाचा पुन्हा शिरकाव

**नवी दिल्ली** : कोरोना विषाणूच्या संक्रमणाने संपूर्ण जग हादरुन गेले. यात अनेकांनी आपले आप्त गमवले. मागील काही काळापासून कोरोनाचे बाधित आढळणाऱ्यांच्या संख्येत घट झाली होती. मात्र आता सिंगापूर आणि हाँगकाँग सारख्या दक्षिण पूर्व आशियात कोरोना बाधितांची संख्या वाढते आहे. अशातच आता भारतात देखील कोरोनाचा शिरकाव झाला आहे. भारतात एकूण बाधित २५७ तर १६४ संशयित आहेत.

(सविस्तर वृत्त पान ३ वर)

# पाच जहाल माओवाद्यांना अटक

## ● शिरावर होते ३६ लाखांचे बक्षीस ● गडचिरोली पोलिस दल व सीआरपीएफची कारवाई

**गडचिरोली, २० मे**

डीव्हीसीएम व एसीएम दर्जाच्या वरिष्ठ माओवाद्यांसह तीन प्लाटून सदस्य अशा एकूण पाच जहाल माओवाद्यांना गडचिरोली पोलिस दल व सीआरपीएफच्या जवानांनी मंगळवारी अटक केली. या नक्षल्यांच्या शिरावर शासनाने एकूण ३६ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. यावेळी मोठ्या प्रमाणात नक्षली साहित्य जप्त करून नक्षल्यांचा घातपाताचा मोठा कट गडचिरोली पोलिसांनी उधळून लावला आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या नक्षल्यांमध्ये उंगी मंगरू होयाम ऊर्फ सुमली, पल्लवी केसा ऊर्फ बंडी, देवे कोसा पोडीयाम ऊर्फ सबिता व इतर दोन जहाल



माओवादी सदस्य यांचा समावेश आहे. भामरागड उपविभागातील लाहेरी उपपोस्टे अतंर्गत येणाऱ्या बिनागुंडा येथे ५० ते ६० माओवादी पोलिस जवानांवर हल्ला करून घातपात घडविण्याच्या उद्देशाने एकत्र जमले असल्याच्या माहितीवरुन पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलिस अधीक्षक (अभियान) यतिश देशमुख, अपर पोलिस अधीक्षक (प्रशासन) एम. रमेश, अहेरीचे अपर पोलिस अधीक्षक सत्य साई कार्तिक यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे यांच्या नेतृत्वात सी-६० (विशेष कृती दल) ची ८ पथके आणि सीआरपीएफ ३७ बटालियनचे पथक १८ मे रोजी जंगल परिसरात रवाना करण्यात आले होते.

१९ मे रोजी सकाळी सी-६० पथके माओवादविरोधी अभियान राबवत असताना बिनागुंडा गावाला घेराबंदी करून शोध सुरू केला असता, काही हिरवे-काळे गणवेश परिधान केलेले व काही साध्या वेशातील हत्यारासह असलेले संशयित व्यक्ती पोलिस पथकावर घातपात करण्याची योजना आखत असल्याचे दिसले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# दुहेरी जलवाहिनी कामाची चाचणी दुसऱ्या दिवशीही सुरूच

## वरवडे टोल नाक्याजवळ पाणी पोहोचले; आज तिसरा पंप सुरू करणार

**सोलापूर, दि. २० मे-**

उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामाची चाचणी प्रक्रिया दुसऱ्या दिवशीही सुरूच होती. दुसऱ्या दिवशी दुसरा पंप चालू करण्यात आला. संध्याकाळी वरवडे टोल नाक्याजवळ पाणी पोहोचले होते. टप्प्या टप्प्यात ही चाचणी पूर्ण करण्यात येणार आहे, अशी माहिती स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी तथा आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी दिली.

११० किलोमीटर उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनी टाकण्याचे काम अखेर २३ महिने १५ दिवसांनी १५ मे २०२५ रोजी पूर्ण झाले. या प्रकल्पामुळे शहराला १७० एमएलडी क्षमतेचा पाणीपुरवठा होणार आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी तथा आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांच्या माध्यमातून १२ अभियंते आणि १५० कर्मचाऱ्यांनी मिळून हे काम



पूर्ण केले आहे. हैदराबाद येथील ठेकेदार पोचमपाड कन्स्ट्रक्शन कंपनीकडून हे काम करण्यात आले. या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम पाहत आहे. हा प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी २१ महिने होता (नोव्हेंबर २०२४ अखेर). त्यांनतर ३ महिने प्रात्यक्षिक चाचणी व ३ वर्ष देखभाल व दुरुस्ती कालावधी आहे. अखेर २३ महिने १५ दिवसांनी म्हणजेच १५ मे २०२५ रोजी पूर्ण झाले आहे.

अखेर या महत्वपूर्ण प्रकल्प कामाची चाचणी प्रक्रिया सोमवार दि. १९ मे पासून सुरू करण्यात आली. या प्रकल्पातील पंपगृहातील सर्व ६ पंपांची प्राथमिक पाणी उपशाची चाचणी यशस्वी झाली. उजनी धरणातून थेट चॅनेल मधून जॅकवेल मध्ये पाणी सोडण्यात आले होते.काल पहिल्या दिवशी एका पंपाद्वारे ही चाचणी घेण्यात आली. त्यानंतर आज दुसऱ्या दिवशी दुसरा पंप सुरू करण्यात आला. उजनी तेथून उजनी पंप हाऊस मधून ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या वरवडे येथील ब्रेक प्रेशर टँक (बीपीटी) येथे आज पोहोचले. वरवडे येथील टोल नाक्यापर्यंत हे पाणी पोहोचले होते.

### लांबोटी सिना नदीत बुधवारी वॉश आऊट घेतले जाणार : चौबे

उजनी धरणावर उभारलेल्या नवीन पंपगृहात ११५० अश्वशक्ती क्षमतेचे सहा पंप बसविण्यात आले असून काल सोमवारी ११५०आश्वशक्ती क्षमतेच्या एका पंपावरून चाचणी सुरु करण्यात आली. मंगळवारी दुसऱ्या दिवशी दुसरा पंप सुरू केला आहे. उजनी पंप हाऊस मधून ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या वरवडे येथील टोल नाक्यापर्यंत पाणी पोहोचले. बुधवारी तिसरा पंप सुरू करण्यात येणार आहे. बुधवारी लांबोटी सिना नदीत वॉश आऊट घेतले जाणार आहे. पुढे कॅनॉलला वॉश आऊट घेण्यात येईल. त्यानंतर पुढे पाकणी येथे वॉश आऊट घेतल्यानंतर सोरेगाव येथे पाणी पोहोचणार आहे. अशा पद्धतीने ही चाचणी होईल, अशी माहिती मुख्य तांत्रिक अधिकारी व्यंकटेश चौबे यांनी दिली.

## महत्त्वाचे...

### नर्सिंग कोर्सच्या नावे ४०० विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याचा आरोप

**सोलापूर, दि. २० मे-**

नर्सिंग कोर्सला ॲडमिशन देऊन प्रमाणपत्र घेऊन देतो म्हणून बोगस परीक्षा घेतली. सुमारे ४०० विद्यार्थ्यांची फसवणूक करण्यात आली असल्याचा आरोप करत याप्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी श्रमिक विकास संघटनचे जिल्हाध्यक्ष अशोक होटकर यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. नर्सिंग (जीएनएम) कोर्सला ॲडमिशनची जाहिरात केली. प्रमाणपत्र घेऊन देतो म्हणून संबंधित संस्था चालकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून ५० हजार ते साठ हजार रुपये घेतले. त्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना बिदर व गुलबर्गा येथे घेऊन गेले. तेथे परीक्षा घेतली. परीक्षा झाल्यानंतर लगेच हॉल तिकीट काढून घेतले. त्यानंतर गुणपत्रिकेची मागणी केल्यानंतर ती परीक्षा बोगस असल्याचे संबंधित विद्यार्थ्यांना समजले. संस्थाचालकांच्या पत्त्यावर गेले असता त्या ठिकाणी त्या राहत नसल्याचे समजले. अनेक दिवस त्यांचा शोध घेतला असता त्या संपर्कात आल्या नाहीत. दरम्यान, त्यानंतर अखेर विद्यार्थ्यांनी व संघटनेने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. तसेच सोलापुरातील सदर बझार पोलीस स्टेशनमध्ये संस्थाचालकाविरुद्ध तक्रार अर्ज दिला आहे. या प्रकरणात पोलिसांनी जाब जबाब नोंदवले आहेत. याप्रकरणी पोलिसांनी सखोल चौकशी करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक होटकर यांनी दिला आहे. या पत्रकार परिषदेस राजनंदिनी कुंभार, अक्षय कळसे, ज्योती शिंगे, करिष्मा मुल्ला, वैशाली कुंभार आदी उपस्थित होते.

### भिंतींच्या खुंटीला गळफास घेऊन आत्महत्या; एमआयडीसी आशानगरातील घटना

**सोलापूर, दि. २० मे -**

अज्ञात कारणातून राहत्या घरातील भिंतीच्या खुंटीला साडीने गळफास घेऊन हणमंतु बाबण्णा धुमाळे (वय ७६, रा. आशा नगर, एमआयडीसी) यांनी आत्महत्या केली. हा प्रकार मंगळवारी सकाळी ९.४५ वाजता उघडकीस आला. हणमंतु यांना नातेवाईकांनी गळफासातून सोडवनूक करून खाली उतरवले. त्यानंतर एएसआय इनामदार यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले असता, उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### बाटल्या वेचल्याच्या कारणातून एकाला मारहाण

**सोलापूर, दि. २० मे -**

बाटल्या वेचण्याच्या कारणातून जोडबसण्णा चौकातील सहा नंबर शाळेजवळ मंगळवारी सकाळी सात वाजता अज्ञात व्यक्तीने केलेल्या मारहाणीत श्रीनिवास शिवय्या कोंडा (वय ५५, रा. गांधी नगर, अ.कोट रोड) यास मारहाण करण्यात आली. श्रीनिवास हे मंगळवारी सकाळी सातच्या सुमारास जोडबसण्णा चौकातील महापालिका शाळा नंबर सहा जवळ कचरा वेचत होता. त्यावेळी तेथे आलेल्या अज्ञाताने त्यांना इथे बाटल्या का वेचतो म्हणून लाकडाने मारहाण केल्याने डोकयाला जखम झाली. सकाळी ९.१५ वाजता बहिण मिनाक्षी हिने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कार्यक्रमातील तक्रार मिटविण्यास गेल्याने तिघांना मारहाण

**सोलापूर, दि. २० मे -**

घराजवळ कार्यक्रम सुरु असताना तक्रार झाली. ही तक्रार मिटविण्यासाठी गेलेल्या तिघांना सुमारे १५ जणांच्या जमावाने



बेदम मारहाण केली. ही घटना शास्त्री नगरात सोमवारी रात्री १०.३० वाजता घडली. मुर्तुज यासीनसाब कुरेशी (वय ६०), तालीब बुडे कुरेशी (वय २२) व अमिना सय्यदसाब कुरेशी (वय ७०, रा. शास्त्री नगर, सोलापूर) अशी मारहाण झालेल्यांची नावे आहेत. यातील जखमींच्या घराजवळ सोमवारी रात्री दहाच्या सुमारास कार्यक्रम सुरु होता. या कार्यक्रमात अचानक काही लोकांमध्ये तक्रार सुरु झाली. त्यामुळे ती तक्रार मिटविण्यासाठी म्हणून मुर्तुज व इतर दोघे तेथे गेले. त्यांना इब्राहिम खाजासाब कुरेशी, शौकत कुरेशी व इतर १५ जणांनी मिळून दगडाने, हत्याराने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांना मुकामार लागल्याने मंगळवारी रात्री १२.२५ वाजता असलम मुजावर याने उपचारस दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### जेवणास बोलावल्याच्या कारणातून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. २० मे -**

शास्त्री नगरात सोमवारी रात्री दहाच्या सुमारास कार्यक्रमात जेवायला बोलावल्याच्या कारणातून तरुणाला मारहाण करण्यात आली.




नसरोद्दीन शौकत कुरेशी (वय २२, रा. शास्त्री नगर, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. शास्त्री नगर भागात कौटुंबिक कार्यक्रम होता. या कार्यक्रमात जेवणास बोलावल्याचा राग मनात धरून नसरोद्दीन यास सादीक कुरेशी, मुद्दसर कुरेशी व इतर आठ जणांनी लाकडाने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात उजव्या पायाला जखम झाली तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने मित्र सलमान सातखेड याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चक्कर येऊन पडल्याने एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २० मे -**

अचानक चक्कर येऊन पडल्याने एकाचा मृत्यू झाला. हा प्रकार कल्याण नगर येथील इंम्लिसिटी डाटा सेंटर येथे कामावर असताना सोमवारी दुपारी २.३० वाजता घडला.संतोष शंकर खांडेकर (वय ४५,रा. राजीवजी नगर, इरण्णा वस्ती सोलापूर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. संतोष हे मंगळवारी कल्याण नगर येथील इंम्लिसिटी डाटा सेंटर येथे कामावर होते. दुपारी २.३० च्या सुमारास त्यांना अचानक चक्कर येऊन ते खाली पडल्याने त्यांना डोक्याला जखम झाली होऊन ते बेशुध्द पडले. त्यांना रात्री ९.२० वाजता आई सरस्वती खांडेकर यांनी उपचारास दाखल केले असता, उपचारापूर्वी ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## जीवन विकास प्रशालेचा दहावीचा निकाल ९१.४० टक्के



**सोलापूर, दि. २० मे-**

भंडारकवठे (ता. दक्षिण सोलापूर) येथील जीवन विकास माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचा दहावीचा निकाल ९१.४० टक्के लागला असून सेमी विभागातून सुस्मिता सगर (८९.८० टक्के) मिळवून प्रथम, मरियम शेख (८७.६० टक्के) द्वितीय, तृतीय साधना पाटील (८७.२० टक्के) क्रमांकाने उत्तीर्ण झाले. तर मराठी विभागातून नेहा जेऊरे (८०.८० टक्के) प्रथम, सना मुल्ला (७६ टक्के) द्वितीय, प्रणाली मुक्काणे (७३.२० टक्के) मिळवून तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. प्रशालेत १२८ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली. त्यापैकी ११७ विद्यार्थी पास झाले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष पी.एल.कोळी, उपाध्यक्ष डॉ. चनगोंडा हविनाळे, सचिव एम.डी. कमळे, विश्वस्त नागेश बिराजदार, सचिव संदेश कोळी, खजिनदार व्ही.के.पाटील, हर्षवर्धन कमळे, अमर कमळे, मुख्याध्यापक ए.एस. मलकारी, पर्यवेक्षक एस.एम. जेरे, ए.बी. शिवपुजे, पी.एफ. कुगणे यांनी अभिनंदन केले.


## आज मंत्रालयात कालवा समितीची बैठक

### जिल्ह्यातील आमदार राहणार उपस्थित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

सोलापूर जिल्ह्याच्या पाणी नियोजनात कालवा सल्लागार समितीकडून ढिसाळ नियोजन झाल्याने यंदा पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय झाल्याचे दिसून येत आहे. याबाबत नुकत्याच पार पडलेल्या डिपीसी बैठकीतही जाहीरपणे चर्चा झाली. ही बाब स्थानिक आमदारांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उजनीचे पाणी नियोजन आणि उजनी जलपर्यटनाचा विषय घेवून आज २१ मे रोजी कालवा समितीची एक बैठक लावली असून, या बैठकीला जिल्ह्यातील आमदारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

यावर्षी पाणी नियोजनात गफलत झाल्याने काही भागातील उंचावरील शेतकऱ्यांना उजनीची आवर्तने नीट मिळाली नाहीत. कर्नाटकातील शेतकऱ्यांनाच याचा जास्त फायदा झाला आहे. यामुळे मोहोळ तालुक्याचे आमदार राजू खरे, आ. सुभाष देशमुख यांनी उजनीच्या पाण्यावर



डिपीसी बैठकीत जाहीरपणे चर्चा केली होती. इतकेच नाहीतर आ. देशमुख यांनी गेल्याच आठवड्यात शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी सीना कोळेगाव धरणातून सीना नदीत सोडले जात नसल्याने सिंचन भवनसमोर शेतकरी बांधवांना घेवून बेमुदत उपोषण सुरू केले होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पाणी सोडण्याचे आश्वासन दिल्यावर हे आंदोलन मागे घेतले होते. असाच पाणीप्रश्न इतरही काही तालुक्यातील असल्याने डिपीसी बैठकीत या प्रश्नाचा ऊहापोह झाला होता.

राज्यातील सर्वात जास्त साखर कारखाने अशी ओळख जिल्ह्याला मिळवून देण्यात उजनी धरणाचे मोठे योगदान आहे. आता याच उजनी धरणाला जल पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जवळपास २८२ कोटींचा जलपर्यटन आराखडा तयार केला होता. यास राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही हिरवा कंदील दाखविला होता. यानंतर शिखर परिषदेतूनही यास मंजुरी मिळविली होती. मात्र ज्यावेळी उजनी धरणामध्ये बोटिंगची सुविधा निर्माण करण्यासाठी टेंडर प्रक्रिया झाली तेव्हा जलसंपदा विभागाला जाग आणि त्यांची या उजनी पर्यटनाला खोडा घातल्याचे सांगण्यात येते. इतकेच नाहीतर या आराखड्यात उजनी धरण येथे पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी पुढच्या टप्प्यात ६० कोटी रुपयांचे रिसॉर्ट, ॲग्रो टुरिझमसाठी ५० कोटींची निविदा देखील काढली जाणार होती. उजनी जलपर्यटनासाठी १९० कोटी, कृषी पर्यटनासाठी १९ कोटी, तसेच विनयार्ड पर्यटनासाठी ४८ कोटी रुपये असे एकूण २८२ कोटी निधीला मंजुरी मिळविली होती. यासाठी करमाळ्याचे माजी आमदार संजय मामा शिंदे यांनीही पुढाकार घेतला होता. आता लवकरच उजनी धरण एक पर्यटन केंद्र म्हणून महाराष्ट्राच्या नकाशा समोर येणार होते मात्र कोठेतरी माशी शिंकली आणि सोलापूरकरांचीच नाहीतर राज्यातील तमाम जलप्रेमींची निराशा झाली. यामुळे आज होणाऱ्या बैठकीत स्थानिक आमदारांनी उजनीच्या पाणी नियोजनाबरोबर उजनी जलपर्यटनाचाही विषय लावून धरावा, अशी तमाम सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांची मागणी आहे.

## महाराष्ट्र शासनाच्या नियमाविरुद्ध सोलापूर विद्यापीठाची ५ कोटींची सोलार निविदा

### ॲड नीता मंकणी यांची कुलगुरू व कुलपतीकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, २० मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सुमारे ५ कोटींच्या सोलार प्रकल्पासाठी काढण्यात आलेली निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाच्या नियमाविरोधी आहे, अशी तक्रार विद्यापीठाच्या सिनेट सदस्य ॲड. नीता मंकणी यांनी विद्यापीठाचे कुलगुरू व कुलपती यांच्याकडे केली आहे. याची प्रत त्यांनी मुख्यमंत्री कार्यालयाकडेही पाठविली आहे. अशीच बेकायदेशीर टेंडर प्रक्रिया सुरू ठेवली गेली तर वित्त व लेखा अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, असे त्यांच्या तक्रारीत नमूद आहे. निविदा प्रक्रिया त्वरित थांबवून नियमबद्धरित्या नव्याने व पारदर्शकपणे राबवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यांनी केलेल्या तक्रारीत अनेक गंभीर अनियमितता आणि नियमविरोधी अटींवर आक्षेप घेण्यात आला आहे.

**तक्रारीतील मुख्य मुद्दे असे:**
**ईएमडीमध्ये विरोधाभास :** फक्त ऑनलाइन पेमेंट आवश्यक असताना इतरत्र/बँक गॅरंटी देखील सांगितली आहे. चुकीच्या लिफाफ्यात नोंदविल्यास बिल अपात्र ठरवण्याची अट मनमानी आहे.



**साइट व्हिजिट रिपोर्टची अनिवार्यता:** युनिव्हर्सिटी इंजिनिअरकडून प्रमाणित रिपोर्ट नसल्यास बिल डिस्कालिफाय करण्याची अट ही संपर्क असलेल्या कंपन्यांना सूट देणारी आहे.
**वॉरंटी, एएमसी व पॉवर गॅरंटीमध्ये विसंगती:** केवळ ५ वर्षांची पॉवर जनरेशन गॅरंटी देण्यात आलेली असून ती ग्रीड कनक्टेड प्रकल्पासाठी अपुरी आहे.
**पारदर्शकतेचा अभाव:** बीओक्यूमध्ये सर्व खर्च एकत्रित नमूद केल्यामुळे उपकंपन्यांचे दर अस्पष्ट ठेवले जातात. **आरएमएसमध्ये अस्पष्ट व महागड्या अटी:** ऑल बेसड मॉनेटरींग सिस्टीम संबंधित कोणतेही तांत्रिक निकष दिलेले नाहीत.
**दस्तऐवजांची ढिसाळ मांडणी:** स्पेलिंग व वाक्यरचनेतील चुका, जुन्या फॉरमॅट्सचा वापर, यामुळे निविदा ही अपारदर्शकतेस पोषक बनली आहे.
**मूल्यमापन निकष नसणे:** ईव्हॅल्यूएशन मॅट्रीक्स व स्कोरींग क्रॅटेरियेचा अभाव असल्यामुळे निवड प्रक्रियेवर विश्वास ठेवणे कठीण आहे.
**ईएमडी रक्कम नियमबाह्य:** ५ कोटींच्या प्रकल्पासाठी फक्त १ लाख म्हणजे केवळ ०.२%, जे कायद्यानुसार २ ते ५% दरम्यान असणे आवश्यक होते.



## युवाशक्ती विधायक कार्यासाठी वापरावी : आ. सचिन कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

शंभुराजे छावा जन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाचे हे १७ वे वर्ष असून या सतरा वर्षात मंडळाच्या वतीने एकदाही मिरवणूक काढली नाही. याचाच आदर्श घेत भारताची युवाशक्ती हि समाजाने विधायक कार्याकरिता वापरावी, असे मत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

शंभुराजे युवा संघटन महाराष्ट्र प्रणित शंभुराजे छावा जन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाच्या वतीने चार हुतात्मा चौक येथे छत्तपती सभाजीराजेंच्या मूर्तीची प्राण प्रतिष्ठापणा करण्यात आली. यावेळी आमदार कल्याणशेट्टी बोलत होते. प्रारंभी शंभूराजांच्या मूर्तीचे पुजन आमदार सचिन कल्याण शेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, शिवप्रताप तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रतापसिंह चौहान, शंभुराजे मध्यवर्ती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नितीन भैया चव्हाण, उपाध्यक्ष अभिजीत पवार, प्रमुख उपस्थिती म्हणून तालुका पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुल देशपाडे, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, डिजीटल मिडिया पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय बाबर, पृथ्वीराज कदम आदी मान्यवरांच्या उपस्थितति सोहळा पार पडला. याप्रसंगी राहुल पवार, आशितोष इंगवले, प्रताप खंदारे, सचिव राहुल पाटील, हर्षीकेश सुरवसकर, अनिल कवडे, प्रशांत गुंडला, नितेश माने, विजय चव्हाण, राज पंचारिया, लक्ष्मण चव्हाण, बरगली गाडेकर, राकेश पंचारिया, अजय पुजारी, सर्वेश दणके, आदित्य पवार, मयूर दणके, साहिल गायकवाड, संयुक्ता चव्हाण अनिकेत भिसे, सुशांत सुकोलोलू, अजय भिसे, अजय मोरे, विजय मोरे, वैभव चव्हाण, रोहन चव्हाण, रवी रंदवे, रोहित चव्हाण, संजय चव्हाण, सुरज रजपूत, कुलदीप चव्हाण, शीतल दणके, नताशा कदम, पंकज संगवेसर, स्मिता चव्हाण, निशा पवार, सुप्रिया चव्हाण, निकिता दनके, रिद्धी चव्हाण, आर्या पवार उपस्थित होते.

## आजपासून अकरावी ऑनलाइन प्रवेशअर्ज भरण्यास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

दहावी निकालानंतर अकरावी प्रवेशासाठी पालक, विद्यार्थ्यांची धावपळ सुरू झाली आहे. सोमवार १९ व मंगळवार २० मे २०२५ रोजी प्रवेश अर्जाचा सराव आयोजित करण्यात आले होते. बुधवार २१ मे पासून प्रत्यक्ष अकरावी प्रवेश अर्ज भरण्यास प्रारंभ होणार आहे . त्यामुळे राज्यातील सर्व महाविद्यालयांनी रिक्त जागांची माहिती ऑनलाईन भरली आहे. . दि. २१ ते २८ मेपर्यंत प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहेत. त्यासाठी या कालावधीत विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रोफाईल तयार करावे लागणार आहे. त्यानंतर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यात दहावी परीक्षेत ५९ हजार २७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत . जिल्ह्यातील महाविद्यालयात विद्यार्थ्यांना कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेत प्रवेश घेता येणार आहे..

ऑफलाइन पद्धतीने होणारी अकरावी प्रवेश प्रक्रिया या वर्षापासून ऑनलाइन करण्यात आली आहे. ११ ऑगस्टपासून महाविद्यालये सुरू होणार आहेत. अकरावी प्रवेशासाठी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या जागेची क्षमता प्रसिद्ध करण्यात आली आहे. १० ऑगस्टपूर्वी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे, अशी माहिती माध्यमिक शिक्षण विभागाने दिली. १९ व २० मे या दोन दिवशी डेमो रजिस्ट्रेशन करण्यात आले . या दोन दिवसात भरलेली माहिती पुन्हा डिलीट होणार व २१ मे ते २९ मे या दरम्यान रजिस्ट्रेशन व ऑप्शन फॉर्म भरले जाणार आहे. ऑनलाइन अर्ज भरताना विद्यार्थ्यांना प्रत्येक फेरीवेळी नव्याने पसंती क्रमांक देता येणार आहे.

माध्यमिक शिक्षण विभाग यंदा पहिल्यांदाच अकरावीसाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवत आहे. या प्रक्रियेद्वारे विद्यार्थ्यांना घरबसल्या विषयानुरूप आपल्या पसंतीच्या कॉलेजला प्रवेशासाठी ऑनलाइन फॉर्म भरता येणार आहे. कोणतेही अडचण आल्यास संबंधित शिक्षण विभागाशी संपर्क साधावा. सर्व संबंधितांनी वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
**-सचिन जगताप, शिक्षणाधिकारी, माध्यामिक, जिल्हा परिषद, सोलापूर**

### प्रवेशाचे वेळापत्रक

- २१ ते २८ मे - प्रत्यक्ष प्रवेशाची नोंदणी
- ३० मे - तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध
- ३० मे ते १ जून- प्रवेश अर्जावर हरकती व दुरूस्ती प्रक्रिया
- ३ जून - अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध
- ५ जून - गुणवत्ता यादीनुसार प्रवेश वाटप
- ६ जून - प्रवेशाची यादी पोर्टलवर प्रसिद्ध
- ६ ते १२ जून - प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे
- १४ जून - दुसऱ्या फेरीसाठी रिक्त जागांची यादी प्रसिद्ध
- १५ जून ते १० ऑगस्ट - रिक्त राहिलेले जागा पाहून गरजेनुसार प्रवेश फेरी

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सोलापूर शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

## आज व उद्या शहराच्या या भागात होणार पाणीपुरवठा

**सोलापूर, दि. २० मे-**

३३ केव्ही मंद्रुप सबस्टेशन (महावितरण) मध्ये दि.१८ मे रोजी केबल जॉइंट तुटल्याच्या पार्श्वभूमीवर शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. त्यामुळे यामुळे शहरवासीयांच्या सोयीसाठी महापालिकेने बुधवार दिनांक २१ मे व गुरुवार २२ मेसाठी पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

बुधवार दि.२१ मे रोजी हायलेव्हल चक्रीवरुन मुस्लिम पाच्छा पेठ, काडादी चाळ, शहापुरे चाळ, जेल रोड परिसर,झोन टाकीवरून अशोक नगर, नळ बाजार चौक, मुर्गीनाला परिसर, सतनाम चौक, १७५ एचपीवरुन बापूजी नगर, व्हॉलीबॉल ग्राऊंड, शास्त्री नगर, जवाहर नगर, तुकाराम नगर, मातंग वस्ती, पाथरुट चौक,

१५० एचपीवरुन स्लॉटर हाऊस, एमबीआरवरुन होटगी रोड, साखर कारखाना परिसर, मजरेवाडी, सहारा नगर, काजल नगर, आंबेडकर नगर, महात्मा फुले नगर, शंकर नगर, हत्तुरे वस्ती, लक्ष्मी नगर, शांती नगर, भिम शंकर नगर, उरलेले टप्पे रात्रभर चालू शोभादेवी नगर, विष्णु नगर, शिवगंगा नगर, उजनी लाईनवरून बाळे शिवाजी नगर, पाटील नगर, तोडकर वस्ती, साई नगर, लक्ष्मी नगर, संतोष नगर, मडकी वस्ती, गणेश नगर, वसंत विहार, थोबडे नगर, भुषण नगर, इरण्णा वस्ती, उत्कर्ष नगर, आदित्य नगर येथून निर्मिती विहार, विजयकुमार देशमुख नगर, समता नगर, यतिम खाना परिसर,

हद्दवाढ एमबीआरवरून समाधान नगर, उतारा व चढाचा भाग, जवाहर नगर, किसान नगर, किसान संकुल कोटा नगर, केकडे, दास टाकीवरून रेणुका नगर व नवीन आय.एम.एस. शाळा परिसराला पाणीपुरवठा होणार आहे.

गुरुवार दि. २२ मे रोजी चक्रीवरुन रेल्वे लाईन, डफरीन चौक, कोनापुरे चाळ, हायलेव्हलवरुन फॉरेस्ट, चांदनी चौक, काडादी चाळ, रामलाल चौक, १५० एचपीवरुन शनिवार पेठ, भारतीय चौक, मर्गम पट्टी,कोंडा कल्पना, भगवान नगर, कल्पना नगर, सृष्टी नगर, ७५ एचपीवरून भारत नगर, कुमठा नाका, कुर्बान हुसेन नगर, पंचशिल नगर, तक्षशिल नगर, संजय नगर, सिरत नगर, जवाहर सोसायटी, जय भवानी सोसायटी १७५ एचपीवरुन साईबाबा चौक, कणिक नगर, गिता नगर, एकता नगर, वज्रेश्वरी नगर, कुचन नगर, दत्तनगर परिसर, हनुमान खड्डा परिसर,

एमबीआरवरून प्रताप नगर, टिळक नगर, शहर सिटी विभाग, अंत्रोळीकर नगर, कित्तुर चन्नम्मा नगर, नरेंद्र नगर, पाटील नगर, किनारा हॉटेल परिसर, गैबीपीर झोपडपट्टी, उजनी लाईनवरून अवंती नगर, शिवाजी चौक, वसंत विहार, निराळे वस्ती, जुना पुना नाका, मडके वस्ती, यशनगर, अभिमान श्री नगर, अमराई पाटील वस्ती, रामवाडी, धोंडीवा वस्ती, पोगुल मळा, नेहरुनगर येथून सुंदरम् नगर, सुशिल नगर, कमला नगर, प्रमोद नगर, अध्यापक सोसायटी, कोर्ट कॉलनी, विजय सोसायटी, माजी सैनिक नगर, एमबीआरवरून एमआयडीसी, दास टाकीवरून ओम गर्जना चौक, भोपळे नगर, आय एम एस शाळा परिसर, अक्षय सोसायटी, मौरा पिठाची गिरणी, आर्य चाणक्य नगर, बिलाल नगर या विविध भागांना पाणीपुरवठा होणार आहे.

दरम्यान, नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी केले आहे.

## एमआयडीसीतील सेंट्रल टेक्स्टाईलमधील अग्नितांडव प्रकरणी

# दोषी अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

### महापालिकेवर सर्वपक्षीयांनी काढला निषेध मोर्चा



**सोलापूर, दि. २० मे-**

अक्कलकोट रोड एमआयडीसीतील सेंट्रल टेक्स्टाईल टॉवेल कारखान्यातील अग्नी तांडवप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. या प्रकरणाची गुप्तचर यंत्रणेकडून चौकशी व्हावी यासह विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सोलापूर महापालिकेवर सर्वपक्षीय निषेध मोर्चा काढण्यात आला. आठ दिवसात कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील सेंट्रल इंडस्ट्री टेक्स्टाईल कारखान्यास लागलेल्या भीषण आगीमध्ये मन्सूरी आणि बागवान या दोन कुटुंबातील आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला. या घटनेचा तीव्र शब्दात निषेध नोंदवत विविध पक्ष आणि संघटनांच्या वतीने रंगभवन चौक येथून आज निषेध मोर्चा काढण्यात आला. या अग्नीतांडवात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. डोक्याला आणि दंडाला काळी पट्टी बांधून मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते या मोर्चात सहभागी झाले होते. विविध घोषणा देत हा मोर्चा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोहोचला. त्यानंतर पुढे शिष्टमंडळाद्वारे इंद्रभुवन इमारतीतील कार्यालयात महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी मन्सूरी कुटुंबीयही उपस्थित होते. नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन महापालिका आयुक्तांनी दिले असल्याचे शौकत पठाण यांनी सांगितले.

सोलापूर महापालिकेकडे अग्निशामक दलाच्या गाड्या कमी आहेत. एम आयडीसीतील आग विझवताना पाणी नव्हते. सुसज्ज अशी यंत्रणा दिसून आली नाही. अशा घटना पुन्हा घडू नये याची काळजी आता शासन व प्रशासनाने घेणे गरजेचे आहे. एसीमध्ये बसून वरिष्ठ अधिकाऱ्यांना आगीच्या झळा काय समजणार, असा प्रश्नही यावेळी पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला.

मुख्यमंत्र्यांनी तातडीने याप्रकरणी सर्व विभागांची बैठक घ्यावी.अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी उपाययोजना कराव्यात. दोषींवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी माजी नगरसेवक रियाज खरादी आणि ''प्रहार''चे जमीर शेख यांनी केली. दरम्यान, येत्या आठ दिवसात महापालिका प्रशासनाने याप्रकरणी कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे अजित कुलकर्णी यांनी दिला आहे.

यावेळी माजी नगरसेवक तोफिक हत्तुरे, रियाज खरादी, माजी नगरसेविका फिरदोस पटेल, वाहिदा बंडाले, रेश्मा मुल्ला, जमीर शेख, नदीम डोणगावकर, जुबेर बागवान, अयाज दिना यांच्यासह प्रहार जनशक्ती पक्ष, एमआयएम तसेच इतर पक्ष, संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### काळजाचे तुकडे गेले, आणखी किती जीव घेणार? : हनीफ मन्सूरी

मयत उस्मान मन्सूरी यांचे नातेवाईक हनीफ मन्सूरी हे माध्यमांशी बोलताना भावुक झाले. रडवेल्या स्वरात ते म्हणाले, टेक्स्टाईल कारखान्याच्या भीषण आगीमध्ये काळजाचे तुकडे गेले. आणखी किती जीव घेणार आहेत? प्रशासन आणि शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात. अशा दुर्घटना पुन्हा घडू नये यासाठी पावले उचलावीत, असा आर्त टाहो हनीफ मन्सूरी यांनी फोडला.



# स्वस्तिक सामाजिक संस्थेच्या सामुदायिक सोहळ्यात १२ जोडप्यांचा विवाह उत्साहात

### समाजातील सामान्य वर्गातील लोकांसाठी सामुदायिक विवाह सोहळे गरजेचे

### जगद्गुरु १००८ डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० मे-**

विवाह सोहळ्यात देशभक्तीपर गीत, सनईचे मंगल सुर, वऱ्हाडींची लगबग, मंगळवारी गोरज मुहूर्तावर १२ जोडप्यांचा रेशीमगाठी बांधल्या गेल्या. निमित्त होते स्वस्तिक सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित केलेल्या सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे.

स्वस्तिक सामाजिक संस्थेच्या वतीने सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळा भवानी पेठेतील वीरतपस्वी सांस्कृतिक भवन येथे जगद्गुरु डॉक्टर मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी काशीपीठ यांच्या दिव्य सानिध्यामध्ये संपन्न झाला. वीरतपस्वी प्रशालेत सर्व वधू-वरांना देण्यात येणार रुखवत सजवून ठेवण्यात आला होता. भारतीय जनता युवा मोर्चाचे शहराध्यक्ष माजी नगरसेवक डॉ.किरण देशमुख आणि त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ.उर्वशी देशमुख यांनी प्रत्येक नवरी मुलीचे कन्यादान केले.संस्थेच्या वतीने वधू-वरांना कपाट, मणी मंगळसूत्र,संसार उपयोगी वस्तू,साडी, शालू,जोडवी,सफारी इतर आवश्यक वस्तू देण्यात आल्या होत्या. विवाह समारंभासाठी ५ हजार जणांच्या भोजनाची सोय करण्यात आली होती.

समाजातील गोरगरीब वर्गातील लोकांसाठी सामुदायिक विवाह सोहळा सातत्याने झाले पाहिजे. स्वस्तिक सामाजिक संस्था मागील अनेक वर्षापासून आरोग्य शिक्षण विवाह सोहळा या धार्मिक कार्यात अग्रभागी असते. येणाऱ्या गृहस्थाश्रम जीवनामध्ये वधू-वरांनी एकमेकांना समजून घेण्याचे वचन घ्यावे व पुढील सामुदायिक विवाह सोहळ्यात स्वयंसेवक म्हणून काम करावे. त्याचबरोबर आज आपल्या देशाला ज्यांनी संरक्षण दिले अशा सैनिकांचा सन्मान झाला याचाही आनंद होत असल्याची भावना काशीचे जगद्गुरु डॉक्टर मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांनी यावेळी व्यक्त केले. सामुदायिक विवाह सोहळा ही एक चळवळ आहे. समाजातल्या शेवटच्या घटकांना आपल्या माध्यमातून हवी ती मदत करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सर्वसामान्य परिवारातील नियोजित वधू-वरांसाठी असे सोहळे आणि चळवळ चालू राहिली पाहिजे अशी भावना वधू-वरांना आशीर्वाद देत आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला. या विवाह सोहळ्यात वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी ष. ब्र.श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी नागणसूर, माजी खासदार ष. ब्र.जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी गौडगाव ,ष. ब्र.नीलकंठ शिवाचार्य महास्वामींची मैंदर्गी , यांच्यासह आ. सुभाष देशमुख,मूर्तिजापूरचे आ.हरीश पिंपळे,पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे,वीरतपस्वी शिक्षण संकुल चे सेक्रेटरी शांताया स्वामी, उद्योजक वेंकटेश चाटला, प्रमोद मोरे, संजय कोळी, पापशेट दायमा, सिद्धेश्वर यात्रेचे मानकरी राजशेखर हिरेहब्बू, विजया वड्डेपल्ली, चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष राजू राठी, विठ्ठलदास गजम, मल्लिकार्जुन मारता, सिद्धया स्वामी हिरेमठ, चिदानंद वनारोटे, शिवानंद मेंडके, सोमनाथ भोगडे, सुधीर थोबडे, उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, सिद्धेश्वर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, नरसिंहस्वामी मामड्याल, श्रीशैल हत्तुरे, राजेंद्र गड्डम पंतलु उपस्थित होते. परमेश्वर हिरेमठ यांनी पौरोहित्य केले तर शिवाजी रानसर्जे यांनी सूत्रसंचालन केले.

### संरक्षण दलातील माजी सैनिकांचा सन्मान

ऑपरेशन सिंदूरच्या धर्तीवर या विवाह सोहळ्यात संरक्षण दलातील माजी सैनिकांचा हातात तिरंगा ध्वज देऊन शाल फेटा आणि भेटवस्तू देऊन ३० वर्षापासून देशाची सेवा बजावलेले जवानांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान करून सैनिकाप्रती कृतार्थ झाल्याची भावना काशी जगद्गुरु श्री विश्वराध्य डॉक्टर मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांनी व्यक्त केले. माजी सैनिक महेश सिद्राम बुध्दे,ओमशंकर अण्णाप्पा निलंगी,उमेश सौदागरे,अर्जुन पवार,रमेश सुतार, सोमलिंग कोरे,कल्याण फुलारी,रावण धावरे,आनंद म्हाळप्पा बनसोडे, बाबर रुस्तम खान पटेल या माजी सैनिकांचा सन्मान झाला.




# सिद्धेश्वर तलावाच्या पाण्याची गुणवत्ता वाढवण्यासाठी कृती आराखडा सादर करा

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

### पाण्याचा पीएच कमी झाल्याने मासे व कासव यांच्या मृत्यूचे प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

मागील दहा-पंधरा दिवसात सिद्धेश्वर तलावातील मासे व कासव यांचा काही कारणामुळे मृत्यू होत असल्याची बाब निर्देशनास आली. तलावातील पाण्याचा पीएच कमी झाल्याने पाण्यातील जीवांना ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. तरी तलावातील पाण्याची शुद्धता व गुणवत्ता वाढवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने एका एजन्सीची नियुक्ती करून कृती आराखडा सादर करावा व ते काम सुरू करण्याचे आदेश १५ जून २०२५ पर्यंत द्यावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात सिद्धेश्वर तलावातील मासे व कासव यांच्या मृत्यूच्या कारणाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी सोलापूर महापालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, रवी पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, नगर अभियंता सारिका अंकुलवार, सार्वजनिक अभियंता वेंकटेश चोबे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की सार्वजनिक बांधकाम विभागाने पर्यटन विकास अंतर्गत सिद्धेश्वर तलावातील पाण्याची शुद्धता वाढवण्यासाठी एका खाजगी एजन्सीची नियुक्ती करावी. इरिएशन ट्रीटमेंट च्या माध्यमातून पाण्याची शुद्धता करून ऑक्सिजनचे प्रमाण वाढवावे ज्यामुळे मासे कासव व अन्य जलजीवांना धोका निर्माण होणार नाही. त्यासाठी एक कृती आराखडा सादर करून १५ जून २०२५ पर्यंत त्याचे काम सुरू होईल याची खात्री करावी असेही त्यांनी सुचित केले.

प्रारंभी या बैठकीत मागील काही दिवसापासून शुद्धेश्वर तलावातील मासे व कासव मृत्यू होत असल्याची घटना निर्देशनास आली होती. त्यांच्या मृत्यूचे कारणांची चर्चा होऊन पाण्याची अमलता वाढल्याने मासे व कासवांना ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाला व त्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती बैठकीत देण्यात आली.

# महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंतापदी तपन डंके

### व्यंकटेश चौबे यांच्याकडे स्मार्ट सिटी तांत्रिक अधिकारी पदाचा पूर्णवेळ कार्यभार



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० मे-**


महापालिकेच्या प्रभारी सार्वजनिक आरोग्य अभियंता पदाचा कार्यभार आता तपन डंके यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तर व्यंकटेश चौबे यांच्याकडे स्मार्ट सिटी तांत्रिक अधिकारी पदाचा पूर्ण वेळ पदभार देण्यात आला आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज हे आदेश काढले आहेत.

उपअभियंता तपन डंके हे सध्या पाणीपुरवठा वॉर रूमचे नियंत्रण अधिकारी पदाचे काम पाहत होते. डंके यांच्याकडे आता प्रभारी सार्वजनिक आरोग्य अभियंता पदाचा पदभार देण्यात आला आहे. तर प्रभारी सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे हे आता पूर्ण वेळ स्मार्ट सिटी तांत्रिक अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज हे आदेश काढले आहेत. सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागात महापालिका आयुक्तांनी महत्त्वाचे हे बदल केले आहेत.

नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या सभेत आ. सुभाष देशमुख यांनी निधी मंजूर होऊनही पाणीपुरवठा योजनेचे काम मार्गी लागले नाही असा आरोप केला होता. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही नाराजी व्यक्त केली होती. दरम्यान, महापालिकेच्या तीन अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेशही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले होते. काही दिवसानंतरच सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागात हा बदल करण्यात आला आहे.

### मिशन इम्पॉसिबलची 'इतकी' कमाई

**मुंबई :** भारतात हॉलिवूड चित्रपटांची क्रेझ असल्यामुळेच अनेक चित्रपट प्रथम इथे प्रदर्शित होतात. टॉम क्रूझचा मोठा चाहतावर्ग भारतात आहे.





त्याचा मिशन इम्पॉसिबल ८ म्हणजेच मिशन इम्पॉसिबल - द फायनल रेकनिंग हा चित्रपट भारतात प्रथम प्रदर्शित झाला. आता २३ मे रोजी अमेरिकेत प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाने भारतात रविवारी १७ कोटी रुपयांची कमाई केली. पहिल्या दिवशी या चित्रपटाने १६.५ कोटी रुपयांची कमाई केली. आतापर्यंत चित्रपटाने एकूण ३४.४९ कोटी रुपयाचा गल्ला जमवला आहे.

# भारतात कोरोनाचा पुन्हा शिरकाव... मुंबईत ५६ बाधित

**नवी दिल्ली, २० मे**

कोरोना विषाणूच्या संक्रमणाने संपूर्ण जग हादरुन गेले. यात अनेकांनी आपले आप्त गमवले. मागील काही काळापासून कोरोनाचे बाधित आढळणाऱ्यांच्या संख्येत घट झाली होती. मात्र आता सिंगापूर आणि हाँगकाँग सारख्या दक्षिण पूर्व आशियात कोरोना बाधितांची संख्या वाढते आहे. अशातच आता भारतात देखील कोरोनाचा शिरकाव झाला आहे. भारतात एकूण बाधित २५७ तर १६४ संशयित आहेत.




मुंबईत मंगळवारी बाधितांची संख्या ५६ झाली आहे. तर सक्रिय बाधितांचा आकडा ४४ ने वाढण्याची शक्यता आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने आशियातील काही भागांमध्ये कोरोना बाधितांची संख्या वाढत असल्याचे म्हटले आहे. मात्र महानगरपालिकेने शांतता राखण्याचे आणि पाळत ठेवण्याचे आवाहन केले आहे. तसेच नागरिकांना कोरोनाची लक्षणे दिसल्यास वैद्यकीय मदत घेण्याचा सल्ला दिला आहे. पुण्यात नव्याने एका वृद्धाला कोरोनाची लागण झाल्याचे समोर आले आहे. यामुळे राज्यात एकूण सक्रिय रुणांची संख्या ५७ वर पोहोचली आहे. यंदाच्या वर्षातील पुण्यातील हा पहिलाच रुग्ण असल्याने आरोग्य यंत्रणेत खळबळ उडाली आहे.

**कोरोनाचा नवा व्हेरिएन्ट जेएन १**

ओमिक्रॉनचा नवीन व्हेरिएन्ट, जेएन १ आणि त्याचे उप-प्रकार एलएफ ७ आणि एनबी १.८, संसर्गासाठी जबाबदार असल्याचे मानले जाते.

हा नवीन व्हेरिएंट अधिक धोकादायक असल्याचा पूर्वीपेक्षा वेगाने पसरत असल्याचा कोणताही पुरावा अद्याप मिळालेला नाही. दरम्यान, असा विश्वास आहे की, ही लाट कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती असलेल्या लोकांवर परिणाम करू शकते, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. (वृत्तसंस्था)

### भारतातील कोरोनाबाधितांची आकडेवारी

| शहर | बाधित | संशयित |
|---|---|---|
| दिल्ली | ०५ | ०३ |
| गुजरात | ०७ | ०६ |
| हरियाणा | ०१ | ०१ |
| कर्नाटक | १३ | ०८ |
| केरळ | ९५ | ६९ |
| तमिळनाडू | ६६ | ३४ |
| महाराष्ट्र | ५६ | ४४ |

एकूण बाधित २५७ आहेत. तर संशयित १६४ आहेत.

### बचावासाठी करा हे उपाय...

- कोरोनाच्या वाढत्या बाधितांमुळे गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरा.
- खोकताना, शिंकताना आपले तोंड आणि नाक झाका.
- आपले हात चांगले धुवा.

### भारताला काळजी करण्याचे कारण नाही

कोरोना आपल्याला विसरला, मात्र आपण कोरोनाला विसरायला काही तयार नाही. भारताकडे एक वाईट बातमी आहे आणि एक चांगली बातमी आहे. वाईट बातमी अशी आहे की, भारत कोरोनाबद्दल काहीही करू शकत नाही आणि चांगली बातमी अशी आहे, की भारताला काही करण्याची गरज नाही. भारताला कोरोनाबद्दल काळजी करण्याची गरज नाही. मात्र खबरदारी घेणे गरजेचे आहे. खबरदारी अशी की, आयुष्याचा पूर्ण आनंद घ्या, मजा करत आयुष्य जगा. भारतीयांकडे नैसर्गिक रोगप्रतिकारशक्ती आहे. यामुळे भारताला काळजीचे कारण नाही. हा काही नवा व्हायरस नाही. हे ओमिक्रॉनचेच व्हेरिएन्ट आहेत. ओमिक्रॉन गंभीर विषाणू असेल तर हे नवीन व्हेरिएंट त्यापुढे फारच कमकुवत आहेत.

**डॉ. रवी गोडसे,** अमेरिकेतील प्रसिद्ध डॉक्टर

### जेएन १ व्हेरिएन्ट काय आहे...

- जेएन व्हेरिएन्टची ओळख प्रथम ऑगस्ट २०२३ मध्ये झाली.
- हा ओमिक्रॉनचा सब व्हेरिएन्ट बीए.२.८६ नी तयार झाला आहे.
- २०२२ मध्ये बीए.२.८६ हा कोरोना बाधितांची संख्या वाढण्याचे मुळ कारण होते.

**हा व्हेरिएन्ट किती धोकादायक...**

जेएन १ स्पाइक प्रोटीनमध्ये एक अतिरिक्त उत्परिवर्तन आहे आणि ते रोगप्रतिकार शक्ती कमी करून सहजपणे संसर्ग करू शकते. अतिरिक्त उत्परिवर्तनांमुळे ते अधिक संसर्गजन्य होऊ शकते आणि वेगाने पसरू शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे.

जेएन.१ ची लक्षणे, इतर व्हेरिएन्ट आणि सब व्हेरिएन्टपेक्षा वेगळी आहेत की नाही हे अद्याप माहित नसल्याचे सीडीसीचे म्हणणे आहे.

**आरोग्य तज्ज्ञांच्या मते...**

भारतातील लोकांना आधीच ओमिक्रॉन व्हेरिएन्टसह अनेक सब व्हेरिएन्टचा सामना करावा लागला आहे आणि त्यांना लसीकरण देखील केले गेले आहे, त्यामुळे नवीन व्हेरिएन्टपासून गंभीर आजार होण्याचा धोका नाही.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# धर्मशाळा नाहीच, असूही नये

"जगभरातील निर्वासितांना सामावून घेण्यासाठी भारत म्हणजे धर्मशाळा (सार्वजनिक आश्रयस्थान) नव्हे," हा भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचा अभिप्राय धर्म-देशाच्या पल्याड राष्ट्रीयत्वाच्या अंगाने समस्त भारतीयांनी आणि त्यातही राजकीय पक्षांनी, सामाजिक धुरिणांनी समजून घ्यावा, असा आहे. लिट्टे या खतरनाक दहशतवादी संघटनेचा सदस्य राहिलेल्या श्रीलंकेतील एका नागरिकाच्या भारतात आश्रय मिळण्याची विनंती करणाऱ्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली. या नागरिकाला २०१८ मध्ये विशेष न्यायालयाने बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यांतर्गत दोषी ठरविले होते. त्याला १० वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली होती. मद्रास उच्च न्यायालयाने त्यात बदल करून शिक्षेचा कालावधी सात वर्षांवर आणला होता आणि शिक्षा पूर्ण झाल्याबरोबर भारत सोडून जाण्यासही त्याला सांगितले होते. याविरुद्ध हा श्रीलंकन नागरिक सर्वोच्च न्यायालयात गेला होता, ही या अभिप्रायाची पृष्ठभूमी. भारताने हजारो वर्षांपासून देशोदेशीच्या लोकांना त्यांच्या वैविध्यासह सामावून घेतले. परंतु, आता आपण १४० कोटींच्या वर झालेलो आहोत. आपले आणि आपल्या लोकसंख्येचे असंख्य प्रश्न आहेत. त्याकडे लक्ष द्यायचे की निर्वासितांना सामावून घेत स्वतःच्या प्रश्नांमध्ये भर घालायची, हे ठरविण्याची ही वेळ आहे, हा सर्वोच्च न्यायालयाच्या टिप्पणीचा मथितार्थ. त्यामुळेच तिला मानवाधिकार, मानवता इत्यादी दृष्टिकोनातून पाहण्याचे कारण नाही. या अभिप्रायाकडे भारताच्या निर्वासितांबाबतच्या धोरणाची स्पष्ट दिशा म्हणून पाहिले पाहिजे. १.४ अब्ज लोकसंख्येच्या भारतात आधीच अनेक अंतर्गत आव्हाने आहेत. अनेक आव्हानांचे स्वरूप अतिशय उग्र आहे. गृहनिर्माण, नैसर्गिक संसाधने आणि सामाजिक गरज म्हणून पायाभूत सुविधांवरील ताण अतिशय वाढला आहे. अनेक शहरांमध्ये पाण्याची गंभीर समस्या आहे. वेगाने होत असलेले शहरीकरण, बेरोजगारी, आरोग्यसेवेतील न्यून आणि शैक्षणिक सुविधांमधील तफावत हे गंभीर प्रश्न आहेत. ते सोडविण्यासाठी सरकार सक्रियपणे काम करीत आहे. अशा स्थितीत निर्वासित म्हणून एक व्यक्ती असो वा अनेक लोक, कुणालाही मान्यता देताना एक नव्हे, हजार वेळा विचार केला पाहिजे. एका व्यक्तीचा अर्ज सर्वोच्च न्यायालयाने मान्य केला असता तर त्यापाठोपाठ हजारो-लाखो अर्ज आले असते आणि या केसचे उदाहरण घेऊन त्यांना मंजुरी द्यावी लागली असती. देशात लाखांच्या संख्येत आजही शेजारच्या अनेक देशांतील निर्वासित आहेत, ही वस्तुस्थिती अमान्य करता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने श्रीलंकन नागरिकाचा अर्ज फेटाळून लावताना या एकाच अभिप्रायात हा विषय निकाली काढला आहे. कोणतीही अधिकृत कागदपत्रे नसलेले आणि देशाच्या सुरक्षेसाठी धोका निर्माण करू शकणारे निर्वासित हा कोणत्याही देशाच्या दृष्टीने अडचणीचा विषय असतो. त्याला मानवतावाद वगैरेंच्या पलीकडे जाऊन व्यावहारिक नजरेने पाहावे आणि हाताळावे लागते. आंतरराष्ट्रीय मानवतावादी जबाबदाऱ्यांचा विचार करण्याआधी भारत आणि भारतीय नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा विचार करावा लागतो. भारतातील सर्वांसाठी शिक्षण, आरोग्य, पाणी, घरकूल हे तर हवेच; शिवाय रोजगार निर्मिती, डिजिटल कनेक्टिव्हिटी, पायाभूत सुविधांचा विकास यातही सतत प्रगती होत राहणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारत सरकारने प्रधानमंत्री आवास योजना, जल जीवन मिशन आणि आयुष्मान भारत यासह अनेक पावले उचलली आहेत. या योजना भारतीय नागरिकांसाठी तयार केल्या आहेत. त्यात निर्वासितांची भर पडत राहिली तर यातली एकही योजना यशस्वी होणार नाही.

आपापल्या देशात छळ सोसलेल्या असंख्य लोकांसाठी आश्रयस्थान म्हणून भारताचे ऐतिहासिकदृष्ट्या सर्वांना माहिती आहेच. तिबेट, अफगाणिस्तान, बांगलादेश, म्यानमार अशा अनेक देशांमधील लोकांनी भारतात आश्रय घेतला. पूर्वी तर इराणसारख्या दूरच्या देशांतूनही निर्वासित येत असत. भारताची भौगोलिक स्थिती आणि सर्वसमावेशक अशी सांस्कृतिक-सामाजिक नीती यामुळे निर्वासितांसाठी भारत ही आशा आणि आधार होता. तो आजही आहेच. मोदी सरकारच्या नव्या धोरणानुसार छळ सोसत असलेल्या विविध धर्मांच्या लोकांना भारतात नागरिकत्व दिले जात आहे. मानवता आणि भारतीय संस्कृती अशा दोन्ही गोष्टींचा या धोरणाला आधार आहे. तथापि, भारताने विविध टप्प्यांवर परोपकाराची आणि औदार्याची किंमतही मोजली आहे, हे विसरून चालणार नाही. निर्वासित म्हणून आलेल्यांनी अनेकदा हैदोस केल्याची उदाहरणे आहेत. एका अनुमानानुसार सध्या भारतात दोन कोटींहून अधिक बेकायदेशीर स्थलांतरित लोक राहतात. आसाम, पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडील काही भागांमध्ये त्यांची संख्या अधिक आहे. अगदी मुंबई-पुणे-नागपुरातही अवैध स्थलांतरित होते व आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानशी झालेल्या संघर्षादरम्यान हे वास्तवही चव्हाट्यावर आले होते. ही अवैध लोकसंख्या सर्व प्रकारच्या यंत्रणा आणि व्यवस्थांवर ताण निर्माण करतात. अनेकदा जातीय आणि वांशिक संघर्षही त्यातून घडत असतात, हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे. आसामसारख्या राज्यात, बेकायदेशीर स्थलांतरामुळे लोकसंख्येचे संतुलन (डेमोग्राफिक बॅलन्स) बदलले आहे. त्यामुळे सामाजिक अशांतता निर्माण होण्याखेरीज आणि वांशिक स्वायत्ततेच्या मागण्या वाढल्या आहेत. मणिपुरातील स्फोटक स्थिती हे त्याचे जिवंत उदाहरण. नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) यांचे संदर्भ या पृष्ठभूमीवर समजून घ्यावे लागतात. बांगलादेशातून अंदाजे एक कोटींहून अधिक बेकायदेशीर स्थलांतरित भारतात आले आहेत. म्यानमारचे रोहिंग्या हजारोंच्या संख्येत भारतात आले आहेत. अफगाणिस्तान, तिबेटचेही निर्वासित आहेत. त्यापैकी काहींना भारत मान्यता देत आहे, हा भाग वेगळा. आणखी एक बाब लक्षात घ्यावी लागते आणि ती अशी की, मोठ्या प्रमाणात निर्वासितांच्या प्रवाहाच्या समस्येला तोंड देणारा भारत हा जगातील एकमेव देश नाही. अमेरिकेत इमिग्रेशन कायद्याची अंमलबजावणी हा निर्वासितांविषयीच्या धोरणाचा आधारस्तंभ. अमेरिकेत राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोका मानल्या जाणाऱ्या किंवा बेकायदेशीरपणे प्रवेश केलेल्या व्यक्तींना ताब्यात घेतले जाते आणि देशाबाहेर रवानगी केली जाते. ऑस्ट्रेलियाने बोटीतून येणाऱ्या निर्वासितांसाठी ऑफशोअर डिटेंशनचे धोरण स्वीकारले आहे. युरोपातील अनेक देशांना, विशेषतः सीरियन यादवी युद्धाच्या पृष्ठभूमीवर, प्रचंड दबावांचा सामना करावा लागला. सुरुवातीला जर्मनीने १० लाखांहून अधिक निर्वासितांचे स्वागत केले. परंतु त्यानंतर सामाजिक ताण निर्माण झाला. तेव्हापासून युरोपियन युनियनमधील सदस्य राष्ट्रांनी काही कठोर उपाय सुरू केले आहेत. मानवतेशी बांधिलकी असणे वेगळे आणि स्वतःच्या नागरिकांचे संरक्षण करणे वेगळे. मानवतावादाची गरज म्हणून दाखविले जाणारे औदार्य हे राष्ट्रीय प्राधान्यांशी संतुलित असलेच पाहिजे. बेकायदेशीर स्थलांतर आणि अनियंत्रित निर्वासितांच्या प्रवाहाविरुद्ध मोदी प्रशासनाने कडक दृष्टिकोन स्वीकारला आहे. सीमांवर कुंपण उभारणे, बायोमेट्रिक ट्रॅकिंग आणि आंतर-सरकारी चर्चांवरदेखील काम सुरू आहे. भारत मानवतावादी परंपरा सोडून देऊ शकत नाही. परंतु, राष्ट्रीय हिताशी तडजोडदेखील स्वीकारार्ह नसते. मानवी हक्क सिद्धांततः सार्वत्रिक असले, तरी सार्वभौम राष्ट्रांच्या सीमा सुरक्षित करण्याच्या, अंतर्गत शांतता, सौहार्द राखण्याच्या आणि आपल्या नागरिकांना संसाधनांचा वापर करण्यासाठी दिलेल्या अधिकारांच्या मोबदल्यात आत्यंतिक मानवतावादी व्हायचा प्रयत्न केला तर ते अंगावर उलटते, भारत ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याची आकांक्षा बाळगत असताना शांतता, स्थैर्य, कायदा-सुव्यवस्था आणि लोकसंख्या व्यवस्थापन हे आपले प्राधान्याचे विषय आहेत. आश्रयस्थान हे गरजूला दिले जाते आणि धर्मशाळा सर्वांसाठी असते. भारत हे गरजूंचे आश्रयस्थान होते आणि राहील. पण, ती धर्मशाळा नव्हे आणि तसे ते असूही नये, हे सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे शत-प्रतिशत खरे आहे.


## श्रद्धांजली

**निरंजन अभ्यंकर**

# महर्षी काळाच्या पडद्याआड

एक मे १९८९ मध्ये मी 'आयुका'मध्ये कामाला सुरुवात केली. तेव्हापासूनच म्हणजेच गेली ३६ वर्षे डॉ. जयंत नारळीकर यांचा सहवास लाभला. या प्रदीर्घ काळात एकत्र काम करताना अनेक आठवणींचा संचय तयार झाला. सरांच्या निधनाने त्या ताज्या झाल्या असून त्यांचे नसणे ही अत्यंत दुखद बाब आहे. सरांचे नाव निघताच कार्यरत असताना आणि निवृत्तीनंतरही सततचा त्यांचा उत्साही वावर डोळ्यासमोर येतो. थकल्यानंतरचा अलिकडचा काळ वगळता ते अधूनमधून संस्थेत येत असत. अगदी गेल्या वर्षीपर्यंत मी 'आयुका'मध्ये कार्यरत असल्यामुळे त्यांना भेटण्याची, चार शब्द बोलण्याची संधी मिळायची. प्रदीर्घ सहवासात या व्यक्तिमत्त्वाने मी पुरता भारावलो होतो. शास्त्र, गणित हे विषय आणि मराठी-इंग्रजी-हिंदी आणि संस्कृतवरील त्यांचे प्रभुत्व विलक्षण होते. नंतर त्यांनी फ्रेंच भाषेचाही अभ्यास केला होता. असा हा ज्ञानी, विद्वान शास्त्रज्ञ नानाविध गुणांनी संपन्न होता. वेळ पाळण्यात त्यांचा हात धरणारे क्वचितच कोणी असेल. ते आले की घड्याळ लावून घ्यावे, अशी ख्यातीच होती. केवळ ऑफिसमध्येच नव्हे तर, कोणत्याही समारंभ वा अन्य कार्यक्रमालाही ते दिलेल्या वेळेपूर्वी दहा मिनिटे हजर असत.

डॉ. नारळीकर यांना कोणतेही काम शंभर टक्के अचूक लागायचे. स्वतःचे योगदान शंभर टक्के असल्यामुळे स्वाभाविकच समोरच्या व्यक्तीकडूनही त्यांची तितक्याच अचूकतेची अपेक्षा असायची. 'आयुका'चे संचालकपद स्वीकारल्यानंतर त्यांनी आपल्या संशोधन कामाबरोबरच संयोजन आणि आर्थिक व्यवहार, हिशेब तपासणी यामध्येही जातीने लक्ष घातले. त्याविषयी जाणून घेतले. ते स्वतः उत्तम संयोजक होते. स्वाभाविकच त्यांच्याकडून आम्हाला यातील नेमकेपणा शिकायला मिळाला. अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्व असणारे जयंत नारळीकर सकारात्मक आणि सहज संभाषणाने, संवादाने समोरच्या व्यक्तीवरील तणाव अगदी सहज दूर करायचे. 'आयुका'मध्ये आलो तेव्हा मी अवघ्या २५ वर्षांचा होतो. तेव्हा त्यांच्याविषयी असणारी आदरयुक्त भीती अगदी शेवटपर्यंत होतीच. पण सरांनी नेहमीच आम्हाला समजून घेण्याची भूमिका घेतली. हातून काही चूक झाली तरी त्यांना मोकळेपणाने सांगता येईल, चुकीची कबुली देता येईल इतकी सहजता त्यांनी आपल्या कनिष्ठ सहकाऱ्यांबरोबरील नात्यामध्ये ठेवली. चूक कशी दुरुस्त करायची ते आपण बघू, हे त्यांचे समजुतीचे वाक्य आजही स्मरते. सुदैवाने तशी वेळ आली नाही, पण हा विश्वास खूप महत्त्वाचा होता.



'आयुका'मध्ये मी अकाऊंटंट म्हणून रुजू झालो. सुरुवातीला नारळीकर सर ज्येष्ठ लेखापालांकडून माझे काम तपासून घेत असत. विशेषतः आयकराशी संबंधित कामाची तपासणी व्हायची. पण तपासणीत एकही चूक आढळायची नाही, तेव्हा ते मोकळेपणाने पाठीवर हात टाकायचे आणि काम अचूक केल्याबद्दल कौतुकाचे शब्द बोलायचे. तेव्हापासून आमची त्यांच्यापुढे उभी राहण्याची भीती कमी झाली, असे मी म्हणेन. सरांनी विज्ञानक्षेत्रात हिमालयाच्या उंचीचे काम करुन ठेवले आहेच; खेरीज ते विविध भाषांमध्ये मांडले आहे. 'पुलं'च्या देणगीतून त्यांनी 'सायन्स मुक्तांगण विज्ञान शोधिका' स्थापन केली तेव्हा त्याचा उद्देशच लहान वयापासून मुलामुलींच्या मनात विज्ञानाची आसक्ती निर्माण करणे आणि पुढे त्यांना शास्त्रशाखेत कार्यरत होण्यास मदत करणे, हा होता. मुलांची विज्ञानविषयक संशोधनात रुची वाढवण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. अर्थातच यासाठी त्यांचे सहजसोपे लेखन कामी आले. यातून भारतालाच नव्हे तर समस्त विश्वाला प्रेरणा मिळाली. त्यांनी लावलेले शोध, मांडलेली सूत्रे, वैज्ञानिक गोष्टींची मांडणी जगाला अचंबित करणारी आहे. म्हणूनच जागतिक पातळीवर घेतल्या जाणाऱ्या अनेक कार्यशाळांमध्ये 'कॉस्मोलॉजी' या विषयावर त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याचा संदर्भ घेऊन अनेक व्याख्याने, चर्चासत्रे सुरू असतात. युट्युबवरही त्यांची अनेक व्याख्याने उपलब्ध आहेत.

विज्ञानासारख्या किचकट क्षेत्रामध्ये हरवून जाणारे सर विनोदी प्रवृत्तीचे होते. ते कधी कधी असे एखादे वाक्य बोलायचे की, पुढचा बराच काळ चेहऱ्यावरील हास्याची लकेर पुसली जायची नाही. त्याचबरोबर ते हजरजबाबी होते. संस्कृत भाषेचा उत्तम अभ्यास, ज्ञान असल्यामुळे वेळ पडेल तेव्हा ते काही वचने आणि अर्थ स्पष्टीकरणासाठी सांगायचे. इंग्रजीवर त्यांचे प्रभुत्व होते. म्हणूनच शास्त्राबरोबरीने त्यांच्या भाषेवरील प्रभुत्वाचे अपार कौतुक वाटायचे. अचूक शब्दाचा वापर ही त्यांची खासियत होती.

अशा या थोर व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव असणे अगदी स्वाभाविक आहे. एक आठवण सांगतो. तो दिवाळीतील एक दिवस होता. पण सुटीच्या दिवशी एका रिपोर्टचे काम करण्यासाठी त्यांनी मला ऑफिसमध्ये बोलावले होते. नऊ वाजता बोलावले असताना मी पावणे नऊच्या सुमारात ऑफिसमध्ये पोहोचलो आणि लेजर काढून हाताने कामाला सुरुवात केली. पाठोपाठ नऊच्या आधीच सर आले आणि लांबूनच मला काम करताना बघून गालात हसले. कदाचित तेथेच मी जिंकलो होतो. नंतर दुसऱ्या कामासाठी ते निघून गेले. काम संपवल्यानंतर मी काहीशा भीतीनेच घरी फोन करून त्यांना काम पूर्ण झाल्याचे सांगितले. त्यावर केलेले काम तेथेच ठेवून घरी जाण्यास त्यांनी मला सांगितले. त्यानंतर सुटी संपल्यानंतरच्या दिवशी वेळेआधीच ते आले. टेबलवरील मी ठेवलेला पेपर तपासला, काही सूचना केल्या आणि ठीक नऊ वाजता मी खाली मान घालून काम करत असताना समोर उभे राहत मला सुधारित काम पाठवून देण्याची सूचना दिली. यावेळी सुटीच्या दिवशी काम केल्याबद्दल कौतुक करायला ते विसरले नाहीत. आणखी एक आठवण म्हणजे, मी केलेले एक काम त्यांना पसंत नव्हते. इतरांनी चुकीच्या गोष्टी सांगितल्यामुळे मी केलेली आकडेमोड त्यांना चुकीची वाटत होती. पण काम अचूक असल्याच्या भूमिकेवर मीही ठाम होतो. असे असताना सरांनी मला थेट आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडे जाऊन केलेले काम योग्य असल्याची खातरजमा करण्यास सांगितले. खरे तर तसे होणे शक्य नव्हते. पण तरीही सरांच्या आग्रहाखातर मी तेथे गेलो. अपेक्षेप्रमाणे तेथे उत्तर मिळाले नाही. येऊन ही बाब मी सरांना सांगितली. त्यानंतर त्यांनी तीन-चार लेखापालांकडून काम तपासून घेतले. खेरीज दिल्लीला गेले असता तेथील विद्यापीठाच्या व्हाईस चान्सलरकडूनही हे काम तपासून घेतले. तेव्हा त्यांनीही काम अचूक असल्याचा निर्वाळा दिला आणि तुम्हाला त्या मानाने नाममात्र आयकर भरावा लागतोय, हे स्पष्ट केले. इतके सगळे झाल्यानंतर परत आल्यानंतर सर मला भेटले, पाठीवर हात ठेवला आणि केलेले काम बरोबर होते, असे स्पष्टपणे सांगितले. २५ व्या वर्षी प्रथम भेटीमध्ये पाहिले तेव्हा डॉक्टर झब्बा-पायजमा घालून, हातातील पिशवीमध्ये फणस सांभाळत येताना पाहायला मिळाले होते. ते तेव्हाही साधे होते आणि आतापर्यंत साधेच होते. वागण्या-बोलण्यातला साधेपणा त्यांनी तितक्याच सहजतेने जपला होता. त्यांची ती छबी, अदबीने बोलण्याची सवय कधीच विस्मरणात जाणार नाही. त्यांच्या रूपाने दररोज मला जणू सरस्वतीचेच दर्शन व्हायचे. आता ते होणार नाही. अनंतात विलीन झालेले सर, आमचे महर्षी स्मृतींमध्ये मात्र कायम होते तसेच राहतील.

(लेखक 'आयुका'चे माजी ज्येष्ठ कार्यकारी अधिकारी आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# पार्किंग समस्येचे विक्राळ स्वरूप

देशाच्या मोठ्या शहरांमध्ये असलेली पार्किंगची समस्या आता मध्यम, छोट्या व तालुका स्थानांवरच्या शहरांमध्येही पाहायला मिळत आहे. महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यांच्या मुख्यालयी आणि त्या अंतर्गत येणाऱ्या ३५८ तालुका स्थानांवरच्या शहरांमध्ये पार्किंगच्या समस्येने विक्राळ स्वरूप घेतले आहे. त्याची अनेक कारणे आहेत. वाहनांची वाढलेली संख्या व वाहन ठेवण्यायोग्य जागेची कमतरता हे त्यातले मूळ कारण आहे. राज्याची एकूण लोकसंख्या १२ कोटी ६३ लाखाच्या आसपास आहे आणि जवळपास ७.५ कोटी कुटुंबे आहेत. मोटर वाहन विभागाच्या नोंदीनुसार राज्यात सर्व प्रकारच्या वाहनांची संख्या ५ कोटींच्या आसपास झाली आहे. आकडेवारीनुसार, सर्वच कुटुंबांकडे वाहन नसल्याचे दिसते पण, काही कुटुंबांमध्ये जितकी माणसे तितकी वाहने आहेत. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात आणि त्यातही मध्यमवर्गीय व त्यापेक्षा समृद्ध लोकांकडे वाहनांची संख्या जास्त पाहायला मिळते.

वाहनांच्या वाढलेल्या संख्येमुळेच पार्किंग व वाहतूक कोंडीच्या समस्येने उचल घेतली आहे. विदर्भातल्या ११ जिल्ह्यांच्या मुख्यालयी शहरांमध्ये नसलेली पार्किंग व्यवस्था व त्यातून निर्माण होणारी वाहतूक कोंडी दररोज चर्चेचा विषय असते. या शहरातल्या कोणत्याही मुख्य आणि उपबाजारपेठत जा तुम्हाला चारचाकी तर सोडाच दुचाकी ठेवायला सुद्धा लवकर जागा मिळत नाही. त्याचा खूप मनस्ताप होतो. अगदी एका हाताच्या बोटावर मोजता येईल इतक्याच दुकानदारांकडे फक्त दुचाकी ठेवायला जागा असते. उर्वरित दुकानदारांकडे त्यांची आणि त्यांच्या दुकानात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वाहने ठेवायलाही जागा नसते. अशा स्थितीत ग्राहकांनी वाहने कुठे ठेवायची हा मोठा प्रश्न आहे. सर्वांसाठी दुखणे झालेली ही समस्या सोडवायची कशी यासाठी काहीच उपाययोजना होताना दिसत नाही. उलट नो पार्किंग झोन तयार करण्यात आले आहेत. तेथे वाहन ठेवले तर कारवाई करून दंड ठोठावला जातो. मग लोकांनी वाहने ठेवायची कुठे? या प्रश्नाचे उत्तर कारवाई करणाऱ्या वाहतूक पोलिसांकडे तर अजिबातच नाही आणि स्थानिक स्वराज्य संस्थेला त्याचे देणेघेणे उरलेले नाही. याच संस्था पार्किंग समस्येसाठी जबाबदार आहेत. कारण, नियम धाब्यावर बसवून बांधकामाची मंजुरी कोणी दिली? लोकांकडे पर्याय नसल्याने रस्त्याच्याकडेला असणाऱ्या फुटपाथवर दाटीवाटीने वाहने ठेवली जातात. त्यामुळे पादचारी मुख्य रस्त्यावरून चालतात. सोबतीला धावणारी वाहने असल्याने वाहतूक कोंडी होते. ज्यांनी चारचाकी घेतल्या आहेत, अशा ६० टक्के लोकांकडे पार्किंगसाठी जागा नाही. ही मंडळी घराच्यासमोर म्हणजे रस्त्याच्या काठावरच गाडी लावतात. कोणत्याही मोहल्ल्यात, कॉलनीत, गल्लीत फेरफटका मारा चित्र अगदी स्पष्ट दिसेल. येणाऱ्या जाणाऱ्यांना त्याचा त्रास होतोच. वाहनांची संख्या वाढत असल्याने प्रदूषणात होणारी वाढ ही आणखी एक वेगळीच समस्या आहे.

पार्किंग समस्येवर उपाय शोधणे अत्यावश्यक झाले आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि सोयीस्कर करणे, वाहतूक व्यवस्थापनात सुधारणा करणे, मोठ्या शहरांमध्ये स्मार्ट पार्किंग व्यवस्था उभारणे, मध्यम शहरात जास्त पार्किंग सुविधा निर्माण करायला प्राधान्य हवे. बेकायदेशीर आणि चुकीच्या पद्धतीने पार्किंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, हा तात्पुरता इलाज आहे. हा रोग कायमस्वरूपी बरा करायचा असेल तर उपरोक्त उपयांशिवाय पर्याय नाही. जानेवारी महिन्यात परिवहन विभागाने पार्किंग समस्या सोडविण्यासाठी एक प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केला. त्या प्रस्तावानुसार चारचाकी वाहन खरेदी करण्यापूर्वी इच्छुकाला वाहन पार्क करण्यासाठी पुरेशी जागा असल्याचे प्रमाणपत्र (सर्टिफाईड पार्किंग एरिया (सीपीए) दाखवणे अनिवार्य असेल. तसेच १५ वर्षांपेक्षा जास्त कालावधीच्या वाहनांचे नूतनीकरण करताना हे प्रमाणपत्र दाखवावे लागेल, तरच त्यांना फिटनेस प्रमाणपत्र दिले जाईल. सध्या हा प्रस्ताव प्राथमिक टप्प्यात आहे. चर्चा सुरू असून मंजुरी मिळते की नाही हे पाहावे लागेल. मोठ्या शहरातील पार्किंग समस्येवर मार्ग काढण्यासाठी राज्यात लवकरच 'एकात्मिक पार्किंग धोरण' आणण्याचा विचार परिवहन विभाग करत आहे. या धोरणाची प्राथमिक अंमलबजावणी मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणामध्ये करण्याचे नियोजन आहे. सदर दोन्ही प्रस्ताव अंमलात आणण्याला हरकत नाही. पण, त्याची अंमलबजावणी काटेकोर व्हायला हवी. इतर देशात पार्किंग समस्या सोडविण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, त्याचाही अभ्यास होणे नितांत गरजेचे आहे. संपूर्ण अभ्यास करून एक व्यापक धोरण संपूर्ण राज्यासाठी ठरविण्याची वेळ आता आली आहे.

९४२०७२१२२५

## 'विज्ञानाचा वारकरी'

विज्ञानाची गंगा नेली
ज्यांनी घरोघरी
थोर गणिती, ज्ञानमहर्षी
गेले देवाघरी

शिकविले ग्रहगोल निरीक्षण
काळोखातील रात्री
आकाशाशी नाते जोडून
गेले खगोलशास्त्री

विज्ञानाचा वारकरी हा
लेखक शास्त्र कथांचा
विज्ञानाची गोडी लावली
राखुनी मान प्रथांचा

संतुलित, समतोल, विचारी
मितभाषी अन तृप्त
विद्यापीठ जणू 'जयंत' रुपी
पद्मविभूषण प्राप्त

गणिताच्या नावाने केवळ
जे घाबरती, दमती
त्यांच्यासाठी तुम्ही शिकविल्या
गणिती गमतीजमती

विश्वस्तरावर गुणवत्तेने
दिव्य लाभली कीर्ती
विज्ञानाच्या गाभाऱ्यामध्ये
कायमस्वरूपी मूर्ती

खास हातोटी संवादाची
विशेष शाब्दिक कला
ध्रुवताऱ्याच्या उंचीचा पण
माणूस साधा भला !

आज खरोखर जडले तुमचे
'आकाशाशी नाते'
तुमच्या साठी स्वागतगीतही
आकाशगंगा गाते !

- मुरारी देशपांडे, 'संगमनेरी'
९८५०४१५७४४

# माणुसकीचा खळाळता झरा 'डॉ. जयंत नारळीकर'

जागतिक कीर्तीचे खगोल शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनाची बातमी अतिशय दुःखदायक आहे. या थोर शास्त्रज्ञाला शतशः प्रणाम. या महान शास्त्रज्ञाच्या मनातली माणुसकी दाखवून देणारी एक आठवण आज मनात पुन्हा प्रज्वलीत झाली. ६ मे २०१३ च्या साप्ताहिक सकाळमध्ये मी एक लेख लिहिला होता. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत वाढलेल्या एका कामगाराच्या पत्नीने आपल्या हिंमतीवर धावपटू म्हणून कसं नाव कमावलं याची ती यशोगाथा होती. जिचं सगळं लहानपण आईच्यामागे खुरपणी करत धावण्यात गेलं अशा संगीता खंडागळे हिची ही कर्तृत्व गाथा होती. शाळेचं तोंडहि न पाहिलेली व दिवसाला २ रुपये मजुरी मिळवणारी ही मुलगी लग्नानंतर पुण्यात आली. बोपोडीतल्या एका झोपडपट्टीसदृश वसतीत तिचा संसार सुरु झाला. तिनेच सांगितलेल्या तिच्या कहाणीत नारळीकर दांपत्याच्या मनातला माणुसकीचा झरा मला ऐकायला मिळाला.

आपल्या जिद्दीवर तिनं अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धातली सुवर्णपदकं पटकावली होती.



पुण्यात एकदा तिनं मॅरॅथॉन स्पर्धा पाहिली. मला असं पळता येईल का असा भाबडा प्रश्न तिनं तिच्या नव-याला विचारला. तेथून ती पळण्याच्या इर्ष्येने झपाटली गेली. त्यानंतर सुरु झाली तिची अखंड मेहनत. साडी नेसणा-या व पायात स्लिपर घालणा-या संगीताताईंनी विद्यापीठाच्या ग्राऊंडवर पळण्याचा सराव सुरु केला. भल्या पहाटे ती पळायला जात असे. घरी लवकर परतण्याची घाई होती, कारण दोन छोट्या मुलांना घरी झोपवून ती पळायला यायची. दोन चार दिवस गेले. मुलं घरी उठून रडायला लागली. शेवटी मुलांना बरोबर घेऊन ती जायला लागली. एका झाडाखाली मुलांना बसवून ती त्यांच्या अवती भवती, तिथल्या तिथं धावायची. मुलं घाबरतील या भीतीनं तिला दूरवर जाता येत नव्हतं.

योगायोगाने एक दांपत्य तिथं रोज फिरायला येत असे. साडी वर खोचलेली ही बाई अनवाणी पायांनी तिथल्यातिथं धावत असल्याचं पाहून त्यांचं कुतुहल चाळवलं गेलं. त्यांनी तिची चौकशी केली. आम्ही तुझ्या मुलांकडे पाहतो, तू पाहिजे तेवढं लांब जात जा असं त्यांनी तिला सांगितलं आणि मग तो रोजचाच परिपाठ सुरु झाला. ते दांपत्य म्हणजे डॉ. जयंत नारळीकर आणि त्यांच्या पत्नी मंगलाताई. थंडी वाढायला लागली. मुलांना इथं त्रास होईल. तेंव्हा तू त्यांना आमच्या घरीच सोडत जा असं त्या मॅडम संगीताला म्हणाल्या. संगीतालाही ते पटलं. मुलांना त्यांच्या घरी सोडून ती पळण्याचा सराव करायला लागली. त्या काळात दोघेहीजण त्या मुलांची काळजी घेत, त्यांचं खाणं पिणं बघत. मॅडमनी त्यातल्या थोरल्याला थोडं शिकवायलाही सुरुवात केली. काही दिवस गेले. घरी टी.व्ही. वरच्या एका कार्यक्रमात संगीताने नारळीकरांना पाहिलं आणि ती चमकलीच. दुस-या दिवशी, तुम्ही डॉ. नारळीकर का?, असं तिने थेट डॉक्टरांनाच विचारलं. तेंव्हापासून या परिवाराशी तिचा स्नेह जडला. तिच्या मुलींच्या लग्नाला हे दांपत्य आवर्जून उपस्थित होतं. मोठं मन म्हणजे आणखी वेगळं काय असतं ? शाळा न शिकलेल्या, पहिली स्पर्धा बूट न घालता पळणा-या संगीताने पुढे देशोदेशीच्या स्पर्धेत भाग घेतला. अनेक पदकं पटकावली. ही सगळी कथा त्या लेखात मी लिहिली होती. डॉ. नारळीकरांचे निधन झाल्याची बातमी ऐकून मला ती कहाणी आठवली. माणुसकीचा एवढा खळाळता झरा ज्याच्या मनात वाहतो त्याला देवमाणुसच म्हटलं पाहिजे.

**- भगवान दातार**
**bhagwandatargmail.com**

## वाचक पत्रे

### ऑपरेशन सिंदूर अणि आयपीएल

पहलगाममधे पाकिस्तान प्रायोजित निष्पाप प्रवाशांवर अतिरेक्यांनी त्यांचा धर्म विचारून गोळ्या घातल्या. चीड आणणारी गोष्ट म्हणजे पत्नीसमोर नवऱ्यावर व मुलांसमोर त्यांच्या वडिलांवर गोळ्या घालून मारले. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारत सरकारने ऑपरेशन सिंदूर अभियान राबविले व दहशतवाद्यांची नऊ ठिकाणे नेस्तनाबूत केली. तसेच पाकिस्तानचे एअरबेस उडवले. विविध भारतीवर सुद्धा भारत सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी व तिन्ही सेनांचे अभिनंदनपर संदेश प्रसारित केले जात आहेत. युद्धामध्ये अगदी तरुण मुले सुद्धा हुतात्मा झाले आहेत. त्यांचे फोटो पाहून डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहत नाही. पण एक संस्था अशी आहे की, जिला या गोष्टींचे काहीच घेणे देणे नाही. सध्याची परिस्थिती पाहता आयपीएलचे सामने दहा दिवसांकरिता स्थगित केल्याची घोषणा बीसीसीआयने पत्रपरिषदेत केली. हे वाचून खूपच गहिवरून आले व त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला. वाटले की क्रिकेट हा खेळ त्यातल्या त्यात आयपीएल म्हणजे पैसे कमावणारा खेळ नाही आहे. पण दोनच दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात वाचले की, आयपीएलचे खेळाडू १७ तारखेपासून पुन्हा पैसे कमावण्यासाठी कंबर कसून तयार झाले. पैशाच्या पुढे सगळेच क्षम्य आहे. सरकारचे चिलखत त्यांच्या अंगात, मग काय विचारता? विधवा झालेल्या स्त्रिया, पोरके मुलं, आई-बाप हे स्वतःच स्वत:ला पाहत बसतील. क्रिकेट चाहते टीव्हीवर आयपीएलचे सामने डोळे भरून पाहतील.

**राजेंद्र मनोहर वाडी**/नागपूर

### यांत्रिक युगात नाती जपावी

तरुण भारत 'आसमंत'मधील डॉ. अविनाश मोहरील यांचा 'नात्यांचा मेंटेनन्स' हा अतिशय समर्पक असा लेख वाचला आणि तो मनाला भावला. आजचे युग हे यांत्रिक आहे. विज्ञानाने प्रगती केली आणि माणसाच्या सुखासाठी अनेक यंत्रे निर्माण झाली. काही तासांचे काम काही मिनिटांत होऊ लागले. असे करता करता माणसे देखील यंत्रवत झाली की काय असे वाटायला लागले आहे. भावना हरवत चालल्या आहेत की काय ही भीती वाटते आहे. आज संवादाची अनेक माध्यमे समोर असताना संवाद दुरावत चालला आहे ही जाणीव होते आहे. नाती टिकून राहावी हा प्रयत्न दोन्ही बाजूने व्हायला हवा तरच तो यशस्वी होतो. आज घरात अनेक यंत्रे आहेत आणि त्याचे मेंटेनन्स देखील अगदी त्या त्या महिन्यात, त्या त्या तारखेला केले जाते. तसे घरातील नात्यांचे मेंटेनन्स सुद्धा व्हायला हवे. त्यातून मनातील गैरसमजाची धूळ झटकून मन स्वच्छ केले पाहिजे. वर्षानुवर्षे चढलेली ही धुळीची पुटं हळूहळू नातीच दिसेनाशी करतात आणि मग उशीर झाला की ती सावरता सावरता अवघड होऊन जातं. आपल्या संस्कृतीत सण, उत्सव, सोहळे साजरे केले जातात. खरं पाहिलं असता हा सण उत्सवाचा काळ नात्यांचे मेंटेनन्सच करत असतो अगदी सहजपणे. घरात स्त्री असो की पुरुष अनेक नातीही असतातच. काही रक्ताची तर काही मुद्दाम जोडलेली नाती असतात. या नात्यात ओरखडे येऊ नये याची काळजी दोघांनीही घेतली पाहिजे. त्यासाठी वाद नाही तर सुसंवाद आवश्यक आहे. केवळ एकाच बाजूने विचार न करता मी त्या जागेवर जाऊन विचार करायला हवा म्हणजे उत्तर सापडेल. शब्दांची जादू फार मोठी आहे. शब्द जोडतात आणि शब्दच तोडतात त्यामुळे शब्द जपून वापरायला हवेत.

कधी माफी मागणे आणि माफ करणे हे देखील करता यायला हवं. उगाच अट्टहास इथे काही कामाचा नाही हा विचार केला पाहिजे. जीवनाच्या या वळणावर आनंदाचे झाड लावायचे. मैत्रीच्या नात्यांची फुले बहरू द्यायची, तरच हे आयुष्य सुंदर होईल यात शंका नाही.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

### पर्यटनांच्या संधी व आनंद

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दळणवळणाच्या अनेक सोयी केल्या आहेत. चौपदरी रस्ते, उड्डाण पूल, भुयारी मार्ग व द्रुतगती मार्ग व बरेच. त्यमुळे देश जोडला गेला आहे. अगदी अंतर्गत भागात राहणारे लोक सुद्धा आता शहरी भागांना जोडले गेले आहेत. बसच्या सोयी वाढल्या आहेत. खाजगी वाहनांनी लोक भरपूर प्रवास करू शकतात. म्हणूनच महाकुंभ मेळ्याला एवढे लोक जाऊ शकलेत. याबरोबरच रेल्वेच्या सोयी वाढल्या आहेत. विशेष गाड्या आहेतच. वंदे भारतने खूप सोय झाली आहे . **- प्रा. अंजली पळणीकर/नागपूर**

# काय तो चिखल...काय ते खड्डे अन् काय ते साचलेले पाणी...

## पहिल्याच पावसात सोलापूरच्या रस्त्याची उडाली धुळधान




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मे-**

स्मार्ट सिटीच्या पंगतीत बसलेल्या सोलापूर शहराची अवस्था पहिल्याच पावसात उघड्यावर आलेली आहे. मंगळवार दि. १३ मे रोजीच्या रात्री अचानक शहरात धुवाधार पावसाची हजेरी लागली. मोसमीपूर्व पावसाचा पहिला तडाखा सोलापूर शहराला जाणवला. पहिल्याच पावसात शहरातील रस्त्यांची अक्षरशः धूळधाण उडाली. काय तो चिखल काय ते खड्डे अन खड्ड्यात साचलेले पाणी अशी गत सोलापूर शहराची दिसून आली. तदनंतर दररोज संध्याकाळी पावसाच्या शिडकाव सुरू राहिला. आठवड्यानंतर देखील मंगळवार दि.२० मे रोजी देखील पावसाने हजेरी लावत सर्वत्र पाणीच पाणी केले. अनेक सखल भागात पावसाचे पाणी साचले त्यातून खड्डे उघडे पडले. अशा परिस्थितीत वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागली. चुकीच्या पद्धतीने बनवलेल्या रस्त्यांमुळे रस्त्याच्या मधोमध पाणी साचले गेले. याचा नाहक मनस्ताप नागरिकांना तसेच वाहनधारकांना सहन करावा लागला. खड्डे चुकवण्यासाठी नागरिकांना चुकीच्या दिशेने वाहन चालवण्याची आवश्यकता भासली.

शहरातील अनेक सखल भागात पाणी साचल्याने वाहनधारकांना तसेच नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला. काही ठिकाणी पाण्यात वाहने रुतून बसलेली दिसून आली. तर काही ठिकाणी रस्तेच उघडलेले पहावयास मिळाले. गत मान्सूनवेळी गणेश पेठ शॉपिंग सेंटर येथे मोठ्या प्रमाणात पाणी साचलेले दिसून आले होते. कुंभारवेस मधील नाल्यामध्ये वाहनधारकाला आपला जीव गमवावा लागला होता. शहरातून तसेच शहराबाहेरून वाहणाऱ्या नाल्यातील अस्वच्छता आणि गाळ काढण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र प्रशासनाला अशी धोक्याची परिस्थिती माहिती असताना, देखील मान्सूनपूर्वकामे करण्यात झालेली दिरंगाई प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे.

हद्दवाढ भागातील अनेक रस्ते खचलेले रुतलेले खड्ड्यांचे साम्राज्य पडलेले आहेत. या रस्त्यावरून ये - जा करताना वाहनधारकांना आपला जीव मुठीत धरावा लागतो. अशा या अपघाताचा सापळा बनलेल्या रस्त्यांचे नूतनीकरण करणे गरजेचे होते. मात्र त्याकडेही प्रशासनाने दुर्लक्ष केलेले दिसत आहे. काही रस्त्यांवर पथदिवे बंद स्वरूपात आहेत. तर काही रस्त्यांवर दिव्याच्या अभावी अंधार पसरलेला दिसून येतो. अशा अवस्थेत देखील अपघाताचा धोका बळावतो आहे. महापालिका प्रशासनाने याकडे लक्ष देऊन सदरची मान्सूनपूर्व उर्वरित कामे तात्काळ पूर्ण करावीत, अशी मागणी आता नागरिकांमधून केली जात आहे.

### स्मार्ट सिटीत विदारक चित्र

दरम्यान, हवामान खात्याने सोलापूर शहर व जिल्ह्याला पावसाचा अलर्ट दिला होता. त्यानुसार पावसाने देखील शहर जिल्ह्यात हजेरी लावली. मे महिन्यातील अवकाळी मौसमीपूर्व पावसाने शहरवासियांची तसेच प्रशासनाची झोप उडवली. रात्री अचानक पावसाची हजेरी त्यानंतर विजेचा लपंडाव हा ठरलेला. रात्री नंतर आता दिवसा आणि संध्याकाळी अवकाळी पाऊस बरसात असल्याने नागरिकांना घराबाहेर पडताना छत्री रेनकोट यांचा आधार घ्यावा लागत आहे. असे असताना दुसरीकडे मात्र प्रशासनाच्या मोसमीपूर्व कामाची मोठी तारांबळ उडालेली दिसत आहे. इतक्यात पाऊस येणार नाही. या अविर्भावात असणाऱ्या प्रशासनाला अवकाळी पावसाने थाळ्यावर आणलेले दिसत आहेत. वास्तविक पाहता मान्सूनपूर्व कामांमध्ये नालेसफाई, रस्त्यांची डागडुजी, रस्ते डांबरीकरण करणे, तसेच दिवाबत्ती अशा विविध कामांचा समावेश आहे. मात्र अवकाळीच्या एका तडाख्यात मोसमीपूर्व कामात प्रशासनाकडून दिरंगाई झाल्याचे निदर्शनास येत आहे.

## महत्वाचे...



### ओमराजे मगरचा सरपंचांच्या हस्ते सत्कार

**सोलापूर, दि. २० मे-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील सरस्वती विद्यालयात दहावी परीक्षेत ९६.२० टक्के गुण मिळवुन प्रशालेतून प्रथम क्रमांक मिळविलेल्याबदल ओमराजे मगर याचा सांगवी (काटी) येथील छत्रपती शिवाजी मित्र मंडळाच्या वतीने सरपंच अमोल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ओमराजे याने दहावीच्या विद्यार्थ्यांमधे सर्वाधिक गुण मिळवून गावातूनही त्याने प्रथम क्रमांक मिळविला आहे तर रजनी दादाराव मगर हीने ९३ टक्के गुण मिळवून यश मिळविले. याबद्दल सोमवारी या दोघा विद्यार्थ्यांचा छत्रपती शिवाजी मित्र मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच अमोल पाटील, महेश पाटील, आण्णासाहेब मगर, रणजीत पाटील, सतीश शेळके, अखिल मुलाणी, विश्वजित पाटील, आबा पाटील, शंकर मगर, साधु शिंदे, ज्ञानेश्वर मगर, उषा मगर, दादा मगर उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांसाठी यूवातर्फे नव्या पेन्सिली सादर

**सोलापूर, दि. २० मे-**

नवनीत एज्युकेशनच्या यूवा या स्टेशनरी ब्रँडने रंगीबेरंगी आणि उठावदार अशा यूवा रिट्झ आणि यूवा ड्रीमी या नव्या पेन्सिली सादर केल्या आहेत. व्यक्तिमत्त्व, उपयुक्तता आणि परवडणारी किंमत यांचा सुरेख मेळ असलेल्या नव्या डिझाइनमुळे या पेन्सिली विद्यार्थी, क्रिएटर्स आणि शैलीदार लेखनाची आवड असलेल्या प्रत्येकासाठी उपयुक्त ठरणार आहेत. रिट्झ आणि ड्रीमी या पेन्सिलींमध्ये स्मूथ व ठळक रेषांसाठी अल्ट्रा-डार्क २बी लीड आहे.रिट्झ आणि ड्रीमी पेन्सिलींच्या प्रत्येक पॅकमध्ये १० पेन्सिली असून कल्पकता व वैयक्तिक स्टाइल झळकण्याच्या दृष्टीने त्यांची वैशिष्ट्यपूर्ण रचना आहे. या पेन्सिली संपूर्ण भारतात जवळच्या स्टेशनरीच्या दुकानांमध्ये आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध आहेत.

# खरीप हंगामात १ लाख ९४ हजार मेट्रिक टन बियाण्याची आवश्यकता

**२ लाख ८६ हजार मेट्रिक टन खताची मागणी**

**२ लाख ३२ हजार मेट्रिक टन खताचे आवंटन मंजूर**

**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

खरीप हंगाम २०२५ साठी २ लाख ३२ हजार ३५६ मेट्रिक टन रासायनिक खतांचे अवांटन मंजूर झालेले असून, मार्च २०२५ अखेर एक लाख २२ हजार ५३१ मेट्रिक टन आवंटन शिल्लक आहे. खरीप हंगामाच्या ५ लाख ६ हजार ९२७ हेक्टर क्षेत्रासाठी १ लाख ९४ हजार ३७० मेट्रिक टन बियाण्याची आवश्यकता असून सार्वजनिक यंत्रणाकडे ११ हजार ५११ मेट्रिक टन, खाजगी स्तरावर ६८ हजार ३१९ मॅट्रिक टन तर शेतकऱ्यांकडे एक लाख १४ हजार ५४० मेट्रिक टन बियाणे उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी खरीप हंगाम २०२५ अंतर्गत दै. तरूण भारतशी संवाद साधताना दिली. जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना योग्य दराने व वेळेत खते बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने दक्ष राहावे. तसेच खते बियाणे विक्रेत्यांनी शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची लिंकिंग न करता खते बियाणे उपलब्ध करून दिली पाहिजेत. लिंकिंग करणाऱ्या संबंधित विक्रेत्यावर प्रशासनाकडून तात्काळ गुन्हे दाखल करावेत, असे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी देताच कृषी विभागानेही कडक पावले उचलली आहेत.

### कृषी विभागाच्या वतीने सॅम्पलची संख्या वाढविण्यात येणार

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी खते व बियाणे आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तसेच लिंकिंग होणार नाही यासाठी सर्व संबंधित विक्रेते व कंपनीची बैठक झालेली असून, त्यांना याबाबत कठोर निर्देश देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडे खरीप हंगाम २०२४ मधील सोलापूर जिल्ह्याचे ८१ कोटीची विमा भरपाई रक्कम बाकी असून, त्यातील ४८ कोटी हे बार्शी तालुक्याची रक्कम असल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही शेतकऱ्यांना बोगस खते व बियाणे मिळणार नाहीत यासाठी कृषी विभागाच्या वतीने सॅम्पल ची संख्या वाढवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### बोगस बियाणे-खते पुरविणाऱ्यांवर राहणार करडी नजर

कृषी विभागाकडून बोगस बियाणे व खते शेतकऱ्यांना पुरवठा होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यक बियाणं व खतांचे परीक्षण करण्यात येणार आहे. सॅम्पल तपासणीची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढविण्यात येणार आहे. आगामी खरिपात बोगस खते व बियाण्यामुळे शेतकऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात येणार आहे. खते विक्रेत्यांना शासनाकडून सर्व प्रकारचे सहकार्य मिळेल परंतु त्यांनी शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही या अनुषंगाने निविष्ठांची विक्री करावी, असेही आवाहन भोसले यांनी केले आहे.

### खते-बियाणे लिंकिंग करणाऱ्यांची गय नाही

खरीप हंगाम २०२५ च्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन व कृषी विभाग यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आवश्यक तेवढा खते व बियाण्याचा पुरवठा होईल यासाठी काटेकोर नियोजन चालू आहे. खताची लिंकिंग होणार नाही यासाठी पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिले आहेत. यामुळे जो कोणी लिंकिंग करेल त्या संबंधितावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. दरम्यान, लिंकिंग करून शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या कोणत्याही प्रवृत्तीची गय केली जाणार नाही.

**- शुक्राचार्य भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

### इन्फोसिस फाऊंडेशनकडून चौथ्या आवृत्तीची घोषणा

**सोलापूर, दि. २० मे-**

इन्फोसिस फाऊंडेशन या इन्फोसिसच्या परोपकार आणि सीएसआर विभागाने आपल्या आरोहण सोशल इनोव्हेशन ॲवॉर्ड्सच्या चौथ्या आवृत्तीची घोषणा केली आहे.आरोहण सोशल इनोव्हेशन ॲवॉर्ड्स २०२५ चे उद्दिष्ट भारतातील वंचित समुदायांवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पाडण्याची क्षमता असलेल्या अद्वितीय तंत्रज्ञान-आधारित उपायांचा विकास करणाऱ्या व्यक्ती, संघटना, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक उपक्रमांचा गौरव करून पारितोषिक देण्याचा आहे. इन्फोसिस फाउंडेशन प्रत्येक विजेत्याला ५० लाख रुपयांपर्यंत बक्षीस देण्याचे वचन देते. त्याची एकूण बक्षीस रक्कम २ कोटी रुपयांची आहे.आरोहण सोशल इनोव्हेशन ॲवॉर्ड्स २०२५ मध्ये शिक्षण, आरोग्यसेवा ,पर्यावरणीय शाश्वतता या तीन श्रेणींमध्ये अर्ज १५ जून पर्यंत स्वीकारले जातील.


**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि.अर्ज नं. २१/२०२५

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डी. यांचे कोर्टात**

**संतोष बाबणा सावळगी - अर्जदार**
**विरुध्द**
**कोणी नाही - सामनेवाला**

ज्याअर्थी कै. मल्लम्मा बाबण्णा सावळगी रा. बोरोटी बु., ता. अक्कलकोट, जि. सोलापूर ही मौजे बोरोटी येथे दि.२९/०९/२०२३ रोजी मयत झाली आहे. कै. मल्लम्मा बाबण्णा सावळगी यांच्या नांवे मौजे बोरोटी बु. येथे घरकुल बांधकाम करण्याकरीता महाराष्ट्र शासन ग्रामविकास व पंचायत राज विभाग प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ मंजूरी क्रमांक MH123786374 या आदेशाने रक्कम रु.१,५८,०००/- इतके अनुदान मंजूर झाले आहे. कै. मल्लम्मा बाबण्णा सावळगी यांच्या नांवे जमा असलेली अनुदान रक्कम संतोष बाबणा सावळगी यांना मिळणेकरीता व कै. मल्लम्मा बाबण्णा सावळगी यांचे संतोष बाबणा सावळगी हा कायदेशीर वारसदार असल्याचा वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता मे. न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केले आहे.

त्या अर्थी या नोटीसीने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत, कै. मल्लम्मा बाबण्णा सावळगी यांचा मृत्यू अथवा अर्जदार हे वारस नाहीत असे कोणाची कांही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठार्थ अथवा विरुध्द कोणाचे कांही म्हणणे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दि. ०१/०७/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे कै, मल्लम्मा बाबण्णा सावळगी यांचे वारस सर्टिफिकेट देण्यात येईल ही जाहीर प्रसिध्दीकरण दिली ता. १६/०५/२४

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सह.अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**अक्कलकोट**



**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर हद्दीबाहेरील मौजे खेड हद्दीतील **भूमापन गट नं.९४/२ पैकी सन्मीत्र नगर भाग-१** या नावाने ओळखले जाणारे बिनशती वसाहती मधील **प्लॉट नं. ८१ याचे क्षेत्र ९२.९४ चौ. मीटर** आणि **प्लॉट नं.९१ याचे क्षेत्र ९२.९४ चौ. मीटर**

**प्लॉट नं. ८१ ची चतुः सीमा :-** पुर्वेस :-ले.आ. रस्ता, दक्षिणेस: प्लॉट नं. ८०, पश्चिमेस प्लॉट नं. ९१, उत्तरेस :- प्लॉट नं. ८२

**प्लॉट नं. ९१ ची चतुःसीमा :-** पुर्वेस :- प्लॉट नं. ८१, दक्षिणेस: प्लॉट नं. ९२, पश्चिमेस ले. आ. रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. ९० येणेप्रमाणे चतुः सीमेतील खुले प्लॉट जागा त्यातील तदंगभुत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

या प्लॉट जागा **श्री. विनायक मनोहर पुलगम,** रा.सोलापूर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहेत. आमचे अशिल या प्लॉट जागा खरेदीने घेणार आहेत. तरीही वर नमूद प्लॉट जागेच्या संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. २०/०५/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ. १६२१/१/१, कुचन नगर,**
**सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**



म.ए. सोसायटीचे,

**महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर**

**नॅक मानांकीत A + दर्जा**

**प्रवेश देणे चालू आहे.**

- अकरावी/बारावी कला, वाणिज्य (मराठी व इंग्रजी माध्यम) विज्ञान, एच.एस.सी.व्ही.सी
- JEE/NEET व MHT-CET च्या परिक्षेसाठी स्वतंत्र वर्ग.
- पदवी बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.सी.ए., बी.एस्सी.सी.एस

**पदव्युत्तर -**
- एम.ए. - मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, भूगोल, अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र
- एम.एस्सी. - रसायनशास्त्र, दुग्धशास्त्र, कॉम्प्युटर मॅनेजमेंट
- एम.कॉम.
- MS-CIT

**सहसचिव** **सचिव** **उपाध्यक्ष** **अध्यक्ष**

**उपप्राचार्य** **प्राचार्य**



Classifieds

**पाहिजेत**

**हॉस्पिटलसाठी सिस्टर, लेडी रिसेप्शनीस्ट व आया पाहिजे. सारडा हॉस्पिटल, सम्राट चौक, सोलापूर**
**फोन : 9503062999**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



**KATARE SPINNING MILLS LIMITED**

REGD. OFFICE: 14/30 GROUND FLOOR, B WING, KATARE COMPLEX, GANDHINAGAR, BL. NO. 10 Solapur MH- 413006.
CIN: L17119PN1980PLC022962
Email: katarespinningmills@gmail.com
Ph.: 2623981, 2628581

**NOTICE**

In pursuant to Regulation 29 read with Regulation 33 and other applicable regulations of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Friday, 30 th May, 2025 at 04.00 P.M. at the registered office of the Company to, inter alia, consider and approve the Audited standalone financial results of the Company for the quarter and year ended on March 31, 2025.

A copy of this notice is also posted on the website of the Company www.katarespinningmillslimited.com and also on the website of the stock exchange at www.bseindia.com.

**FOR KATARE SPINNING MILLS LIMITED**

**SD/-**
**KISHORE KATARE**
MANAGING DIRECTOR
(DIN- 00645013)

**Place : Solapur**
**Date : 20/05/2025**


**जामश्री रिअलटी लिमिटेड**

सीआयएन :L17111PN1907PLC000258

नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र - 413 001 दूरध्वनी : 91 22 22872401 ईमेल आयडी : jammill1907@gmail.com वेबसाईट : www.jamshri.in

**31 मार्च 2025 रोजी संपलेल्या तिमाही आणि संपलेल्या वर्षाच्या कालावधी करिता लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरण** (रु.लाख)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेले वर्ष | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 31.03.2025 (लेखापरिक्षित) | 31.12.2024 (अलेखापरिक्षित) | 31.03.2024 (लेखापरिक्षित) | 31.03.2025 (लेखापरिक्षित) | 31.03.2024 (लेखापरिक्षित) |
| 1 | परिचलनातून एकूण उत्पन्न | 208.65 | 223.49 | 203.21 | 905.46 | 672.52 |
| 2 | कर आणि अपवादात्मक बाबीं पूर्वीच्या अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी नफा/(तोटा) | (41.68) | (34.10) | (27.53) | (136.92) | (318.57) |
| 3 | कर आणि अपवादात्मक बाबीं पश्च्यात अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) | (41.68) | (34.10) | (27.53) | (104.50) | (318.57) |
| 4 | कर पूर्वीच्या खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) | (4.76) | (4.86) | (4.99) | (19.30) | (21.57) |
| 5 | कर पश्च्यात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) | (4.76) | (4.86) | (4.99) | (19.30) | (21.57) |
| 6 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न ((समावेश नफा /(तोटा) (करपश्च्यात) कालावधीसाठी आणि इतर व्यापक उत्पन्न ( करपश्च्यात)) | (34.28) | (38.97) | (43.00) | (111.64) | (350.63) |
| 7 | समभाग भांडवल | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 |
| 8 | प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रु 10/- (अखंडित आणि खंडित परिचलनाकरिता) | 10/- | 10/- | 10/- | 10/- | 10/- |
| | अखंडित परिचलन प्रति शेअर कमाई मूलभूत व सौम्यिकृत | (0.60) | (0.49) | (0.39) | (1.50) | (4.56) |
| | खंडित परिचलन प्रति शेअर कमाई मूलभूत व सौम्यिकृत | (0.07) | (0.07) | (0.07) | (0.28) | (0.31) |

टिप :अ) उक्त लेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षाचा लेखापरीक्षक समितीने आढावा घेतला आहे संचालक मंडळाने त्यांच्या **मे 20, 2025** रोजी घेण्यात आलेल्या सभेत त्यांला मंजूरी दिली आहे.
ब) उक्त निष्कर्ष कंपन्या (इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस्) नियम, 2015 सुधारीत असल्या प्रमाणे आणि अधिनियमाच्या इतर संबंधित तरतूदींसह वाचाव्यात कंपन्या अधिनियम, 2013 च्या कलम 133 च्या अनुषंगाने कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने अधिसूचीत केल्याप्रमाणे इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस् (आयएनडी एएस) नुसार तयार करण्यात आलेले आहेत.
क) **31 मार्च 2025** रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाच्या आर्थिक निष्कर्षाच्या बीएसईकडे दाखल केलेल्या सविस्तर प्रारुपाचा उक्त एक उतारा आहे. संपूर्ण प्रारुप बीएसईची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.jamshri.in वर उपलब्ध आहे.

**तारीख : 20.05.2025**
**स्थान : सोलापूर**

**जामश्री रिअलटी लिमिटेड करिता**
**सही/ –**
**राजेश दामाणी**
**संयुक्त व्यवस्थापकीय संचालक**


**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, **डि व सब शहर सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे बोरामणी येथील गट नं. ३१०/१ क्षेत्र २ हे. ६२ आर. व गट नं. ३१०/२ क्षेत्र २ हे. ६२ आर. या दोन्ही जमिनीत पाडलेल्या प्लॉटस पैकी बिनशेती ॲमीनीटीज स्पेसचे क्षेत्र ५२५२.३१ चौरस मीटर इतके असून ५६५१४.८५ चौरस फुट इतकी आहे. यासी चतुः सिमा पूर्वेस गट नं. ३४१, पश्चिमेस : प्लॉट नं. १४८ ते १५४ दक्षिणेस: ९ मीटर रस्ता, उत्तरेस प्लॉट नं. १३७ ते १४६** येणेप्रमाणे खुला प्लॉट जागा त्यातील तदंगभुत वस्तुसह.

सदरहू मिळक्त १) मिलिंद नारायणराव घोगरे २) योगेश बाबुराव कैकाडे यांचे कुलमुखत्यारधारक योगेश विश्वनाथ नागोसे रा. बाळाभाऊ पेठ, संताजी मंदिर जवळ, नागपुर यांच्या कब्जे वहिवाटीची आहे. सदरचा खुला प्लॉट जागा त्यांनी आमचे अशिलास विक्री करण्याचे ठरवून आमच्या अशिलाकडून इसारापोटी रक्कम स्विकारून इसारा पावती आमच्या अशिलाच्या नावे लिहून दिली आहे. त्याप्रमाणे सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री त्यांनी आमचे अशिलास दिली आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचेही, कसल्याही प्रकारचे हक्क हितसंबंध, बोजा, दान, गहाण, लिन, लिज, जप्ती, वहिवाट, पोटगी, एकत्र कुटुंबाची मिळकत, अविभक्त हिस्सा, इसारापावती, कुलमुखत्यार, बक्षिसपत्र, साठेखत, खरेदीखत, वारसाहक्क अग्रहक्क न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचे कसलेही हक्क अधिकार वा व्यवहार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ०८ दिवसाचे आत खालील पत्यावर हरकत नोंदवावी. मुदतीत हरकत न आल्यास सदरचे दुकान गाळा निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदी करतील. तदनंतर सदर मिळकतीबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तार चालणार नाही व ती आमचे अशिलावर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली, **ता. १९/०५/२०२५**

**सही/-**
**कालिंदी डी. सुरते (स्वामी)**
**बी.कॉम. (ऑनर्स), एल.एल.बी.**
ॲडव्होकेट, नोटरी भारत सरकार
घर: ११७/८५, उमा नगरी, मुरारजी पेठ, सोलापूर - २
ऑफीस : गाळा नं. १८, दिवाणी न्यायालयासमोर, सिध्देश्वर पेठ, लोखंडवाला कॉम्पलेक्स, सोलापूर
मो.नं. ९४२२४६०२२८/९९२२७०२६२८
आमचे अशिलातर्फे


**जाहिर प्रसिध्दीकरण**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्या खालील नियम 1961 व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम 2014 मधील तरतूदीनुसार व मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा. पुणे यांचेकडील दिनांक 03/01/2025 रोजीच्या आदेशानुसार देण्यात आलेल्या अर्हता दिनांकानुसार प्राप्त झालेल्या सोलापूर जिल्हयातील खालील व वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी प्रारुप (कच्चा) मतदार यादीचे माहिर प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे.

**प्रारुप मतदारयादी प्रसिध्दी कार्यक्रम**

| प्रारुप मतदार यादी प्रसिध्द दिनांक | दावे/हरकत घेण्याचा कालावधी | हरकत न घेतलेल्या संस्थेची अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक | जिसनिअ यांचा हरकतीचा निर्णय देण्याचा दिनांक | दावे/हरकत आलेल्या संस्थेची अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|
| दि.21/05/2025 | दि.21/05/2025 ते दि.30/05/2025 | दि.05/06/2025 | दि.10/06/2025 | दि.13/06/2025 |

| अ.क्र. | संस्थेचे नाव (तालुका - सोलापूर शहर) | अ.क्र. | संस्थेचे नाव (तालुका -माढा) |
|---|---|---|---|
| 1 | बाणलिंग मागासवर्गीय औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्या., फोंडशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर | 5 | भाळवणी नं-2 विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., भाळवणी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| 2 | भैरवनाथ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., अंकोली, ता. मोहोळ, जि. सोलापूर. | 6 | तुंगत विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., तुंगत, ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| 3 | श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., शेलगाव-भाळवणी, ता. करमाळा, जि. सोलापूर | 7 | कोंढारकी नं-2 विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., कोंढारकी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| 4 | टाकळी (टें) विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., टाकळी, ता. माढा, जि. सोलापूर | 8 | रतनचंद शहा सहकारी बँक लि., मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर |

**टिप :-** उपरोक्त निवडणूक कार्यक्रम व प्रारुप मतदारयादी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर, ई ब्लॉक मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर, संबंधित तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, संस्थेचे कार्यालय, संबंधित ग्रामपंचायत/तलाठी कार्यालय व संस्थेच्या शाखा कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे याची नोंद घ्यावी.

**स्थळ:- सोलापूर**
**दिनांक :- 20/05/2025**

**सही/-**
**(करण गायकवाड)**
**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर**



# महत्त्वाचे

### हॉकी इंडिया लीग ५ जानेवारीपासून

**नवी दिल्ली :** हॉकी इंडिया लीगचा पुढील हंगाम ५ जानेवारी २०२६ पासून सुरू होईल. यामध्ये महिला गटात दोन नवीन संघांचा समावेश केला जाईल. त्यामुळे महिला गटात सहा संघ आणि पुरुष गटात आठ संघ सहभागी होतील. हॉकी इंडियाचे सरचिटणीस भोलानाथ सिंह यांनी माध्यमांना सांगितले की, परदेशी खेळाडू ख्रिसमस साजरा करून येऊ शकतील, यासाठी हिरो हॉकी इंडिया लीगचे वेळापत्रक ५ जानेवारीपासून ठेवले आहे. गेल्या वेळी ही स्पर्धा २८ डिसेंबर रोजी सुरू झाली होती. सात वर्षांनंतर पुन्हा सुरू झालेल्या लीगच्या पहिल्या हंगामात, एक हजाराहून अधिक खेळाडूंनी लिलावासाठी अर्ज केले होते. हॉकी इंडियाने सोमवारीच खेळाडूंसाठी ऑनलाईन नोंदणी खुली केली, जी २० ऑगस्टपर्यंत सुरू राहील. हॉकी खेळाडूंसाठी शिष्यवृत्तीसाठी ॲमिटी युनिव्हर्सिटी ऑनलाईन सोबत झालेल्या सामंजस्य करार कार्यक्रमादरम्यान बोलताना भोलानाथ म्हणाले की, पुढील हंगामात दोन नवीन महिला संघ खेळतील आणि लवकरच याची घोषणा केली जाईल. या लीगमध्ये फक्त आठ पुरुष संघ असतील पण महिला गटात सहा संघ खेळतील. संघ निश्चित झाले आहेत आणि वेळ आल्यावर ते जाहीर केले जातील. स्थळाबाबत चर्चा सुरू आहे. सर्व पक्षांशी बोलल्यानंतर, सामने किती शहरांमध्ये आयोजित करायचे आणि ते कोणत्या शहरात असतील हे ठरवले जाईल.

### मुंबई संघात विल जॅक्सच्या जागी जॉनी बेअरस्टा

**नवी दिल्ली :** पाच वेळा आयपीएल विजेत्या मुंबई इंडियन्सने जॉनी बेअरस्टो, रिचर्ड ग्लीसन आणि चरिथ असलंका यांना परदेशी खेळाडूंच्या गटाच्या जागी करारबद्ध केले आहे जे २६ मे रोजी संघाच्या शेवटच्या लीग सामन्यानंतर आपापल्या राष्ट्रीय संघात सामील होण्यासाठी रवाना होतील. इंग्लंडचा विल जॅक्स, दक्षिण आफ्रिकेचा रायन रिकेल्टन आणि कॉर्बिन बॉश २६ मे रोजी पंजाब किंग्ज विरुद्ध मुंबईच्या शेवटच्या लीग सामन्यानंतर परततील. आयपीएलच्या अधिकृत प्रसिद्धिपत्रकानुसार, विल जॅकची जागा इंग्लंडचा यष्टिरक्षक-फलंदाज जॉनी बेअरस्टो घेईल. त्याला ५.२५ कोटी रुपयांत खरेदी केले आहे. इंग्लंडचा वेगवान गोलंदाज रिचर्ड ग्लीसन रायन रिकेल्टनची जागा १ कोटी रुपयांना घेईल तर श्रीलंकेचा फलंदाज चरिथ असलंका ७५ लाख रुपयांना कॉर्बिन बॉशची जागा घेईल, असे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. मुंबई इंडियन्स संघ सध्या गुणतालिकेत पहिल्या चारमध्ये आहे आणि प्लेऑफमध्ये आपले स्थान निश्चित करण्यासाठी त्यांला बुधवारी दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध जिंकावे लागेल. मुंबई इंडियन्स बाद फेरीसाठी पात्र ठरल्यास, प्लेऑफ टप्प्यापासूनच तिन्ही बदली खेळाडू उपलब्ध असतील.

### ६५ टक्के चाहत्यांना हवा आरसीबी विजेता

**मुंबई :** इंडियन प्रीमियर लीगच्या सुमारे ६५ टक्के चाहत्यांना यावर्षी नवीन ट्रॉफी विजेत्याची अपेक्षा आहे आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) हा फेव्हरिट म्हणून उदयास येत आहे. एका सर्वेक्षणात हे आकडे समोर आले आहेत. हे सर्वेक्षण करणाऱ्या एका समूहाने म्हटले आहे की, ५ मे पर्यंत किशोर आणि तरुणांसह ५,००० हून अधिक क्रिकेट चाहत्यांमध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार, १२ टक्के चाहते दिल्ली कॅपिटल्सला विजेता म्हणून पाहू इच्छितात तर सात टक्के चाहते पंजाब किंग्जच्या बाजूने आहेत. या सर्वेक्षणात सहभागी झालेल्या बहुतेक लोकांना महेंद्रसिंग धोनीने लीगमध्ये खेळत राहावे अशी इच्छा व्यक्त केली आहे. उदयोन्मुख खेळाडूंमध्ये, राजस्थान रॉयल्सचा वैभव सूर्यवंशी चाहत्यांचा आवडता खेळाडू बनत असल्याचे दिसून येत आहे. ३१.४ टक्के चाहत्यांनी आयपीएल २०२५ मध्ये पदार्पण करणाऱ्या वैभव सूर्यवंशीला सर्वांत प्रतिभावान तरुण क्रिकेटपटू मानले आहे. त्याच्यानंतर मुंबई इंडियन्सचा अश्विनी कुमार दुसऱ्या क्रमांकावर होता, त्याला २१ टक्के चाहत्यांनी मतदान केले. ७८ टक्के चाहत्यांचा असा विश्वास आहे की इम्पॅक्ट प्लेअर नियमामुळे खेळ अधिक धोरणात्मक आणि मनोरंजक बनला आहे, तर २० टक्के चाहत्यांचा असा विश्वास आहे की हा नियम अष्टपैलू खेळाडूंसाठी अन्याय्य आहे.

### रौप्यपदक विजेते थायलंड ओपनमध्ये भाग घेणार

**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिम्पिकनंतर भारतीय महिला मुष्टियोद्ध्या त्यांच्या पहिल्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्यासाठी सज्ज आहेत. पुढील महिन्यात होणाऱ्या जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धेत भारतीय राष्ट्रीय विजेते सहभागी होतील तर रौप्यपदक विजेत्या २४ मे पासून सुरू होणाऱ्या थायलंड ओपनमध्ये भाग घेतील. पुरुष मुष्टियोद्ध्यांनाही हाच नियम लागू राहील. गेल्या वर्षी भारतीय खेळाडूंना आशियाई अजिंक्यपद स्पर्धा आणि स्ट्रँडजा मेमोरियल स्पर्धा यासह अनेक प्रमुख स्पर्धांपासून वंचित राहावे लागले. एप्रिलमध्ये झालेल्या जागतिक स्पर्धेत पुरुष खेळाडू आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये परतले.

# प्ले ऑफसाठी खेळणार मुंबई इंडियन्स, दिल्ली कॅपिटल्स

### मुंबईला रोहित शर्माचा अनुभव कामी येणार

◆ **मुंबई, २० मे**

प्ले-ऑफमधील एकमेव उपलब्ध स्थानासाठी आव्हानात्मक असलेले मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स बुधवारी येथे एकमेकांसमोर येतील तेव्हा सामना जिंकून आपला दावा मजबूत करण्याचा प्रयत्न करतील.

तथापि, मुंबईचा वरचष्मा असल्याचे दिसते. अतिशय खराब सुरुवातीनंतर संघाने जोरदार पुनरागमन केले आणि आता तो पहिल्या चारमध्ये आहे. दिल्लीची सुरुवात खूप चांगली होती पण गेल्या सहा सामन्यांमध्ये त्यांना फक्त एकच विजय मिळवता आला आहे.

सोमवारी लखनौ सुपर जायंट्सचा सनरायझर्स हैदराबादविरुद्ध पराभव झाल्याने, संघाच्या प्लेऑफमध्ये प्रवेश करण्याच्या आशाही संपुष्टात आल्या. त्यामुळे आता सामना मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात होईल.





गुजरात टायटन्स, पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांनी आधीच बाद फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. मुंबई इंडियन्स (१४ गुण) आणि दिल्ली कॅपिटल्स (१३ गुण) या दोघांनाही प्लेऑफमध्ये स्थान मिळवण्याची संधी आहे पण यजमान संघ वानखेडे स्टेडियमवर फेव्हरिट म्हणून सुरुवात करेल. मुंबईच्या विजयामुळे त्यांचे १६ गुण होतील आणि ते अक्षर पटेलच्या नेतृत्वाखालील संघाच्या आवाक्याबाहेर जातील, तर दिल्ली कॅपिटल्सला पुढे जाण्यासाठी त्यांचे उर्वरित दोन्ही सामने जिंकावे लागतील. दोन्ही संघांना त्यांचे शेवटचे सामने पंजाब किंग्जविरुद्ध खेळायचे आहेत.

मुंबई इंडियन्स संघाची कामगिरी चांगली आहे. तथापि, सुमारे दोन आठवड्यांपूर्वी गुजरात टायटन्सविरुद्धच्या एका चुरशीच्या सामन्यात संघाला पराभवाचा सामना करावा लागला. सलग सहा विजयानंतर मुंबईला या पराभवाचा सामना करावा लागला. विजयामुळे मुंबई प्लेऑफमध्ये पोहोचेल पण पराभव झाल्यास त्यांचे भवितव्य २४ मे रोजी दिल्ली आणि पंजाब यांच्यातील सामन्याच्या निकालावर अवलंबून असेल. तथापि, महेला जयवर्धनेच्या मार्गदर्शनाखाली खेळणारा संघ दिल्लीला हरवून सर्व जर आणि पण अडचणींना संपवू इच्छितो.

कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर हा त्याचा पहिलाच सामना असल्याने सर्वांच्या नजरा मुंबईचा सुपरस्टार रोहित शर्मावर असतील. अनुभवी फलंदाज आपले सर्वस्व पणाला लावण्यास आणि संघाला विजयाकडे नेण्यास उत्सुक असेल.

सूर्यकुमार यादव फलंदाजीतून आपला उत्तम फॉर्म कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल, पण तिलक वर्मा आपली लय शोधण्याचा प्रयत्न करेल.

**आजचा सामना**

**मुंबई इंडियन्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स**
**स्थळ :** वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ :** संध्याकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

गुजरात टायटन्सविरुद्ध शानदार शतक झळकावणाऱ्या लोकेश राहुल (४९३ धावा) च्या कामगिरीवर दिल्लीची कामगिरी अवलंबून असेल.

दिल्लीने आयपीएलची सुरुवात सहापैकी पाच सामने जिंकून केली होती पण दुसऱ्या सत्रात त्यांची कामगिरी खूपच खराब राहिली आहे. कुलदीप यादवने (१२ बळी) एका टोकावरून नियंत्रण राखले आहे पण कर्णधार अक्षरसाठी हा हंगाम मोठ्या प्रमाणात निराशाजनक राहिला आहे. त्याने आतापर्यंत २६३ धावा केल्या आहेत आणि फक्त पाच बळी घेतले आहेत. (वृत्तसंस्था)

# दिल्ली सरकार खेळाडूंना सर्व सुविधा पुरविणार




दिल्ली गेम्स-२०२५ च्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मुख्यमंत्री रेखा गुप्ता, शिक्षण मंत्री आशिष सूद आणि खासदार योगेंद्र चंडोलिया

### मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांचे आश्वासन

◆ **नवी दिल्ली, २० मे**

दिल्लीतील खेळाडूंनी शहराचा नावलौकिक करावा यासाठी भारतीय जनता पक्ष सरकार त्यांना आवश्यक असलेल्या सर्व सुविधा पुरवेल, असे आश्वासन मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी मंगळवारी दिले.

तालकटोरा स्टेडियममध्ये दिल्ली गेम्स-२०२५ च्या उद्घाटनप्रसंगी रेखा गुप्ता म्हणाल्या की, खेळाडूंना सर्व आवश्यक सुविधा मिळाल्या पाहिजेत.

मागील सरकारांच्या काळात दिल्लीतील खेळाडूंना दिल्ली सोडून इतर राज्यात नोंदणी करावी लागत होती. पण आता दिल्ली सरकार दिल्ली क्रीडा परिषदेमार्फत त्यांच्यासाठी सुविधा उपलब्ध करून देत आहे. (वृत्तसंस्था)

# दिग्वेश राठी एका सामन्यासाठी निलंबित



### अभिषेक शर्मालाही २५ टक्के दंड

◆ **नवी दिल्ली, २० मे**

अखेर ज्याची भीती होती तेच घडले. आयपीएलमध्ये सतत बेशिस्त वर्तन करणाऱ्या फिरकी गोलंदाज दिग्वेश राठीला बीसीसीआयने एका सामन्यासाठी निलंबित केले आहे. त्याला त्याच्या सामना शुल्काच्या ५० टक्के दंडही ठोठावण्यात आला. अभिषेक शर्मालाही त्याच्या सामन्याच्या मानधनाच्या २५ टक्के रक्कम दंड म्हणून भरावी लागेल.

१९ मे च्या रात्री लखनौ सुपर जायंट्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सामना होता. लखनौच्या २०६ धावांच्या लक्ष्याला प्रत्युत्तर देताना, हैदराबादकडून अभिषेक शर्माने २० चेंडूत ५९ धावांची शानदार खेळी केली. त्याला बाद केल्यानंतर, लेग स्पिनर दिग्वेश राठीने त्याच्या ट्रेडमार्क सिग्नेचर स्टाईल सेलिब्रेशन केले आणि अभिषेक शर्मा संतापला.

दिग्वेश राठीला जल्लोष करताना पाहून अभिषेक शर्मा त्याच्याकडे आला आणि काहीतरी बोलला. त्यानंतर व्हायरल व्हिडीओमध्ये दिग्वेश 'मी तुला कुठे काही सांगितले?' असे म्हणताना दिसतो.

पण अभिषेकला राग येत असल्याचे पाहून दिग्वेशचाही संयम सुटला आणि दोघांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक उडाली. मैदानावर उपस्थित असलेले पंच आणि खेळाडू दोघेही त्यांना शांत करण्याचा प्रयत्न करत राहिले. मग अभिषेक डगआउटकडे जात असतानाही दिग्वेशला चिथावत राहिला. (वृत्तसंस्था)

# पंतची आकाश चोप्राकडून पाठराखण

◆ **नवी दिल्ली, २० मे**

आयपीएलमधील एका हंगामात भारताच्या टी-२० संघात आपले स्थान पक्के करण्याची महत्त्वाची संधी ऋषभ पंतने गमावल्यामुळे त्याला टी-२० क्रिकेटबद्दलच्या त्याच्या दृष्टिकोनाचे पुनर्मूल्यांकन करावे लागेल, असे मत माजी भारतीय क्रिकेटपटू आकाश चोप्रा याने व्यक्त केले आहे.

पंत हा भारताच्या टी-२० संघाचा नियमित सदस्य नाही आणि सध्याच्या आयपीएल हंगामात त्याच्याकडून चांगली कामगिरी अपेक्षित होती. तथापि, लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार ऋषभ पंतने फक्त १३५ धावा केल्या आहेत.





सोमवारी रात्री सनरायझर्स हैदराबादकडून पराभव झाल्याने लखनौ सुपर जायंट्स संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला. भारताचा माजी सलामीवीर आकाश चोप्रा म्हणाला, यश तुम्हाला काही गोष्टी शिकवू शकते. तथापि, अपयश प्रत्यक्षात तुमची मानसिकता बदलतात आणि बहुतेकदा ते चांगल्यासाठी असते. पंत हा भारतीय टी-२० संघाचा नियमित सदस्य नाही म्हणून हे सत्र महत्त्वाचे होते. जेव्हा तुम्ही वाईट काळातून जात असता तेव्हा असे वाटते की तुम्ही काहीही करत नाही. ते एक दुःस्वप्न होते, असे म्हणत आकाशा चोप्राने पंतची पाठराखण केली. पंतने या हंगामात आतापर्यंत १२.२७ च्या सरासरीने आणि १०० च्या स्ट्राईक रेटने १३५ धावा केल्या आहेत. यामध्ये केवळ एक अर्धशतक आहे. उर्वरित १० डावांमध्ये त्याची सर्वोच्च धावसंख्या २१ आहे. (वृत्तसंस्था)

### हंगाम चांगला गेला नाही हे पंतही स्वीकारेल : मार्श

२७ कोटी रुपयांना खरेदी करूनही ऋषभ पंत एक उत्तम खेळाडू म्हणून त्याच्या प्रतिष्ठेनुसार खेळला नाही. आकर्षक टी-२० लीगमध्ये पंतचा हंगाम चांगला गेला नाही हे पंतही कबूल करेल, असे मिशेल मार्श म्हणाला.

सोमवारी सुपर जायंट्सना सनरायझर्स हैदराबादविरुद्ध सहा गड्यांनी पराभव पत्करावा लागला आणि आता त्यांचे आणखी दोन सामने शिल्लक असताना प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले आहे. सुपर जायंट्सच्या शेवटच्या दोन सामन्यांमध्ये पंत चांगली कामगिरी करेल अशी आशा मार्शने व्यक्त केली. परंतु ती केवळ औपचारिकता राहणार आहे. मार्श म्हणाला की, पंत एक उत्तम खेळाडू आहे, खूप कुशल आहे आणि खूप प्रतिभावान आहे. त्या बळावरच तो पुन्हा संघात स्थान मजबूत करेल.

### टी-२० मुंबई लीग ४ जूनपासून

**मुंबई :** मुंबई क्रिकेट असोसिएशनने (एमसीए) मंगळवारी टी-२० मुंबई लीगच्या तिसऱ्या हंगामाच्या वेळापत्रकात बदल जाहीर केले.

आता ही स्पर्धा ४ ते १२ जून दरम्यान खेळवली जाईल. यापूर्वी ही स्पर्धा २६ मे ते ८ जून दरम्यान वानखेडे स्टेडियमवर खेळवली जाणार होती, परंतु सुधारित वेळापत्रकानुसार काही सामने नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवरही होणार आहेत. आयपीएल संपल्याच्या एक दिवसानंतर टी-२० मुंबई लीग सुरू होईल. लीग टप्प्यात दोन्ही ठिकाणी (वानखेडे आणि डी. वाय. पाटील स्टेडियम) दिवसाला चार सामने खेळवले जातील. या स्पर्धेत एकूण २३ सामने खेळवले जातील.

# श्रीकांत मलेशिया मास्टर्सच्या मुख्य ड्रॉमध्ये

◆ **क्वालालम्पूर, २० मे**


भारतीय बॅडमिंटनपटू किदाम्बी श्रीकांतने मंगळवारी मलेशिया मास्टर्स सुपर ५०० स्पर्धेच्या मुख्य ड्रॉमध्ये स्थान मिळवले. इतर भारतीय खेळाडू एकेरी प्रकारात पात्रता फेरीचे आव्हान पूर्ण करू शकले नाहीत.

ही स्पर्धा टूर सुपर ५०० मालिकेचा भाग आहे आणि जगातील अव्वल खेळाडू त्यात सहभागी होत आहेत. जागतिक क्रमवारीच्या दृष्टिकोनातून ही स्पर्धा महत्त्वाची आहे. पुनरागमनाच्या मार्गावर असलेल्या श्रीकांतने त्याच्या दुसऱ्या पात्रता पुरुष एकेरीच्या सामन्यात पहिला गेम गमावल्यानंतर शानदार पुनरागमन केले आणि चिनी तैपेईच्या हुआंग यू काईचा ९-२१, २१-१२, २१-६ असा पराभव केला.

२०२१ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्याने यापूर्वी पहिल्या फेरीत चिनी तैपेईच्या कुओ कुआन लिनचा २१-८, २१-१३ असा पराभव करून शानदार सुरुवात केली होती. माजी जागतिक नंबर वन श्रीकांतला आता मुख्य ड्रॉमध्ये चीनच्या सहाव्या मानांकित लू गुआंग जू विरुद्ध कठीण आव्हान असेल. इतर सामन्यांमध्ये, थरुन मन्नेपल्ली थायलंडच्या पानिकाफोन तीरत्साकुलकडून १३-२१, २१-२३ असा पराभव पत्करावा लागला तर एस. शंकर मुथुस्वामी सुब्रमण्यम चीनच्या झू झुआन चेनकडून २०-२२, २०-२२ असा पराभव पत्करावा लागला.



महिला एकेरीच्या सामन्यात अनमोल खरबला तैपेईच्या हंग यी-टिंगने २१-१४, २१-१८ असे पराभूत केले. मिश्र दुहेरीत मोहित जगलान आणि लक्षिता जगलान यांनाही मलेशियन जोडी मिंग याप टू आणि ली यू शान यांच्याकडून १५-२१, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला. या स्पर्धेत भारताचे अव्वल बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू आणि एचएस प्रणॉय बुधवारी त्यांच्या मोहिमांना सुरुवात करतील. (वृत्तसंस्था)



रविवारी १९ व्यांदा माऊंट एव्हरेस्ट सर करून स्वतःचा विक्रम मोडणारे ब्रिटिश गिर्यारोहक केंटन कूल यांचे काठमांडू विमानतळावर मंगळवारी त्यांच्या मित्राने स्वागत केले.

## कॉम्बॅक्ट मार्शल आर्टची
# राष्ट्रीय कराटे स्पर्धेत २४ पदकांची कमाई

**सोलापूर, दि. २० मे-**

द असोसिएशन ऑफ कॉम्बॅक्ट मार्शल आर्टच्या खेळांडूनी १६ सुवर्ण, ४ रौप्य व ४ कांस्य अशी २४ पदकांची कमाई केली

ऑल इंडिया लेबर वेलफेरा सेवा संघ व रेड कमांडो मार्शल आर्टस ॲण्ड स्पोटर्स ऑक्टीविटीझ यांच्या संयुक्त विद्यामाने ही स्पर्धा येथे संपन्न झाली. या खेळाडूंना मार्शल आर्टचे सचिव हरिष पटेल व ऐश्वर्या सावंत यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे साईबाबा माध्यमिक प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष शौकत अली शेख व समाधान माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक इरफान शेख यांनी कौतुक केले.




**कामगिरी : काता :** १४ वर्षा खालील मुले : राकेश कोळी, अतुल लोहार, अनुज पवार (सुवर्ण). मुली : श्रावणी कदम, धानेश्वरी पोळ, स्वाती पवार (सुवर्ण). १७ वर्षाखालील मुले : रोशन चव्हाण, नैतिक कांबळे, सुहास सुरवसे, आकाश नवले, भावेश चिखले (सुवर्ण). मुली : अमृता चव्हाण (सुवर्ण).

**कुमिते :** १४ वर्षाखालील मुले : अतुल लोहार (सुवर्ण), राकेश कोळी(रौप्य), अनुज पवार(कांस्य). मुली : श्रावणी कदम (सुवर्ण), स्वाती पवार (रौप्य), धानेश्वरी पोळ(कांस्य). १७ वर्षाखालील मुले : नैतिक कांबळे (सुवर्ण), आकाश नवले (सुवर्ण) भावेश चिखले (रौप्य) रोश्न चव्हाण (रौप्य) सुहास सुरवसे (कांस्य). मुली : अमृता चव्हाण हिने (कांस्य).

# टेनिसपटू संध्याराणी बंडगर यांचा राज्याचे मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या हस्ते सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० मे -**

अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धा सन २०१९-२० ते २०२४-२५ या ६ वर्षांत लॉन टेनिस या क्रीडा प्रकारात महाराष्ट्र राज्यास पदके मिळवून देऊन राज्याचे नाव लौकीक केलेल्या सोलापूर सामाजिक वनीकरण विभागातील मुख्यलेखापाल आंतरराष्ट्रीय टेनिसपटू संध्याराणी बंडगर यांचा सोमवारी १९ मे रोजी मुंबई मंत्रालय येथील सचिवालय जिमखाना येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. संध्याराणी बंडगर यांच्या या यशस्वी कारकिर्दीबद्दल राज्य संघटनेचे अध्यक्ष प्रशांत सुतार, सचिव सुंदर अय्यर, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




### यशाचे श्रेय गुरू व कुटुंबियांना

हा गौरव माझे प्रशिक्षक सुधीर सालगुडे, उमेश बडगेर व मार्गदर्शक राजीव देसाई यांचा देखील असल्याच्या भावना संध्याराणी बंडगर यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या. त्याचप्रमाणे माझ्या या यशात माझ्या कुटुंबियांचे देखील मोठे योगदान असल्याचे संध्याराणी यांनी नमूद केले.

## महत्वाचे...



### टेंभुर्णीत मान्सूनपूर्व पावसाची विजेच्या कडकडासह जोरदार हजेरी

**टेंभुर्णी, दि.२० मे-**

टेंभुर्णी येथे मंगळवार दिनांक २० मे रोजी सायंकाळी चार वाजल्यापासून मान्सूनपूर्व पावसाची जोरदार वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली असून आज सकाळपासूनच हवेत आद्रता वाढल्याने घामाच्या धारा लागल्याने नागरिक हायरान झाले होते. या पावसाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. कारण बऱ्याच ठिकाणी ऊस हा पाणी देऊन हे अति उष्णतेमुळे उसाचे पोगे जळालेले दिसून येत होते ग्रामीण भागातील विहिरींची पाणी पातळी खूपच खोलवर गेली होती. काही ठिकाणी विहिरींचे पाणी हे एक दोन तासावरच आली होती. त्याचा उपयोग शेतकरी जनावरे सांभाळण्यासाठी पाण्याची सोय करून ठेवत होता. या चार दिवसापासून सुरु झालेल्या पावसाने काही भागात कमी पाऊस तर काही भागात जोरदार पाऊस असे प्रमाण सुरु होते. या पावसामुळे पीक उत्पादक शेतकरी हा सुखावला आहे. गेल्या आठवड्यामध्ये सोलापूर जिल्ह्याचे तापमान हे ४५ अंशावर गेले होते. हवेमध्ये झाल्यामुळे चार दिवसापासून तापमान ३५ ते ३६ अंश डिग्री सेल्सिअस वर आल्याचे दिसून येत आहे. तापमानात कमालीचा फरक जाणवल्यामुळे आजारी पडण्याचे प्रमाण किती जास्त असल्याचे दिसून येत आहे. मात्र आज झालेल्या टेंभुर्णी परिसरात वरवडे, सापटणे टें, वेणेगाव, अकोले बु।, चव्हाणवाडी टें, बेंबळे, मिटकलवाडी, तांबवे ,कन्हेरगाव, दहिवली, शिराळा, आढेगाव, भिमानगर, रांजणी, आलेगाव, टाकळी, चांदज, वडोली टेंभुर्णी शहरात पावसामुळे उष्णता बऱ्यापैकी कमी होऊन शेतकरी वर्ग सुखावला असून लवकरच यावर्षी शेतकरी मशागत करेल कारण मान्सून पूर्व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचा काही ठिकाणी नुकसान झाले आहे तर काही ठिकाणी फायदा झाला आहे



### दहावीत शंभर टक्के घेणाऱ्या प्रनौतीचा आ.पाटील यांच्या हस्ते सत्कार

**अणदूर, दि.२० मे-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे आ. राणाजगजीतसिंह पद्मसिंह पाटील यांच्या वतीने प्रवीण घोडके यांच्या निवासस्थानी दहावी शालांत परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री श्री गुरुकुल मधील प्रणोती नागनाथ जते या विद्यार्थिनीने शंभर पैकी शंभर टक्के मिळवल्याबद्दल आमदार राणादादा पाटील यांनी तिचे विशेष कौतुक केले. यावेळी मुख्याध्यापक लक्ष्मण नरे यांचाही आमदार पाटील यांनी सत्कार केला. यावेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य अनिल काळे, धाराशिव जिल्हा महामंत्री अँड. दीपक आलुरे, भाजपा ओबीसी जिल्हाध्यक्ष विजय शिंगाडे, भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष दयानंद मुडके, युवा नेते प्रवीण घोडके, माजी सभापती बालाजी मोकाशे, गजानन मोकाशे, राजकुमार गाढवे उपस्थित होते.

### वेव्हज् व्हीएफएक्स चॅलेंज स्पर्धेत ओंकार कोरेचे यश

**सोलापूर, दि.२० मे-**



वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँण्ड एन्टरटेन्मेंट समिट २०२५ अर्थात वेव्हज् परिषदेने आयोजित केलेल्या वेव्हज् व्हीएफएक्स स्पर्धेत येथील एम सी सोलापूर माया अकादमी ऑफ अँडव्हानस क्रिएटीव्हीटी अँनिमेशन इन्स्टिट्यूटचा विद्यार्थी ओंकार महेश कोरे याने राष्ट्रीय पश्चिम विभागात उपविजेता पदाचा मानकरी ठरत सोलापूरचे नाव देशपातळीवर लौकिक केले. नुकत्याच मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे पार पडलेल्या बक्षीस वितरण सोहळ्यात राष्ट्रीय पश्चिम विभागात उपविजेता पदाचा मानकरी ठरलेल्या ओमकार कोरे याचा अँनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्सचे संचालक आर. के. चांद यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशस्तीपत्रक, सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. ही स्पर्धा देशपातळीवर आयोजित केली जाते. ओमकारने आपल्या कौशल्य आणि कर्तृत्वाच्या बळावर राष्ट्रीय पश्चिम विभागात उपविजेतापद पटकावत सोलापूरचे नाव रोशन केले आहे. स्पर्धेसाठी मॅक अँनिमेशन सोलापूर इन्स्टिट्यूटचे संचालक प्रवीण लांडे, व्हीएफएक्स तज्ञ मार्गदर्शिका अमृता मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेसाठी ८ तास अवधी होता. या ८ तासात ३० सेकंदाचे आउटपुट काढून सबमिट करायचे होते. आउटपुट ८ तासात सबमिट करणे हे माझ्यासाठी सर्वात महत्वाचे होते. स्पर्धे दरम्यान चित्रपटसृष्टीतील अनेक नवीन गोष्टी अनुभवयास, शिकण्यास मिळाली, अशी प्रतिक्रिया ओंकार याने दिली.

### सरोजिनी बिराजदार यांचे निधन

**सोलापूर, दि. २० मे-**



जुळे सोलापूर येथील सरोजिनी भवनराया बिराजदार (वय ७४) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती, दोन मुले, दोन मुली, जावई, सुना व नातवंडे असा परिवार आहे. महावीर हायस्कूल येथील सहशिक्षक बसवराज बिराजदार, डॉ.लक्ष्मीकांत बिराजदार यांच्या त्या मातोश्री होत. अंतिम संस्कार मूळ गावी बसवनसंगोगी (ता.अक्कलकोट) येथे २१ मे रोजी दुपारी २ वाजता होणार आहे.

# दिवसा घरफोडी करणाऱ्या मध्य प्रदेशातील टोळीला ७ वर्षे कारावासाची शिक्षा

- बार्शी येथील न्यायालयाचा निकाल
- स्थानिक गुन्हे शाखेने केली होती अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० मे -**

दिवसा घरफोडी व चोरी करणाऱ्या मध्यप्रदेशातील टोळीला बार्शी येथील सत्र न्यायाधीश व्ही के मांडे यांनी ७ वर्षे कारावास व प्रत्येकी ७ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

पवन उर्फ भुरा रामदास आर्य (वय ३८, ६६, रामकृष्ण बाग कॉलनी, इंदोर, मध्य प्रदेश), म नोजकुमार ठाकूरदास आर्य (वय ३२, रा. ०४, खाटीक मोहल्ला, गोहंद, जि. भिंड, मध्य प्रदेश), देवेंद्र उर्फ राज रामलाल गुर्जर (वय ३७, रा. इंदिरा नगर, इंदोर, मध्य प्रदेश), सोने वितळविणारा सराफ दिपेंद्रसिंग उर्फ चिंटू विजयसिंग राठोर (वय ४१, सर्व रा. ११६६/६८, ए राजनगर, इंदोर, मध्यप्रदेश) अशी शिक्षा झालेल्यांची नावे आहेत.

बार्शी शहर पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या २५८/२०२३ क्रमांकाच्या दिवसाच्या घरफोडी चोरीच्या गुन्ह्याची उकल स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलीस निरीक्षक सुहास जगताप, सहायक पोलीस निरीक्षक शैलेश खेडकर, पोलिस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, सहायक फौजदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, प्रकाश कारटकर, अक्षय डोंगरे, अक्षय दळवी, अनिस शेख, समीर




देवेंद्र गुर्जर



पवन गुर्जर



मनोज आर्य



दिपेंद्रसिंह राठोड

शेख, अमोल माने यांच्या पथकाने करुन मध्यप्रदेश येथून रेकॉर्डवरील सराईत पवन आर्य, मनोजकुमार आर्य, देवेंद्र गुर्जर आणि सराफ दिपेंद्रसिंग राठोर या आरोपींताना १९ एप्रिल २०२३ रोजी अटक केली होती. या आरोपींकडून गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आले होते. आरोपींकडून एकूण ७ घरफोडी चोरीच्या गुन्ह्यांची उकल करण्यात आली होती. या आरोपींकडून एकूण ७५० ग्रॅम सोने, १५०० ग्रॅम चांदी, ९ लाख रोख रक्कम, आणि ५ लाख रुपये किमतीची चार चाकी गाडी असा एकूण ६५ लाख रुपये किम तीचा मुद्देमाल हस्तगत केला होता. गुन्हातील आरोपी यांनी संगनमताने चोरी करून त्यातील



शैलेश खेडकर
सहायक पोलीस निरीक्षक

मुद्देमाल एकाच सराफाला विकल्यामुळे सोनाराला ही त्या गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आली होती. सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून करून गुन्हयातील मुद्देमाल व तांत्रिक पुरावा सी.सी.टी.व्ही फुटेज इत्यादी हस्तगत करुन आरोपींविरुद्ध बार्शी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. अटक करण्यात आल्यापासून सर्व आरोपी हे अद्यापर्यंत न्यायालयीन कोठडीत (जेल मध्ये) होते.

या खटल्याची सुनावणी बार्शी सत्र न्यायालयाचे न्यायाधीश मांडे यांच्यासमोर झाली. पोलिसांनी गोळा केलेले पुरावे व सरकारी वकिलांचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायालयाने सर्व आरोपींना शिक्षा सुनावली.

- **कोणाला किती वर्षाची शिक्षा -**
- पवन आर्य - ७ वर्षे कारावास व २ हजार रुपये दंड
- मनोजकुमार आर्य - ५ वर्षे कारावास व २ हजार रुपये दंड
- देवेंद्र गुर्जर - ५ वर्षे कारावास व २ हजार रुपये दंड
- दिपेंद्रसिंग राठोर - ७ वर्षे कारावास व ५ हजार रुपये दंड.

**सोने वितळवून लगड करणाऱ्या सराफालाही शिक्षा...**

या झालेल्या शिक्षेमध्ये महत्वाचा एक मुद्दा म्हणजे गुन्ह्यातील चोरीचे सोने घेऊन ते वितळून त्याची लगड/रवा बनवून विकणारा सराफ यास सुद्धा भारतीय दंड संहिता कलम ४१३ (स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वारंवार चोरीचे सोने विकत घेणे) व २०१( गुन्ह्यातील सोन्याचे दागिने वितळवले म्हणजे मूळ पुरावा याचे स्वरूप बदलले) म्हणून सात वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा झाली आहे.

या खटल्यात सरकारच्यावतीने अँड. दिनेश देशमुख यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पोलिस उपनिरीक्षक संजय कपडेकर व पोलिस शिपाई गणेश ताकभाते यांनी सहकार्य केले.

## बार्शी तहसील कार्यालयासमोर पत्र्याचे छत कोसळले; तहसीलदारांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२० मे-**

तहसील कार्यालयासमोरील डमरे कॅंटीनच्या पत्र्याचे छत पावसामुळे अचानक कोसळले. या दुर्घटनेत ढिगाऱ्याखाली अनेक नागरिक अडकले. घटनेची माहिती मिळताच तहसीलदार एफ. आर. शेख यांनी प्रसंगावधान राखत आपत्ती व्यवस्थापन कक्षातील कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली आणि बचाव कार्यास सुरुवात केली.



तहसीलदार शेख यांनी स्वतः पावसात उभे राहून संपूर्ण मदतकार्य ताब्यात घेतले. त्यांनी नगरपरिषद, पोलीस, आरोग्य विभाग, आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांच्यात सम न्वय साधत बचाव कार्य अत्यंत जलदगतीने आणि प्रभावीपणे पार पाडले. यावेळी पाच नागरिकांना सुखरुपपणे बाहेर काढण्यात यश आले. तर अर्जुन नागनाथ गवसाणे (वय ७६, रा. सौंदरे) या जखमी व्यक्तीस तत्काळ जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. ढिगाऱ्याखाली अजून कोणी अडकलेले नाहीत याची खात्री जेसीबीच्या सहाय्याने घेण्यात आली. नायब तहसीलदार सुभाष बदे, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे संदीप नालपे, पोलीस कर्मचारी, आरोग्य विभागाचे अधिकारी व नगरपरिषद कर्मचाऱ्यांचा मोलाचा सहभाग होता.

**सुखरुप बाहेर काढलेले नागरिक**

विठ्ठल यल्लाप्पा गुंजाळ (६५), बार्शी, मालण हरिश्चंद्र ताकभाते (६५), श्रीपतपिंपरी, विजाबाई विठ्ठल गुंजाळ (६०), बार्शी, रेणुका दत्तात्रेय ताकभाते (४०), श्रीपतपिंपरी, दत्तात्रेय हरिश्चंद्र ताकभाते, श्रीपतपिंपरी.

**जखमी नागरिक**

अर्जुन नागनाथ गवसाणे, वय ७६, रा. सौंदरे- सध्या उपचार सुरु (जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी) या घटनेनंतर तहसीलदार शेख यांनी नगरपरिषदेला अशा धोकादायक ठिकाणांची तात्काळ तपासणी करून आवश्यक कार्यवाही करण्याची सूचना दिली. त्यांच्या या तत्परतेमुळे संभाव्य जीवितहानी टळली. बार्शीकर नागरिकांकडून तहसीलदार आणि त्यांच्या चमूचे कौतुक होत असून, सर्वसामान्यांच्या सुरक्षेसाठी तत्पर असलेले प्रशासन, अशी सकारात्मक भावना जनतेत निर्माण झाली आहे.

## पिलीव येथील मेळाव्यात १३० वधु-वरांची नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२० मे -**

पिलीव (ता.माळशिरस) येथे महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त आयोजीत विरशैव लिंगायत समाज व जंगम समाजातील वधू-वर परिचय मेळाव्यात तब्बल १३० वधु-वरांची नोंदणी झाली.

मेळाव्याचे उदघाटन विरशैव लिंगायत समाजचे अध्यक्ष अविनाश जेऊरकर यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी प्रास्ताविकातून मेळाव्याचा उद्देश सांगितला. सुत्रसंचालन नागनाथ स्वामी यांनी केले. प्रभुदेव शिवाचार्य माढेकर महाराज, शिवाचार्य वेळापुरकर म हाराज व संगनबसव महास्वामीजी महाराज निलंगा यांचे आशीर्वचन झाले. अध्यक्ष श्री व सौ अविनाश जेऊरकर, सचिव श्री व सौ गणेश देशमुख, श्री व सौ राजेश खलीपे यांनी पाद्यपुजन केले. समर्थ गुजरे यांनी बसवेश्वर महाराज यांच्या जीवनचरित्राविषयी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख, नगरसेवक शिवानंद पाटील, माजी उपसरपंच नानासाहेब देशमुख, अनिल देशमुख, अरुण घोंगडे, अँड. वैभव मेथवडे, उम श देशमुख, शुभजित नष्टे, संजय आर्वे, संतोष गुजरे, समर्थ गुजरे, यश उरवणे, संकेत देशमुख, शिवम घोंगडे, कल्याण नष्टे, महेश गाढवे, दिपक गाढवे यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी समाजातील पंचाक्षरी महाराज, अनिल सावळजकर, मेजर मयुर नष्टे, सुहास कोल्हे, चंद्रकांत धसाडे, सोहम धसाडे यांचा सन्मान करण्यात आला.



## उडगी ते तोळणूर रस्ता दुरुस्तीसाठी ग्रामस्थांचे निवेदन

**काम न झाल्यास आंदोलनाचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ मे-**

अक्कलकोट तालुक्यातील मौजे उडगी ते तोळणूर हा रस्ता आठ - दहा वर्षापासून खराब होता. या रस्त्याच्या नूतनीकरणाचे काम सन २०२३ साली सुरु झाले होते. सदर काम हे ठेकेदाराने अर्धवट स्थितीत सोडले आहे. यामुळे उडगी आणि तोळणूर परिसरातील गावकरी व शेतकरी यांचे हाल होत आहेत.

उडगी - तोळणूर रस्ता हा खराब असल्याने या रस्त्यावरून वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. या रस्त्याच्या कामाची चौकशी करून कामास सुरुवात करावी. तसेच सदरच्या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी उडगी आणि तोळणूर भागातील गावकऱ्यांनी व शेतकरी बांधवांनी केली आहे. सदरचे काम आठ दिवसात सुरु न केल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल असे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषदेच्या अक्कलकोट उपअभियंता उषा बिडला यांना देण्यात आले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते गणेश नारायणकर, तोळणूर येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सदस्य पिरपाशा पिरजादे विश्वनाथ बिराजदार, लक्ष्मण कोळी, शातरान पठाण आदी उपस्थित होते.

## ‘दक्षिण’मध्ये जोरदार पाऊस

**कासेगाव, दि.२० मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील अनेक गावातून सलग दोन दिवस पूर्वमोसमी पावसाने जोरदार हजेरी लावली. या अवकाळी पावसामुळे शेतातील अनेक पिकांना फटका बसला तर फळबागांचे नुकसान झाले आहे.

रोहिणी नक्षत्र निघण्यास अजून पाच दिवस बाकी असतानाच कृत्तिका नक्षत्रात पडलेला हा पाऊस फळबागांचे नुकसान करणार ठरत आहे. गेल्या दोन-तीन दिवसापासून दुपारी उन्हाळा अन् संध्याकाळी पावसाळा असा अनुभव ग्रामस्थांना मिळत आहे. कासेगाव, उळे, उळेवाडी, गंगेवाडी, बोरामणी, तांदुळवाडी, वडजी, कासेगाव, दोड्डी, मुळेगाव, मुळेगावतांडा, बक्षिहिप्परगा, वरळेगाव या परिसरात मोठा पाऊस झाला. कासेगाव येथील साठवण तलाव पन्नास टक्के भरला आहे. वडजीत अनेक घरातून पाणी शिरल्याने नुकसान झाले आहे. शेतातील पिकांनाही फटका बसला आहे.



## विधानसभेप्रमाणेच स्थानिक संस्था निवडणूकीत परिवर्तन घडवा : आ.खरे

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२० मे-**

विधानसभा निवडणूकीत परिवर्तन घडवले त्याप्रम णे आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीचे प्रस्थापितांची सत्ता उलथवून टाकत परिवर्तन घडवण्यासाठी सज्ज व्हावे असे अवाहन मोहोळचे आमदार राजू खरे यांनी केले

कोरवली (ता. मोहोळ ) येथे आमदार राजू खरे यांच्या विशेष प्रयत्नातून २५१५ ग्रामविकास कार्यक्रम अंतर्गत मंजूर भीमनगर येथील समाज मंदिराचा भूमिपूजन आमदार खरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विक्रम तिर्थे, डॉ. अमोल पाटील, बाळासाहेब फडतरे, तम्मा नंदुरे, अमर तीर्थे, गणपत मलसखांब, माऊली तिर्थे, समाधान कांबळे, गौतम तुपलोंढे, मनसिद्ध वाळे, अमोल गेंगाणे, दयानंद तारखे, बाळासाहेब कांबळे आदी उपस्थित होते. ग्राम स्थांच्या वतीने आ. खरे यांचा सन्मान करण्यात आला. आमदार खरे म्हणाले, विधानसभेला सर्वसामान्य जनतेने दडपशाहीच्या विरोधात मतदान करून मला साथ दिली. जनता माझ्या विजयासाठी रस्त्यावर उतरली, व तब्बल ३३ हजार मतांनी मला निवडून देवून मोठे परिवर्तन केले. कोरवलीच्या भीमनगरमध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळाची दाहकता जाणवत होती. घागरभर पाण्यासाठी वणवण भटकावे लागत होते. येथील नागरिकांनी माझ्याकडे बोअर पाडून देण्याची मागणी केली होती. आमदार नसतानाही या ठिकाणी स्वखर्चातून बोर पाडून दिली व पाण्याची सोय केली. त्याचवेळी समाज मंदिर बांधून देण्याचाही शब्द दिला होता. तो पूर्ण करण्यासाठी भूमिपूजन करायला आलो आहे. यावेळी कोरवलीसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश तुपलोंढे, कटप्पा कांबळे, समाधान कांबळे, ब्रह्मदेव तीर्थे, गणपती म सलखांब ,रणजित तीर्थे, माऊली तीर्थे, सागर कांबळे, सखाराम कांबळे, दयानंद तारखे, बाळासाहेब फडतरे, पप्पू रणदिवे, नागेश मस्के आणि संस्थेचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

# उळेतील नामसप्ताहाची काल्याच्या किर्तनाने झाली सांगता

● जगदगुरू श्रीसंत तुकाराम महाराजांचे वंशज श्रीगुरू बापूसाहेब देहूकर यांच्या हस्ते प्रसाद वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव, दि.२० मे-**

उळे (ता.दक्षिण सोलापूर) येथील ग्रामदैवत हनुमान मंदिरात श्रीगुरू देहूकर सांप्रदायिक भजनी मंडळ व समस्त ग्रामस्थांच्या वतीने आयोजीत नाम सप्ताहाची सांगता रविवारी दि.१९ मे रोजी श्रीसंत तुकाराम महाराजांचे वंशज श्रीगुरू बापूसाहेब देहूकर यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. यावेळी त्यांच्या हस्ते उपस्थितांना काल्याच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले.

जगदगुरू श्रीसंत तुकाराम महाराजांचे वंशज श्रीगुरू वैय सोपानकाका देहूकर व वै. श्रीगुरू ज्ञानेश्वर माऊली देहूकर यांच्या कृपाशिर्वादाने, श्रीगुरू श्रीगुरू बापूसाहेब (आण्णा) देहूकर यांच्या मार्गदर्शनाखाली व श्रीगुरू कान्होबा (नाना) महाराज देहूकर यांच्या उपस्थितीत येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात मंगळवारी १३ मे रोजी ग्रंथपूजनाने झाली. यावेळी दत्तात्रय महाराज क्षिरसागर, प्रभुलिंग महाराज क्षिरसागर, मन्मथ महाराज बहिरमल, धनंजय महाराज गुंड आदिसह ग्रामस्थ व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नामसप्ताहात दररोज पहाटे चार ते सहा काकडा आरती, सकाळी सात ते अकरा गाथा पारायण, सकाळी अकरा ते एक गाथा भजन, दुपारी दोन ते चार गाथा पारायण, सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ, सहा ते सात प्रवचन, रात्री आठ ते दहा हरिकिर्तन व रात्री हरिजागर असे नित्याचे कार्यक्रम संपन्न झाले. यामध्ये मनोज महाराज खलाटे(वडजी), दत्तात्रय महाराज घायाळ(उळेवाडी), श्याम महाराज जोशी (कासेगाव), अंगद महाराज चुंगे(पिंपळा), मंगेश



महाराज कोरे (देगाव), गंगाधर महाराज घोटकर (तामलवाडी) यांचे प्रवचन झाले. श्रीसंत तुकाराम महाराजांचे वंशज श्रीगुरू भानुप्रसाद महाराज देहूकर (पंढरपूर), बाळासाहेब महाराज भक्तीकर (बेळगाव), जगनाथ महाराज देशमुख (पंढरपूर), एकनाथ महाराज हंडे (पंढरपूर), ज्ञानेश्वर माऊली महाराज झोळ(वाशिंबेकर), श्रीसंत तुकाराम महाराजांचे वंशज श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर (पंढरपूर) यांची हरिकिर्तनसेवा झाली. या नामसप्ताहात ताम लवाडी, गंगेवाडी, पिंपळा, उळेवाडी, बोरामणी, मुळेगाव, पांगरवाडी, उळे, कासेगाव, एकरुख, सुरतगाव, माळुंब्रा, कोरेवाडी, गोंधळवाडी, बोबडेवाडी, वडगाव, तरटगाव, कुंभारी, गंजेवाडी, सावरगाव, सारोळा, धनेगाव, गंगेवाडी, मार्डी, राळेरास, मगरसांगवी, काटी, होनसळ, बाणेगाव, नात्रज, हगलूर, कोंडी, घोत्री, राळेरास, तळेहिप्परगे, मार्डी आदी गावातील भजनी मंडळांचा हरिजागर झाला. सांगता समारंभ दिवशी गावातून ग्रंथदिंडी काढण्यात आली. यावेळी टाळमृदुंगाच्या गजरात निघालेल्या या दिंडी मिरवणुकीत अबालवृध्दांसह महिलांचा मोठा सहभाग होता.

महत्वाचे...



# रेशन कार्डधारकांना ३ महिन्यांचे आगाऊ रेशन!

**धान्य वितरण गतीने करण्याचे पुरवठा अधिकाऱ्यांचे आदेश**

**वाटपात गडबड केल्यास कारवाईचे शासन निर्देश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

आगामी पावसाळा आणि परिणामी पूर आणि प्रतिकुल वातावरणामुळे जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांना ऑगस्ट २०२५ पर्यंतची (३ महिन्याचा) मोफत धान्याची उचल एकदम देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली. दरम्यान, शासन स्तरावरून वारंवार फॉलोअप होत असल्यामुळे धान्य वितरण लवकर करा, परमिट्स गतीने द्या, या कामात हलगर्जी झाल्यास शासनाने कारवाई करण्याचे निर्देश दिले असून, कोणाचेही नुकसान होऊ नये यादृष्टीने आपले काम वेळेवर व गतीने पूर्ण करा, असेही आदेश जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी दुकानदारांना दिले आहेत.



गरिबांवर उपाशी राहण्याची वेळ येऊ नये, यासाठी शासनाकडून लाभार्थ्यांना पूर्णपणे मोफत धान्य पुरविले जाते. कोट्यवधी रुपये शासन या योजनेवर खर्च करीत आहे, पूर्वी शासनाकडून तीन रुपये प्रतिकिलो दराने तांदूळ आणि दोन रुपये प्रतिकिलो दराने गहू दिला जात होता.

करोना प्रादुर्भावामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या गरिबांची उपासमार होऊ नये यासाठी केंद्र सरकारने मोफत धान्याची योजना जाहीर केली होती. ती तशीच आजही चालू आहे. या योजनेद्वारे प्रतिमाह मोफत धान्य देण्यात येत होते. मात्र आगामी पावसाळा आणि परिणामी पूर, प्रतिकूल वातावरण, धान्य साठवणुकीची अडचण लक्षात घेता सलग तीन महिन्याचा माल एकदाच देण्याचे आदेश शासनस्तरावरून आले आहेत.

### सप्टेंबर २०२५ मध्येच पुढील धान्य कोटा वाटप

३ महिन्याचा धान्यकोटा ठेवण्याची जिल्ह्यातील राशन दुकानदारांची अडचण लक्षात घेता राशन दुकानदारांनी एकेक महिन्याचा कोटा घेवून १५ दिवसांत वाटप करायचा आणि दुसरे आणि तिसरे परमीट घेवून १५ दिवसांत वाटप करायचे धोरण जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी आखले आहे. एकंदरीत, दीड महिन्यात ऑगस्ट २०२५ पर्यंतचा कोटा राशन दुकानदार वाटप करणार असून, यानंतर सप्टेंबर महिन्यातच शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळणार आहे. दरम्यान, या कामात दुकानदारांनी हयगय केल्यास कडक कारवाई करण्यात येणार आहे.

**-संतोष सरडे, जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर**

# ‘त्या’ एमआयडीसीत आगीच्या दुर्घटना होऊ नयेत यासाठी उपसमिती गठित करावी

**जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचे निर्देश**

**एमआयडीसी परिसरातील वीज वितरणाची त्रयस्थ संस्थेकडून तपासणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२० मे-**

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे दि. १८ मे २०२५ रोजी पहाटे एका टॉवेल कारखान्याला आग लागून त्यात आठ नागरिकांचा मृत्यू झाला. ही अत्यंत दुर्देवी घटना होती. तसेच यापूर्वीही एमआयडीसीमध्ये आगीच्या घटना झालेल्या असून, अशा दुर्घटना होऊ नयेत यासाठी एक उपसमिती गठित करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे झालेल्या टॉवेल कारखान्याच्या आग दुर्घटनेबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज महापालिका प्रशासन, विद्युत वितरण कंपनी, अग्निशामक दल, आपत्ती व्यवस्थापन तसेच विविध विभाग व यंत्रमाग संघ यांची जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आढावा बैठक घेतली. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी सोलापूर महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, एमआयडीसीचे विभागीय अधिकारी शिवाजी राठोड, अतिरिक्त महापालिका आयुक्त रवी पवार




तसेच संदीप कारंजे, अधीक्षक अभियंता महावितरण सुनील माने, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे, तहसीलदार निलेश पाटील व सोलापूर यंत्रमाग संघाचे पदाधिकारी तसेच अग्निशमन दलाचे अधिकारी व सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, अक्कलकोट रोड एमआयडीसी मध्ये वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांमुळे जीवित व वित्तीय हानी होत आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागाच्या विभाग प्रमुख तसेच सोलापूर यंत्रमाग संघाचे प्रतिनिधी यांची सर्व समावेशक अशी एक उपसमिती एमआयडीसीने गठीत करावी. एमआयडीसीच्या सुरक्षेच्या दृष्टीने या समितीने सर्वसमावेशक विचार करून एक कृती आराखडा तयार करावा व पुढील महिन्यात प्रशासनाला सादर करावा, असेही त्यांनी सूचित केले. अग्निशामन दलाच्या बंबांना पाणी भरण्यासाठी एमआयडीसी परिसरातच वॉटर फिडर पॉईंट निर्माण करण्याबाबत जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सूचित केले. यावेळी त्यांनी आग लागलेल्या कारखान्याच्या प्रथमदर्शी कर्मचारी यांच्याकडून आगीचे कारण समजून घेतले. तसेच आग विझवण्यासाठी आलेल्या अडचणींची ही माहिती त्यांनी घेतली. त्यावेळी त्यांनी एमआयडीसीचे अधिकारी, अग्निशमन दलाचे अधिकारी, महसूलचे अधिकारी व पोलीस प्रशासन यांच्याकडून आगीची कारणे तसेच ती विजवण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती घेतली. तसेच एमआयडीसीमध्ये वीज वितरण कंपनीची डीपी फिडर, लाईन याविषयी वीज वितरण कंपनीच्या वीज निरीक्षक यांनी सविस्तर माहिती घेऊन अहवाल सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. एम आयडीसी परिसरातील वीज वितरण कंपनीची वितरण व्यवस्था याबाबत त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करून घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. अक्कलकोट एमआयडीसी रोड परिसरात टॉवेल कारखान्याला लागलेल्या आगीबाबत महापालिका आयुक्त सचिन ओंबासे यांनी एमआयडीसी परिसरातील बांधकामे, रस्ते तसेच वीज वितरण व्यवस्थेच्या अनुषंगाने माहिती बैठकीत दिली. तसेच एमआयडीसी कारखाण्यात निवासस्थान नसावीत असेही त्यांनी सांगितले.

### शॉर्टसर्किटने आग लागली असावी ?

सेंट्रल टेक्सटाईल कारखान्याला लागलेली आग ही शॉर्टसर्किटमुळे लागली असावी, असा अंदाज वर्तवून त्या ठिकाणी आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाचे बंब त्वरित उपस्थित होते, परंतु आग अग्निशामन दलाचे वाहन त्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नव्हता, त्यामुळे आग वाढत गेली. शेवटी जेसीबी मागून इमारतीची भिंत पाडण्यात आली, व त्यानंतरच बचाव कार्याला व आग नियंत्रणात आणण्यासाठी गती मिळाली असे त्यांनी सांगितले. यंत्रमाग धारकांच्या प्रतिनिधीच्या म्हणण्यानुसार एमआयडीसी परिसरात आगीच्या घटना वारंवार घडण्यामागे वीज वितरण कंपनीने कमी/अधिक दाबाने वीज पुरवठा करणे हे असल्याचे सांगितले. वीज वितरण कंपनीने एम आयडीसी परिसरात उद्योजकांना आवश्यक दाबाने वीज पुरवठा नियमितपणे केल्यास शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याच्या घटना घडणार नाहीत.

**- सदाशिव पडदुने,**
**उपविभागीय अधिकारी, सोलापूर**

# बोकड नाही बोकडोबा म्हणा! सोलापुरात झालंय मार्केट जॅम

**बोकडाची किंमत ऐकून धक्का बसेल!**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० मे -**

मुस्लिम धर्मात पवित्र मानला जाणारा बकर ईद म्हणजेच ईद-उल-अदाह हा सण काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अशातच एका बोकडाने जनावरांच्या बाजारात खळबळ उडवून दिलीये. दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगीचे शेतकरी श्रीशैल लांडगे यांचा हा बोकड आहे. याची किंमत तब्बल ६ लाख रुपये सांगण्यात येतेय. विशेष म्हणजे आतापर्यंत या बोकडाला ३ ते ४ लाखांपर्यंत बोलली लागल्याचे लांडगे यांनी सांगितले.

रमजान ईद प्रमाणेच मुस्लिम बांधव बकर ईदचा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. या दिवशी मुस्लिम बांधव बकऱ्याची कुर्बानी देतात. तर बकर ईदच्या दिवशी बकऱ्यांना विशेष मागणी असते. दर मंगळवारी सोलापूर



शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर जनावरांचा बाजार भरतो. मंगळवारी भरलेल्या बाजारात एका बोकडाची चर्चा आहे.

होटगीच्या शेतकऱ्याने एक बोकड विक्रीसाठी आणला आहे. या बोकडाच्या डोक्यावर चंद्राची खूण असून त्याला मोठी मागणी आहे. श्रीशैल लांडगे यांच्या जवळ २ ते ३ वर्षाचा देशी जातीचा बोकड आहे. हा बोकड दिसायल तंदुरुस्त आणि उंच असून त्याचे वजन साधारण ५५ ते ६० किलोपर्यंत आहे. मालक श्रीशेल लांडगे यांनी त्याची किंमत ६ लाख रुपये इतकी ठेवली असून या बकऱ्याचा लिलाव पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती.

### ५ लाख आले तरच देणार...

श्रीशैल लांडगे हे शेतकरी असून ते गेल्या आठ ते दहा वर्षांपासून जोडधंदा म्हणून देशी जातीच्या शेळीचे बंदिस्त शेळीपालन करत आहेत. त्यांच्याजवळ देशी ५ शेळ्या आणि ४ बोकड आहेत. सोलापुरातील भरलेल्या जनावरातील बाजाराला या बोकडाला लिलावात २ ते ४ लाख रुपयाला मागणी केली आहे. तर बकऱ्याचे मालक श्रीशैल लांडगे यांनी कमीत कमी पाच लाख रुपयांपर्यंत दर आला तरच बोकडाची विक्री करणार असल्याचे सांगितले. दरम्यान, डोक्यावर चंद्र असलेला देशी जातीचा बोकड किती रुपयाला विक्री होणार आणि त्याला कोण खरेदी करणार हे पाहण्यासाठी बाजारात उत्सुकता आहे.

# संगीत कान्होपात्रा नाटकाचा प्रयोग शनिवारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

संत चोखामेळा यांच्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला शनिवार २४ मे रोजी सायंकाळी ७ वाजता हुतात्मा स्मारक मंदिरात कान्होपात्रा या संगीत नाटकाचा प्रयोग आयोजित करण्यात आला आहे.

पुण्याच्या बालगंधर्व संगीत रसिक मंडळातर्फे हे नाटक सादर करण्यात येणार आहे. या नाटकात चोखोबाची भूमिका सूरगंधर्व सुरेश साखवळकर हे साकारणार असून अस्मिता चिंचाळकर या कान्होपात्रेची भूमिका करणार आहेत. या शिवाय बालगंधर्वांच्या नातसून अनुराधा राजहंस, रविंद्र कुलकर्णी, अभिनेत्री गात, चिन्मय पाटसकर, अवंती बायस, निरंजन कुलकर्णी, विवेक काटकर व अजित भालेराव हेही अन्य



भूमिका साकारतील. या नाटकासाठी ऑर्गन साथ संजय गोगटे, तबला साथ केदार कुलकर्णी, व्हायोलीन साथ प्रज्ञा देसाई, पखवाज साथ नंदू भांडवलकर तर टाळाची साथ सुरेश कुलकर्णी यांची असेल. चोखामेळा व कान्होपात्रा हे सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढ्याचे असल्याने या नाटकाचा प्रयोग सोलापूरमध्ये होणे औचित्याचे असून रसिकांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याप्रसंगी सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.




# वैद्यकीय विद्यार्थ्यांनी संशोधनावर जोर देण्याची गरज

**कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांचे प्रतिपादन**

**सोलापूर विद्यापीठात आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरू**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२०मे-**

आरोग्यव्यवस्थेसमोर उभी असणारी आव्हाने पाहता वैद्यकीय विद्यार्थ्यांनी सामाजिकदृष्ट्या उपयुक्त ठरेल, अशा संशोधनावर जोर देऊन त्यामध्ये कार्य करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामार्फत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या समर इंटर्नशिप प्रोग्रॅमच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. डॉक्टर रुग्णसेवा करत असतात मात्र त्यासोबतच त्यांनी संशोधक वृत्ती जोपासली तर वैद्यकीय विद्यार्थ्यांमधून चांगले संशोधक निर्माण होऊ शकतील, असेही प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

सदर समर इंटर्नशिप प्रोग्रॅम दि. १९ ते ३१ मे २०२५ या कालावधीत विद्यापीठ आरोग्यकेंद्रात पार पडणार असून त्यामध्ये विद्यार्थ्यांना योग, आरोग्य सांख्यिकीशास्त्र, संभाषण कौशल्य, वैद्यकीय संशोधन पद्धती, नवीन शैक्षणिक धोरण अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाणार असल्याची माहिती सदर प्रोग्रॅमचे नोडल ऑफिसर व विद्यापीठाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजित जगताप यांनी दिली. या प्रसंगी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, योग प्रशिक्षक प्रा.डॉ. शालिनी मस्के, तृप्ती अवताडे तसेच इंटर्नशिप प्रोग्रॅम करता निवड झालेले सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# गो, गंगा अन् गीता यांच्या सेवेनेच जीवनात आनंदप्राप्ती





**निरूपणकार विवेक घळसासी**

**भागवतकथेचे द्वितीय पुष्प**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२० मे-**

प्रत्येकजण आनंदाच्या प्राप्तीसाठी सध्या झगडतोय. परंतु तो मिळत नसल्याने प्रत्येकाच्या पदरी दुःख आहे. सुख दुःखाच्या फेऱ्यांत आपण नुसतेच फिरतोय. सुख दुःखाच्या फेऱ्यातून बाहेर येण्यासाठी प्रत्येकाची धडपड आहे. परंतु त्यासाठीचा प्रयत्न मात्र आपल्याकडून होताना दिसत नाही. भारतातील प्रत्येकाने जीवनात आनंदाच्या प्राप्तीसाठी गाय, गंगा आणि भगवतगीतेची सेवा करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन निरूपणकार विवेक घळसासी यांनी आज केले.

जुळे सोलापूर येथील द्वारकाधिश मंदिरात जवळगेकर परिवाराकडून श्रीमद भागवत कथा ज्ञान यज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यातील द्वितीय पुष्प गुंफताना श्री. घळसासी बोलत होते. आजच्या कथेची सुरूवात सोलापूरचे धार्मादाय आयुक्त तथा न्यायाधिश प्रविण कुंभोजकर, अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर महाराज इंगळे, प्रदेश अध्यक्ष ज्योतीराम चांगभले यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाली. यावेळी दिलीप जवळगेकर, दिपाली जवळगेकर, न्यायाधिश सोनाली जवळगेकार, संदिप जवळगेकर, मंदिराचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक आदिसह भाविक उपस्थित होते.

श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी हे नाथ नारायण वासुदेव या भजनाने कथेला सुरूवात झाली. श्री. घळसासी यांनी भक्तीचा उगम, तिची बाल्यावस्था, तारूण्य व वृध्दावस्था याबाबतीत भागवतात आलेली कथा सांगून भागवतकथा श्रवणाचे महत्व सांगितले. कथेच्या श्रवणामुळे धुंधुकारीचा उध्दार कसा झाला याची कथा श्री. घळसासी खुपच खुलवून सांगितली. धुंधुलीच्या पोटी जन्मलेला धुंधुकारी महापातकी कसा होता त्याचा उध्दार होण्यासाठी त्याचा बंधु ज्याचा जन्म गाईच्या कानापासून झाला असा गोकर्ण याने कोणते प्रयत्न केले याची कथा आपल्या विशेष शैलीत त्यांनी सांगितली. धुंधुली म्हणजे चंचलबुध्दी, या चंचलबुध्दीच्या पोटी जन्मलेला धुंधुकारी म्हणजे दुष्टबुध्दी अन सात्विक गायी पासून जन्मलेला गोकर्ण म्हणजे सदबुध्दी अशी संगती त्यांनी आपल्या सरल वाणीतून श्रोत्यांच्या मनात उतरवली. धंधुकारीच्या हातून घडलेली पातके कशानेच संपुष्टात आली नाहीत म्हणून गोकर्णला भागवतकथा करावी लागली. या कथेच्या श्रवणाने महापातकी धुंधुकारी उध्दरून गेला कारण त्याने नुसती कथा श्रवण केली नाही तर त्याचे मनन व चिंतन केले. त्यामुळे सात दिवसाच्या कथा श्रवणानंतर त्याला नेण्यासाठी देवलोकातून विमान आले. आपणही कथा श्रवण करतो परंतु त्याचे चिंतन व मनन करतोच असे नाही. गोकर्णाचा जन्म गायीच्या गोठ्यात झाला म्हणून गोसेवा करणारा गोकर्णासारखा ज्ञानी होतो. त्यामुळे गोसेवा, गंगामातेची सेवा अन भगवतगीतेची सेवा प्रत्येक भारतीयाने केलीच पाहिजे. आपल्या धर्मशास्त्रानुसार ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास अशा चार आश्रमव्यवस्था सांगितल्या आहेत. त्यातील सध्याच्या जीवनातील वानप्रस्थ म्हणजे वयाच्या पन्नासीनंतर बॅग भरावी अन वयाच्या साठीनंतर बाहेर पडावे. अर्थात घरातले लक्ष कमी करावे. मुले, सुना यांच्या संसारात लुडबुड करू नये असे श्री. घळसासी यांनी हास्यविनोदाच्या शैलीत सांगितले. त्याला श्रोत्यांनी मोठी दाद दिली. यावेळी स्थानिक गायक कलाकारांनी भजनांचे सादरीकरण केले. त्यामुळे कथेमध्ये रंगत आली होती. आजच्या कथेलाही पावसाने हजेरी लावली. पाऊस असूनही श्रोत्यांनी गर्दी केली होती. कथेचा शेवट द्वारकाधिश मंदिराच्या भारती पटेल यांच्या हस्ते महाआरतीने झाला.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# न्यायालयात वळसंगकर कुटुंबातील सदस्यांचे जबाब नोंदविले

- डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण
- मनिषा मानेच्या जामीन अर्जावर सरकारी पक्ष आज म्हणणे देण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मे-**

मंगळवारी न्यायालयात बीएनएस कलम १८३ प्रमाणे डॉ. शोनाली वळसंगकर, डॉ. अश्विन वळसंगकर व इतर चार कर्मचाऱ्याचे जबाब नोंदवले गेलेत अशी विश्वासू सूत्राकडून समजते. प्रसिध्द मेंदू विकारतज्ञ डॉ. शिरिष वळसंगकर यांनी डोक्यात बंदुकीद्वारे गोळी झाडून आत्महत्या केली. या प्रकरणात अटकेत असलेल्या संशयित आरोपी मनिषा माने-मुसळे (वय ४५) या अटकेत आहेत तरी त्यांच्या जामीन अर्जावर बुधवारी (दि.२१ मे) सरकारी वकील आपले म्हणणे सादर करण्याची शक्यता आहे. जामीनचा अर्ज अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश जयदीप मोहीते यांच्याकडे हा अर्ज प्रलंबित आहे.


डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण

१८ एप्रिल रोजी डॉ.वळसंगकर यांनी डोक्यात बंदुकीद्वारे गोळी झाडून आत्महत्या केली. ही आत्महत्या डॉक्टरांनी हॉस्पिटलमधील प्रशासकीय अधिकारी मनिषा माने- मुसळे यांनी केलेल्या खोटारडे व घाणेरडे आरोपांमुळे केली आहे, तशी फिर्याद डॉक्टरांचे चिरंजीव डॉ. अश्विन यांनी सदर बझार पोलिसांत दिली होती. त्यावरून मनिषा माने यांनी पोलिसांनी कोर्टाची विशेष परवानगी (दि.२० एप्रिल) रात्रीतच अटक केले. न्यायालयात हजर केले असतो,त्यांना सात दिवसाची पोलिस कोठडी मिळाली. आता संशयित आरोपीच्या अर्जावर बुधवारी दुपारी सरकारी पक्ष म्हणणे सादर करण्याची शक्यता आहे. संशयित आरोपीतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे हे काम पाहत आहेत.



## ▶▶ महत्वाचे...



### बाळेमधील संतोष नगरात हाणामारी; चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २० मे -**

शहरातील बाळे परिसरातील संतोष नगरात महिलेस मारहाण केल्याप्रकरणी दोन महिलांसह चौघांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महादेवी कृष्णा बंदीछोडे (वय ३६, रा. घर नं. ७१, संतोष नगर, बाळे, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन ऋषिकेश मोहिते, आशा मोहिते, श्रीरंग मोहिते, सोनी मोहिते (रा. संतोष नगर, बाळे, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संतोष नगरात तीन दिवसापूर्वी ऋषिकेश मोहिते यांनी महादेवी बंदीछोडे यांना मारहाण केली होती. या मारहाणीबाबत १९ मे रोजी रात्री आकराच्या सुमारास महादेवी बंदीछोडे व त्यांचे पती हे ऋषिकेश मोहिते याच्या घरी जाऊन विचारणा करण्यास गेले होते. त्यावेळी ऋषिकेश मोहिते यांनी बंदीछोडे यांना तुमची पत्नी नेहमी वाटेत बादली व बॅरेल ठेवते, तिला समजावून सांगा, नाही तर भांडण होईल असे म्हणाले. त्यावेळी बंदीछोडे यांनी सदरची जागा ही दोघांना जाण्याकरीता आहे असे सांगितले असता मोहिते यांनी बंदीछोडे यांना शिवीगाळ करून मारहाण केली. यावेळी आशा मोहिते या महिलेने महादेवी यांचे केस ओढून खाली पाडून दगडाने मारहाण केली. तसेच बंदीछोडे यांच्या घराचे काचा व बॅरेल फोडून नुकसान केले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

# हद्दवाढ भागात पिण्याच्या पाण्याचा ठणठणाट!

- ✔ दहा दिवसानंतर सुद्धा पाणीपुरवठा नाहीच
- ✔ नई जिंदगी, शिवगंगा नगर, सिद्धेश्वर नगर, कुमठा नाका परिसरातील नागरिकांचा संताप
- ✔ उघड्या गटारीमधून घातले पिण्याचे पाईपलाईन





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मे-**

सोलापूर शहरातील हद्दवाढ भागात पिण्याच्या पाण्याचा ठणठणाट जाणवत आहे. हद्दवाढ भागातील नई जिंदगी, शिवगंगा नगर, सिद्धेश्वर नगर, कुमठा नाका आदीं परिसरातील पाणी पुरवठा खंडित झाल्याने नागरिकांच्या घशाला कोरड पडली आहे. स्थानिक नागरिकांनी याचे खापर प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यावर फोडले आहे.

दरम्यान, सोलापूर शहरातील हद्दवाढ भागात नेहमीच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. अशातच संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झालेला आहे. पाच दिवसानंतर येणारे पाणी आता चक्क दहा दिवसांनी येत असल्याने, नागरिकांनी प्रशासनावर संताप व्यक्त केला आहे. हद्दवाढ भागात पिण्याच्या पाण्याचे वाटपाचे नियोजन नेहमी कोलमडलेले असते. ऐन उन्हाळ्यात पाण्याचे योग्य नियोजन व वितरण आवश्यक असताना तसे होताना दिसत नाही. महापालिका प्रशासनाच्या वतीने वेळी अवेळी पाणी वितरण केले जाते. हद्दवाढ भागातील कुमठा नाका परिसरात सोमवारी रात्री उशिरा १२:०० वाजता पाणी वितरण केले गेले. यामुळे नागरिकांना नाहक मनस्ताप आणि शारीरिक त्रास सहन करावा लागला.

मात्र प्रशासनाला याचे कोणतेही देणे घेणे नाही? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



पिण्याला योग्य असे पाणी येत नाही, अवेळी पाणीपुरवठा, कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा या अशा एक अनेक न समस्यामध्ये स्थानिक रहिवासी अडकून गेला आहे. नई जिंदगी भागातील शिवगंगा नगर भाग एक, भाग दोन आणि भाग तीन या परिसरात पाणी पुरवठ्याचे दिवस उलटून तीन दिवस झाले. तरीही तब्बल दहा दिवसानंतर देखील पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांनी महापालिका प्रशासनावर ताशेरे ओढले. प्रशासन वर्षभराचे पाणीपट्टी घेते, परंतु पाणी सहा महिन्याचे पण देत नाही. असा खडा सवाल यावेळी उपस्थित केला गेला. लोकप्रतिनिधी देखील याकडे डोळे झाक करतात. जुने नगरसेवक काम करत नव्हते म्हणून नवीन नगरसेवक निवडून दिले. ते देखील असेच करत असल्याने आम्ही कुणाकडे जायचे असा प्रश्न स्थानिक महिलांकडून उपस्थित केला जात आहे.

धक्कादायक बाब म्हणजे उघड्या गटारी मधूनच पिण्याचे पाईपलाईन घातल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. पिण्याचे पाईपलाईन सर्रासपणे गटारी मार्फत नागरिकांच्या घरोघरी पोहोचलेले आहेत. पावसाळ्याच्या तोंडावर अशा अवस्थेतील पिण्याचे पाणी नागरिकांना तसेच आबालवृद्धांना धोकादायक ठरत आहे.

### पाण्याचा मोठ्या प्रमाणात तुटवडा



पाण्याचा नेहमीच तुटवडा जाणवतो. उन्हाळ्यामध्ये सर्वात जास्त पाण्याचा तुटवडा भासत आहे. यंदा दहा दिवसानंतर देखील पाणीपुरवठा झाला नाही. अशा अवस्थेत कसे जगायचे? पाण्याशिवाय कोणतीही गोष्ट होत नाही. पाणी नसेल तर कोणतीही कामे होत नाहीत. नगरसेवक लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करतात. आमच्या हद्दवाढ भागामध्ये नेहमीच पाण्याची टंचाई जाणवते. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे.

**- मेहरून शेख, स्थानिक नागरिक**

### अवेळी पाणीपुरवठ्यासह अनेक समस्या



अवेळी पाणीपुरवठ्यासह अस्वच्छता, ओव्हर फ्लो होणारे ड्रेनेज चेंबर, अपुऱ्या मूलभूत सुविधांमुळे नागरिक हैराण परेशान झालेले आहेत. अधिकारी कर्मचारी तसेच लोकप्रतिनिधी देखील हद्दवाढ भागाकडे दुर्लक्ष करतात. कर मात्र वेळेवर वसूल करतात. अशा अवस्थेत नागरिकांनी कोणाकडे जायचे?

**- शबाना शेख, स्थानिक नागरिक**

### दहा दिवस झाले तरी पाणीपुरवठा नाही



शहराला पाणीपुरवठा करण्यामध्ये महापालिका प्रशासन अपयशी ठरत आहे. हद्दवाढ भागामध्ये दहा दिवसानंतर देखील पाणी वितरण होत नसेल, प्रशासन काय कामाचे आहे? आम्हाला पाणी विकत घ्यावे लागत आहे. एकीकडे पाणीपट्टी भरायची, तर दुसरीकडे पाणी विकत घ्यायचे. शिवनगर भाग एक मध्ये पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही. महापालिकेचे, अधिकारी, कर्मचारी तसेच लोकप्रतिनिधी याकडे लक्ष देत नाहीत.

**- मोहम्मद पटेल, स्थानिक नागरिक**

### पाण्यासह मूलभूत सुविधांचा अभाव



सोलापूर शहरातील नई जिंदगी परिसरात नेहमीच मूलभूत सुविधांचा अभाव आहे. स्थानिक नगरसेवक, लोकप्रतिनिधी, महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी आमच्या या भागाकडे दुर्लक्ष करतात. पाण्याचे वणवण कायम आहे. तसेच सर्वत्र स्वच्छता, उघड्या गटारी, ड्रेनेज चेंबर, अशा विविध समस्या देखील उपस्थित होतात. पाणीदेखील अवेळी वितरित केले जाते. रात्रभर जागरण करून पाणी भरावे लागते. परिस्थितीत नागरिकांचे जीवन त्रासदायक ठरत आहे. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे.

**- समीर तांबोळी, स्थानिक नागरिक**

## ॲड. राजेश कांबळे खून खटला;
# दोन साक्षीदारांच्या साक्षी नोंदविल्या

- पुढील सुनावणी २ जूनला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे -**

ॲड. राजेश श्रीमंत कांबळे (वय ४५, रा. ४३, ब्रह्मचैतन्य नगर, नवीन आर. टी. ओ., सोलापूर) याचा खून केल्याप्रकरणी आरोपी संजय उर्फ बंटी महादेव खरटमल, ॲड. सुरेश तारू चव्हाण व श्रीनिवास महांकाळी येलदी यांच्यावर भरलेल्या खटल्याच्या सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश जे.जे.मोहिते यांच्यासमोर सुरू झाला.

खटल्याच्या सुनावणीच्या वेळी साक्षीदार प्रमोद श्रीमंत दावणे याने आपल्या साक्षीत ८ जून २०१९ रोजी तो व त्याचा मित्र असे दोघे अश्विनी हॉस्पिटल बाहेर बोलत थांबले होते. त्या वेळेस तो आरोपी बंटी खरटमल याच्या जवळ गेला असता आरोपी बंटी याच्या गळ्यात दोन सोन्याचे लॉकेट, हातात दोन सोन्याचे अंगठ्या असे त्याच्या अंगावर सोने घातले होते. ह्यावर साक्षीदारानी हे कसे काय असे विचारले असता, त्यावर आरोपी बंटी यांनी गेम केली आहे असे म्हणाला. अशी महत्त्वपूर्ण साक्ष नोंदविले.

त्यानंतर दुसरा साक्षीदार रवींद्र लक्ष्मण शेगुरे यांनी आपल्या साक्षीत मयत राजेश कांबळे हा त्याच्याकडे कपडे शिवण्यास टाकत होते व ते कपडे शिवल्यावर शर्टाच्या कॉलर वर zoop अशा नावाचे लेबल लावत असे त्यास सदर साक्षीदाराने घटनेच्या वेळेस मयताने घातलेला जो शर्ट होता त्यावर नावाचे लेबल होते ते त्याने ओळखले. अशी महत्त्वपूर्ण साक्ष नोंदवली. आरोपींच्या वकिलांनी घेतलेल्या उलट तपासात साक्षीदाराने नकारात्मक उत्तरे दिली. यातील साक्षीदार सागर गागडे याच्या उलट तपास घेण्यास २ जून २०२५ ही तारीख नेमण्यात आली.

या खटल्यात विशेष सरकारी वकील ॲड. उज्वल निकम, मूळ फिर्यादीतर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. विनोद सूर्यवंशी तर आरोपींकडून ॲड. राजेंद्र फताटे, ॲड. नागराज शिंदे, ॲड. जयदीप माने हे काम पाहत आहेत.

# पालकांनी मुलांशी सुसंवाद ठेवावा

- ✔ ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी
- ✔ विवेकानंद केंद्राच्या वासंतिक शिबिराचा समारोप


व्यक्तिमत्त्व विकास शिबिराच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी. व्यासपीठावर गायत्री क्षीरसागर, पंडित बिराजदार.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

आजच्या मुलामुलींत पराकोटीची गुणवत्ता आहे. ते परीक्षेत गुण मिळवून यशस्वी होतील, पण पालक त्यांच्या आंतरिक गुणांकडे पाहत नसल्याची स्थिती आहे. पालकांनी अभ्यास वगळता अन्य विषयांबाबत त्यांच्याशी संवाद साधायला हवा. त्यासाठी घरातील वातावरण मोकळे हवे, असे प्रतिपादन ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांनी केले.

मंगळवारी (ता. २०) विवेकानंद केंद्र कन्याकुमारी जुळे सोलापूर शाखेच्या निवासी व्यक्तिमत्त्व विकास शिबिराच्या समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून शिबिरार्थ्यांसह पालकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. मुलांना कसे वाढवायचे, हे पालकांना कळत नसल्याचे सांगून ते म्हणाले, सांभाळून घेण्याने मुले दुबळी बनतात. मस्तीही अनुशासनात करायला हवे, खेळण्यात आनंद आहे, हे त्यांच्यात रुजवायला हवे. मुलांना प्रेमाचा स्पर्श द्या, त्यांच्या वयाचे बनून त्यांच्याशी खेळा, त्यामुळे ते आनंदी, निरोगी व तेजस्वी बनतील. प्रेम बाजूला ठेवून शिस्त लावा. कष्ट करण्याचे संस्कार करा असे सांगितले. हर्षदा स्वामी हिने गीत गायिले. शिबिर प्रमुख गायत्री क्षीरसागर हिने अहवाल वाचन केले. नगरप्रमुख पंडित बिराजदार यांनी आवाहन केले. सई ढगे हिने सूत्रसंचालन केले. स्वामी विवेकानंदांच्या मूर्तीस पुष्पार्पणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### १०८ सूर्यनमस्कार अन् मातृ-पितृ पूजन

या शिबिरात सहभागी ७६ शिबिरार्थींनी सकाळी सामुदायिक ७५ सूर्यनमस्काराने सूर्याला अर्घ्य दिले. त्यानंतर मंत्रोच्चारात व विधिवत मातृ - पितृ पूजन सोहळा झाला. विवेकानंद केंद्राचे प्रांत अमृत परिवार प्रमुख श्रीराम जोशी यांनी या सोहळ्याचे संचालन केले. दरम्यान, प्रांत कार्यपद्धती प्रमुख मदगोंडा पुजारी यांनी पालकांनी केंद्र कार्याची माहिती दिली.

### घराचे झाले पोलिस ठाणे

आज घराचे पोलिस ठाणे झाल्याचे सांगून ज्येष्ठ निरुपणकार घळसासी म्हणाले, आज समाजात अनेक संकटे, प्रश्न आ वासून उभी आहेत. अशाप्रसंगी विशेषतः मुलींना आईला बोलायचे असते. पण आईच मोबाईलमध्ये अडकली आहे. शाळेतून घरी परतल्यावर तिचा केवळ अभ्याचाच हेका आहे. त्याऐवजी त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधा, ते सुख, दुःखासह प्रत्येक गोष्ट पालकांशी वाटून घेतील.



# ज्ञानामृत आनंदलहरी ११२२

**कागाचिये विष्ठें जन्म पिंपळासी ।**
**पांडव कुळासी पाहतां दोष ।।**

चांगल्यातून जशी चांगल्याची निर्मिती होते, त्याप्रमाणे वाईटातूनही बऱ्याचवेळा चांगल्याची निर्मिती होते. कशातून कशाची निर्मिती झाली, याकडे पाहण्यापेक्षा काय निर्माण झाले, याकडे लक्ष देणे योग्य असते. अर्थात आपल्या डोळयासमोर चांगले असेल तर ते चांगले चांगल्यातून निर्माण झाले का, वाईटातून निर्माण झाले याकडे पाहू नये. जे चांगले आहे त्याचा स्विकार करावा, आणि वाईट आहे, त्यात परीवर्तन होते काय, याकडे लक्ष द्यावे. हे जरी सत्य असले तरी माणूस खोदून-खोदून मूळ शोधण्याचाच प्रयत्न करतो. मानवाची ही वृत्ती त्याच्यासाठीसुध्दा घातकच असते. तसे पाहू गेल्यास समाजात अशा अनेक गोष्टी, घटना, व्यक्ती असतात की, ज्यांची निर्मिती वाईटातून किंवा अयोग्यतेतून झालेली आहे. निर्मितीच्या वाईटत्वाकडे पाहून निर्माण झालेला चांगुलपणा कोणी टाकून देत नसतो. तरीपण वाईटपणा पाहण्याची किंवा नांव ठेवण्याची मानवी वृत्ती आहे.



मोठया प्रमाणावर वट आणि पिंपळ काग विष्ठेपासून निर्माण झालेले असतात. आपण त्यांच्या मूळ निर्मितीचे माध्यम न पाहता त्यांना पवित्र मानतो. पण त्यांच्या निर्मितीचे माध्यम पाहू गेल्यास वट, पिंपळांना टाकून द्यावे लागेल. पांडवांचे कुळ शोधू गेल्यास कठीण प्रश्न समोर उभे राहू शकतात. म्हणून वट, पिंपळाच्या पावित्र्याकडे तसेच पांडवांच्या कृतीकडेच लक्ष देणे योग्य आहे. याअनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, कागाचिये विष्ठें जन्म पिंपळासी । पांडव कुळासी पाहतां दोष ।। जे पवित्र किंवा कर्तव्य तत्पर आहेत त्यांच्यातील दोष पाहण्याची वृत्ती योग्य नसते. पावित्र्याला, कर्तव्यतत्परतेला मान्यता देणेच योग्य असते. गाय घाण खाते, गंगेत ओढा मिसळतो, शकुंतला ही विश्वामित्राच्या योगाने मेनकेपासून झाली, व्यास ऋषी कोळणीपासून जन्मले आदी बाबीकडे लक्ष देणे संयुक्तीक नाही. अजामेळ, गणिका, कुब्जा दासी, विदूर, पिंगळा, वाल्याकोळी, पांडव आदींची कुळे शोधणे म्हणजे वेडेपणा होय. आपल्यासमोर त्यांचे उत्कृष्ट कार्य उभे आहे, त्यामुळे त्यांच्या बुडाशी जाऊन कांहीतरी नांव ठेवणे योग्य नाही. जे समोर आहे, त्याचा स्विकार करणे योग्य असते. अनेक संत महात्म्यांची कुळंसुध्दा अशीच वादग्रस्त असणारी आहेत. म्हणून कोणाच्या कुळाकडे न पाहता किंवा कोणाचे कुळ न शोधता, त्यांच्या कार्याचा, सत्कर्माचा विचार करावा. कोण कोणाच्या पोटी जन्माला आला किंवा कोणाचा जन्म कसा झाला याचा शोध घेण्यापेक्षा त्याने त्याच्या जीवनात काय कार्य केले, याकडे पहावे. आपणाला प्रगती करायची असेल तर आपली दृष्टी सकारात्मकच असायला हवी. नको त्या गोष्टीचा, घटनेचा शोध घेत राहणे, म्हणजे आपल्या जीवनातील अमूल्य वेळ वाया घालवणे होय. ज्या घटना मानवाच्या हातात नाहीत, किंवा ज्यासाठी माणूस दोषी नाही, अशा घटना, असे दोष शोधण्यात अर्थ नसतो. नको ते शोधण्याची आपली वृत्ती असेल तर आपल्याकडून कांही चांगले घडत नाही. आपल्या हातून चांगल्याची निर्मिती करायची असेल तर आपली दृष्टी सकारात्मक असायला हवी. त्याचबरोबर आपली वृत्ती चांगुलपणा पाहणारी असायला हवी. जशी दृष्टी तशी सृष्टी म्हटल्याप्रमाणे आपल्या दृष्टीवर बरेच काही अवलंबून आहे, हे लक्षात ठेवावे.

जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# सुप्रभात

## आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - |
| दि. २१ मे २०२५ | राजीव गांधी स्मृतिदिन |
| विक्रम संवत् २०८१ | दहशतवाद विरोधी दिन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. नवमी (२७.२१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - शततारका (१८.५७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वैधृति (२४.३३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (१६.१३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

## राशीभविष्य

**मेष :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. दाम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा.

**वृषभ :** व्यावहारिक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. व्यापार, नोकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफिकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. काही घटनांमध्ये आपल्याला आज मनस्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढेल.

**कन्या :** लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार-व्यवसायात विस्तार होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकार्य कमी प्रमाणात मिळेल.

# स्मार्ट सिटीच्या रस्त्यावर आजोऱ्याचे ढीग

## अपघाताला आमंत्रण; कौंतम चौकात रस्त्यालगत उघडे चेंबर ठरतात मृत्यूचा सापळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

स्मार्टसिटीच्या स्मार्ट रस्त्यांवर ओजोराचे ढीग पडलेले आहेत. विशिष्ट कामासाठी खोदण्यात आलेले खड्डे तसेच उघडे ठेवण्यात आल्याने शहरातील कौंतम चौक अपघाताचे केंद्र ठरत आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था यामुळे विस्कळीत होत आहे. रस्त्यालगत ओजोराचे ढीग वाढत आहेत. अशातच विविध फेरीवाले आणि किरकोळ विक्रेत्यांनी रस्त्यालगत आपला व्यवसाय मांडल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. मात्र याकडे प्रशासनाचे डोळेझाक होताना दिसत आहे.

दरम्यान, शहराच्या विविध भागात अशा पद्धतीचे अर्धवट कामे केलेली दिसून येतात. काही विशिष्ट कामकाजासाठी चेंबर उघडण्यात येते. काही कारणास्तव खड्डे खोदले जातात. चांगला रस्ता खराब केला जातो. आणि रस्त्याच्या बाजूला ओजोराचा ढीग तसाच ठेवला जातो. यामुळे शहराच्या विद्रूपिकरणात भर पडतेच, तसेच अपघाताला देखील आमंत्रण मिळत आहे. मात्र याकडे महापालिकेच्या संबंधित विभागाचे, अधिकाऱ्यांचे, आणि ठेकेदारांचे दुर्लक्ष होताना दिसते. सिमेंट कॉंक्रेट रस्ते फोडून सदरचे काम करण्यात आले.

मात्र रस्त्यांवर टाकलेला ओझोरा काढण्यास प्रशासनाकडे वेळच उपलब्ध नसल्याचे दिसत आहे. तर काही ठिकाणी चेंबरवरचे भले मोठे झाकण काढले, मात्र काम झाल्यानंतर सदरचे झाकण तसेच रस्त्यावर टाकून दिलेल्याने वाहनधारक व पादचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे दिसून येत आहे. वास्तविक पाहता वाहतूक व्यवस्थेला अडथळा निर्माण होऊ नये, असे काम करणे अपेक्षित असताना, तसे न होता त्या उलट सार्वजनिक वाहतुकीला अडथळा होईल अशा पद्धतीचे कार्य प्रशासनाकडून केले जात आहे. असा सूर आता स्थानिकांमधून उमटत आहे.

**चेंबर ठरतात मृत्यूची गुहा**

सोलापूर शहरातील कौंतम चौक येथे रस्त्याच्या बाजूला असलेले चेंबर उघडे असल्याने पायी जाणाऱ्या नागरिकांना धोका संभवतो आहे. रात्री अंधारामध्ये सदरचे उघडे चेंबर नागरिकांसाठी मृत्यूचा सापळा बनू शकतात. महापालिका प्रशासनाने तात्काळ सदर चेंबर झाकून घ्यावेत. तसेच आजूबाजूला पडलेला ढीग काढून घ्यावा.

**- मल्लिनाथ स्वामी,**
वाहनधारक





गेल्या अनेक दिवसांपासून सदरचे कामकाज अर्धवट स्थितीत असून याकडे प्रशासनाची दुर्लक्ष होत आहे. महात्मा बसवेश्वर पुतळा परिसरात चेंबर झाकण उघड्यावर पडलेले आहेत. ठिकठिकाणी खड्डे खोदलेले आहेत. त्यातील माती आणि ओझोराचे ढीग रस्त्यावर तसेच पडलेले आहेत. ऐन पावसाळ्याच्या दिवसात रस्त्यांवर असे मातीचे ढीग पडल्याने अपघातांचे प्रमाण वाढत आहे. तसेच फेरीवाले व किरकोळ दुकानदार यांचे अतिक्रमण असते. अशातच सदरचे ढीग रस्त्याकडेला पडल्याने वाहतुकीला अडथळ निर्माण होत आहे.

**- योगेश कुंदुर,** सामाजिक कार्यकर्ते

# अग्निकांडास कारणीभूत असणाऱ्या यंत्रणेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

## कॉ. आडम मास्तर यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील सेन्ट्रल कारखान्यास १८ मे रोजी पहाटे ३.३० वाजता भीषण आग लागली आणि ही आग आटोक्यात आणण्यासाठी तब्बल १२ तास लागले. या दरम्यान या भीषण आगीत चिमुकल्या दीड वर्षांच्या बाळासह ८ जण आगीत भस्मसात झाले. ही घटना सोलापूरच्या औद्योगिक वसाहतीत काळा दिवस ठरला. आगीत अडकलेल्या लोकांनी मदतीसाठी पहाटे ४ वाजता अग्निशामक दल आणि संबंधित महानगरपालिकेच्या प्रशासनाकडे फोनद्वारे संपर्क केले.

मात्र त्या ठिकाणी यंत्रणा घटनास्थळी पोहचण्यास तब्बल एक ते दीड तास विलंब झाला. सुरुवातीला अग्निशामक दलाची गाडी त्यात पाणी नव्हते, ती रिकामी गाडीच होती, ती गाडी परत पाठविल्यानंतर दुसरी गाडी आली त्यात पाण्याचा उच्च दाब नव्हता, अधिकाऱ्यांना घटनेची माहिती मिळूनही तात्काळ घटनास्थळी पोहचू शकले नाही. त्यामुळेच आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या यंत्रणेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी माजी आमदार आडम मस्तर यांनी केली आहे.

दरम्यान, महापालिकेची आपत्कालीन यंत्रणा सजग आणि सतर्क राहिली असती तर कदाचित ही दुर्दैवी घटना घडली नसती. आग नियंत्रणात आणण्याची संधी गमावल्याने आगीत अडकलेल्या तीन जणांनी आपला जीव वाचवण्याच्या प्रयत्नात असताना जागीच बेशुद्ध झाले. त्यानंतर त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले, असता डॉक्टरानी मृत घोषित केले. उर्वरित पाच लोकांना बाहेर काढण्यासाठी पाणी, अग्निशामक दल, तत्सम यंत्रणा कार्यरत राहून प्रयत्न केले. परंतु ते पाच दगावले. वास्तविक पाहता सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त व संबंधित विभागाचे अधिकारी यांची यंत्रणा याकामी अकार्यक्षम व निष्प्रभ ठरली. त्यामुळे यांना जबाबदार धरण्यात यावे व संबंधित भीषण अग्नीतांडवाची सखोल व निपक्षपाती चौकशी करून या दुर्दैवी घटनेस कारणीभूत असणाऱ्या यंत्रणेवर (भारतीय न्याय संस्था कलम १०० प्रमाणे) सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदविण्यात यावा अशी मागणी आडम (मास्तर) यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे.

# २३ मे पासून दांडपट्टा, लाठीकाठी प्रशिक्षण शिबीर

**सोलापूर, दि. २० मे-**

ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन तथा भारतीय लाठी महासंघ महाराष्ट्र यांच्या वतीने दिनांक २३ ते २५ मे दरम्यान सकाळी ७ ते ८.३० या वेळेत होम मैदानावर पत्रकारांच्या पाल्यांसाठी मोफत राज्यशस्त्र दांडपट्टा, लाटी-काठी व शिवकालीन युद्धनीती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष शिवराम भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्रशिक्षणापुरते लाठीकाठी, दांडपट्टा देण्यात येणार आहे. प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष संतोष पवार , शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, सिनेट सदस्य संजय साळुंखे, लाल आखाडा तालीम संघाचे अध्यक्ष पैलवान युवराज सरवदे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पत्रकारांच्या पाल्यांनी या शिबिरामध्ये उपस्थित राहावे, असे आवाहन भोसले यांनी केले. या पत्रकार परिषदेस युवराज सरवदे, अश्विन कडलासकर आदी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत किरण सारंगचे यश

**सोलापूर, दि. २० मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत एन.बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी किरण सारंग सुरवसे हिने यश मिळवले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राने एप्रिल महिन्यात राज्यस्तर वकृत्व स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचा निकाल घोषित केला असून किरण सारंग सुरवसे हिने तृतीय क्रमांक पटकाविला. रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या हस्ते प्र. कुलगुरू लक्ष्मीकांत दामा, सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड, स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. विकास पाटील यांची उपस्थिती होती. स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज, महान योध्दा छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व युरोपियन संबंध, श्रेष्ठ साहित्यिक छत्रपती संभाजी महाराज या विषयावर वकृत्व स्पर्धा पार पडल्या. यशाबद्दल संस्था सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. रवींद्र व्यवहारे, प्रा. किरण पाटील यांनी अभिनंदन केले.



# उपोषण शिबिरात केले कर्मचाऱ्यांनी रक्तदान

## भूमी अभिलेखचे सहाव्या दिवशीही आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख, कर्मचारी संघटना पुणे विभाग यांनी केलेल्या आवाहनानुसार सोलापूर येथील भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांनी गेल्या ६ दिवसांपासून बेमुदत उपोषण सुरु केले असून, आज ६ व्या दिवशी एक सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान शिबिरही या कर्मचाऱ्यांनी घेवून एक आगळा-वेगळा पायंडा पाडला आहे. दरम्यान, या कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे शेतकरी बांधव आणि इतर नागरिकांची मोजणीची कामे मात्र रखडल्याचे दिसून येत आहे.



महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख कर्मचारी संघटना, पुणे विभाग यांनी भूमि अभिलेख विभागातील कर्मचारी यांचे पदाची कार्यकर्तव्य पार पाडत असताना येणा-या अडीअडचणी बाबत दि. २५/०२/२०२५ रोजी उपसंचालक भूमि अभिलेख पुणे, प्रदेश पुणे यांना निवेदन सादर केले होते. त्यानुसार त्यांच्याकडून दि. २७/ २/२०२५ रोजी कर्मचारी संघटने सोबत मिटींग आयोजित केली होती. सदर मिटींग मध्ये त्यांनी कर्मचारी संघटनेस सोमवार, दि. ०३/०३/२०२५ रोजी लेखी आश्वासन देणेचे मान्य केले होते. त्यानुसार लेखी आश्वासन मिळाले परंतु संदर्भीय लेखी आश्वासनामध्ये निवेदनातील २७ मुदयांपैकी केवळ परिपत्रकाप्रमाणे १२ मोजणी प्रकरणे वाटप करण्याबात (१०० दिवसाचे लक्ष्य पूर्ततेनंतर) भाष्य करणेत आले आहे. १०० दिवसाच्या कार्यक्रमामध्ये कामाची पावती म्हणून कर्मचारी यांनी केलेल्या कामाबददल मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांनी भूमि अभिलेख विभागास व्दितीय क्रमांक देवून गौरव केलेला आहे. परंतु सुधारीत वेतनश्रेणी, या प्रमुख मागणीबाबत कोणतीही टिप्पणी करणेत आली नाही. शासनास वेळोवेळी सादर केलेल्या निवेदने तसेच खातेप्रमुख यांचे सोबत झालेल्या बैठका निष्फळ ठरलेने शासन कर्मचाऱ्याच्या मागण्या बाबत उदासिनतेच्या भूमिकेत असलेचे स्पष्ठ होते. त देणेत आलेल्या निवेदनामध्ये नमूद केले प्रमाणे यापूर्वीच शासनास सदरच्या संपा बाब २/३ विषयाचे गांभीर्य शासनाचे लक्ष वेधून वेळेवेळी निदर्शनास आणून दिलेले आहे. तरी सुध्दा कोणत्याही प्रकारची दखल घेण्यास तयार नसलेने शासनास राज्यस्तरीय संघटनेकडून दिलेल्या निवेदन अन्वये एक महाचा कालावधी उलटून देखील, कर्मचारी यांच्या मागण्या शासनाकडून मंजूर करण्यात आल्या नाहीत.

# पोरेडी नेत्रालयाचे शुक्रवारी उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

येथील रेल्वे लाईन, स्टेशन रोडवरील गुडलक जनरल स्टोअर्स जवळ पोरेडी नेत्रालय आणि लेसर सेंटरचे उद्घाटन शुक्रवार दि. २३ मे रोजी सायंकाळी ६ वाजता करण्यात येणार आहे, अशी माहिती नेत्ररोग तज्ञ डॉ. अमित पोरेडी यांनी पत्रकार परिषदेत दिली. उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून खा. प्रणिती शिंदे, आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे, काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, माजी नगरसेवक मनोज शेजवाल, अमर पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या नेत्रालयात संगणकृत नेत्र चाचणी, आधुनिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया, लेन्स प्रत्यारोपण, कॉर्निया सर्व शस्त्रक्रिया, मेडिकल रेटिना, तिरळेपणाचे उपचार, मधुमेह व उच्च रक्तदाब रेटिनोपॅथी उपचार यासह विविध उपचार उपलब्ध आहेत. या समारंभास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. अमित पोरेडी , डॉ. स्नेहल पोरेडी, डॉ. सुभाष पोरेडी, डॉ. विजयालक्ष्मी पोरेडी यांनी केले आहे.

# बेघर लाभार्थ्यांच्या रखडलेल्या घरकुलास लवकरच सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मे-**



**राज्य सरकारकडून वैभव गंगणे यांच्या मागणीची घेतली दखल**

सोलापूर शहर व जिल्ह्यामधील बेघरांना तत्काळ निवासस्थानाची व्यवस्था करून देण्यात यावी. या मागणीचे निवेदन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री अदिती तटकरे यांना वैभव गंगणे यांनी लेखी निवेदनाद्वारे दिले होते. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सुरू असलेले घरकुलांचे काम तांत्रिक अडचणी मुळे प्रलंबित होते. त्यामुळे अनेक बेघर सोलापूरकरांना त्याचा लाभ घेता येत नव्हता.या समस्या तातडीने सोडवून पूर्ववत घरकुलांच्या प्रकल्पास सुरुवात करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनात केली होती. दरम्यान, याची दखल राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दखल घेऊन संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना देत, तांत्रिक अडचणीची माहिती जाणून घेत प्रकल्पाच्या कामास सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता सोलापुरातील बेघरांना त्यांच्या हक्काचे घर मिळणार आहे.

सोलापूर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार व कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापुरातील विविध प्रश्न मार्गी लावू. तसेच सोलापूरकरांना विविध योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी नेहमीच कार्यशील राहू.

**- वैभव गंगणे,** शहराध्यक्ष सोशल मीडिया राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट

# ७३ हजार विद्यार्थ्यांना मिळणार शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके

## एक जून पासून शाळांना पाठ्यपुस्तके वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मे-**

येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या महापालिकेच्या आणि सर्व माध्यमाच्या खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी शाळेच्या पहिल्या दिवशी मोफत पाठ्यपुस्तके देण्याची परंपरा या वर्षीही कायम राखली जाणार आहे. त्यासाठीची तयारी बालभारती आणि महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पूर्ण झाली असून ४ लाख ४० हजार ५८१ पुस्तकापैकी शिक्षण मंडळाला १ लाख ९५ हजार ४२६ पुस्तके म्हणजे ४४.३५ टक्के पुस्तके शिक्षण मंडळाला मंगळवारी प्राप्त झाली आहेत. उर्वरित २ लाख ४५ हजार १५५ पुस्तके पुढील ३ ते ४ दिवसात सर्व पुस्तके शिक्षण मंडळाला बालभारती कडून प्राप्त होतील शहरातील सर्व शाळांना एक जून पासून पाठ्यपुस्तके वाटप होतील अशी माहिती महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रभारी प्रशासन अधिकारी गिरीश पंडित यांनी दिली.

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर शहरातील सर्व शाळा सोमवार दिनांक १६ जून २०२५ रोजी भरणार आहेत शाळेच्या पहिल्याच दिवशी महापालिका शिक्षण मंडळातील ६३ शाळा



खासगी अनुदानित २६२ शाळा अशा एकूण ३२५ लाभार्थी शाळांना सहा माध्यमाच्या पात्र शाळेतील ७२ हजार ६२० विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके देण्यात येणार आहेत एक जून नंतर सर्व शाळांना वेळापत्रकानुसार पाठ्यपुस्तके दिली जातील अशी माहिती महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी आणि महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांनी दिली आहे. सोलापूर शहरातील मराठी, इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलगू आणि उर्दू या सर्व माध्यमाचे मिळून ३२५ शाळा मधील पहिली ते आठवीच्या ७२ हजार ६२० विद्यार्थ्यांना ४ लाख ४० हजार ५८१ पाठ्यपुस्तकांचे वाटप त्या-त्या भागातील लोकप्रतिनिधींच्या आणि मान्यवर पालकांच्या हस्ते शाळेच्या पहिल्याच दिवशी वाटप केले जाणार आहे. त्या दिवशी मुलांचे शाळेत जंगी स्वागत करण्यात येणार आहे. शाळांची स्वच्छता करणे, वर्गाची सजावट करणे, तसेच मुलांचे स्वागत वाजत गाजत करणे, यासह गुलाब पुष्प देऊन विविध रंगांचे फुगे उडवून आणि मिठाई देवून करण्यात येणार आहे याची तयारी करण्यासाठी शिक्षकांना दोन दिवस आधीच म्हणजेच शाळेत उपस्थित राहण्याच्या सूचना प्रभारी प्रशासनाधिकारी गिरीश पंडित यांनी केल्या आहेत.

यंदाच्या वर्षी पहिलीचा अभ्यासक्रम बदलला असल्याने नवीन पाठ्यपुस्तके जूनच्या पहिल्या आठवड्या पर्यंत शिक्षण मंडळाकडे प्राप्त होतील त्यानंतर दुसऱ्या आठवड्यात सर्व शाळांना ती देण्यात येतील अशी माहिती प्रशासन अधिकारी गिरीश पंडित यांनी दिली.

## महत्वाचे...



### अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात आता फ्रॅक्चरला प्लास्टर करण्याची सुविधा

**अक्कलकोट, दि. २० मे-**

अक्कलकोट येथील ग्रामीण रुग्णालयात हाडाच्या फ्रॅक्चरला आता प्लास्टर करण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे. अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अशोक राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभाग कार्यरत असून राज्य व केंद्र सरकारचा विविध योजनांची नागरिकांच्या सेवेर्थ काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात आहे. येथे डॉ. निखिल क्षीरसागर यांच्या माध्यमातून हाडाच्या फ्रॅक्चरसाठीची सेवा उपलब्ध केली आहे. त्यासाठी आता खाजगी रुग्णालय अथवा सोलापूर येथे जाण्याची आवश्यकता नाही. अशा रूग्णांना अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात डॉ.निखिल क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली औषधोपचारसह अन्य सुविधांचा लाभ दिला जात आहे. प्लास्टर ही बाब खर्चिक असल्याने सर्वसामान्यांवर आर्थिक ताण पडत होता. आता अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात प्लास्टरची सुविधा मिळणार असल्याने तालुक्यातील नागरिकांची चिंता मिटली आहे. डॉ.अशोक राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची टीम रुग्णसेवेस महत्व देऊन उत्तमरित्या कार्यरत आहे.

### शालेय विद्यार्थ्यांच्या दाखले वाटपसाठी तालुक्यात विशेष शिबीर

**पंढरपूर, दि. २० मे-**

दहावी व बारावी शालांत परीक्षेचे निकाल लागले असून, विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक असलेले दाखले सुलभ व सहज उपलब्ध व्हावेत तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक गरजांची पुर्तता व्हावी व विद्यार्थ्यांना आपले दाखले स्थानिक स्थरावर मिळावे या उद्देशाने तहसिल कार्यालय, पंढरपूर यांच्या मार्फत पंढरपूर तालुक्यात मंडळ स्थरावर श्रीमंत छत्रपती शिवाजी म हाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानातंर्गत शिबीर आयोजित करण्यात आल्याची माहिती तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली. शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक आवश्यक दाखले (उदा. उत्पन्न, वय व अधिवास, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेयर दाखला व इतर दाखले तसेच नागरिकांना रहिवाशी, उत्पन्न व जातीचे दाखले देण्यासाठी तालुक्यात दि.२३ मे रोजी करकंब, खर्डी, चळे व भंडीशेगांव व दि.२७ मे रोजी पंढरपूर, तुंगत व कासेगांव तसेच दि.३० मे रोजी रोपळे, पुळूज, पटवर्धन कुरोली, भाळवणी या महसूल मंडळाच्या ठिकाणी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्या कार्यालयात विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहे. शिबीरासाठी मंडळ निहाय महा ई-सेवा केंद्र चालक यांची नेमूणक करण्यात आली असून मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी शालेय विदयार्थी व नागरिकांनी गावनिहाय महा ई-सेवा केंद्र चालक यांच्याशी समन्वय साधून, शिबीर आयोजित करुन सदर शिबीरामध्ये जास्तीत संख्येने दाखले देण्याचे कामकाज करावे तसेच जास्तीत संख्येने उपस्थित राहून दाखले प्राप्त करुन घ्यावेत, असे आवाहन तहसीलदार लंगुटे यांनी केले.

### सह्याद्री कॉलेजमध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी मोफत मार्गदर्शन केंद्र

**सांगोला, दि. २० मे-**

मेथवडे (ता.सांगोला) येथील सहयाद्री कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये बारावी सायन्स उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पुढील फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेच्या माहितीसाठी मोफत मार्गदर्शन केंद्र सुरु केल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी दिली. प्रवेशप्रक्रिया कशी राबवतात, त्याचे वेळापत्रक, अभ्यासक्रमास लागणारी पात्रता, प्रक्रिया शुल्क, प्रक्रियेचे संकेत स्थळ, गुणपत्रे व प्रमाणपत्रे कशी अपलोड करायची, आपले संपूर्ण रजिस्ट्रेशन व निश्चिती कशी करायची, प्रवेशाच्या असणाऱ्या विविध फेऱ्या व ऑपशन फॉर्म कसे भरावे याबाबत सर्व माहिती महाविद्यालयातील अनुभवी व तज्ञ प्राध्यापकांमार्फत देण्यात येणार आहे, तरी सर्व विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी केले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी डॉ.एस.एम.मोरे (९७६६८१५१२३), डॉ.ए.एम.तांबोळी (९९७५४०२४६५), प्रा.एस.एस.काळे (९८२२०४७२३६), प्रा.एस. पी.जोकार (७२१९५१५९९८), प्रकाश पाटील (९८८१४३३६५८), पी.एस.लोखंडे (९८२३१०७३७१) यांना संपर्क करावा असे आवाहन प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी केले आहे.



### आगामी सर्व निवडणूका काँग्रेस पक्ष ताकदीने लढविणार : मोहन जोशी

**पंढरपूर, दि. २० मे-**

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महापालिका या सर्व निवडणुका ताकतीने लढविण्यात येणार असून याबाबत पंढरपूर येथे सोलापूर जिल्ह्याचे निरीक्षक तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष मोहन जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेस कमिटीचे सर्व सेलचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत आगामी निवडणूका ताकतीने लढविण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केलेला आहे. महाराष्ट्रात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाला आलेली मरगळ झटकण्यासाठी प्रदेश काँग्रेसच्यावतीने मोहन जोशी हे निरीक्षक म्हणून पंढरपूर येथे आले असता त्यांच्या उपस्थिती पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृह येथे काँग्रेस पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली. आगामी काळात काँग्रेस कार्यकर्त्याला ऊर्जा देण्याचे काम पक्षाच्या माध्यमातून केले जाईल. काँग्रेसच्या निष्ठावंत कार्यकर्त्यावर अन्याय होऊ दिला जाणार नाही, त्यांचा योग्य तो सन्मान राखला जाईल अशी ग्वाही मोहन जोशी यांनी दिली. बैठकीस अमर सूर्यवंशी, हनुमंत मोरे, सुनंजय पवार,आदित्य फत्तेपूरकर, राहुल पाटील, सुहास भाळवणकर, संदीप शिंदे, गणेश माने, महेश अधटराव, मिलिंद आढळकर, शिवाजी धोत्रे, पांडुरंग इरकल, रवी अग्रवाल, आकाश कदम उपस्थित होते.

# आठ मोरीजवळ कालव्याचे भगदाड बुजवून सोडले पाणी

**✔ फलटणच्या जलसंधारण विभागाची तत्परता आली कामी**



**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.२० मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील आठ मोरीच्या जवळ कालव्याला ६ मे २०२५ रोजी पडलेले भगदाड नीरा उजव्या कालवा फलटणच्या प्रशासनाने ताबडतोब आणीबाणी काम समजून व शेतकऱ्यांचे पाण्याविना कालव्याचे होणारे नुकसान टाळण्यासाठी रात्रंदिवस २४ तास अथक परिश्रमाने घेऊन आठमोरी निरा उजवा कालव्याजवळील पडलेल्या भगदाडाचे काम १२ दिवसाच्या आत मजबूत करून दिनांक १८मे रोजी पाणी सोडण्यात जलसंधारण विभाग फलटणच्या प्रशासनाला यश आले आहे.

६ मे २०२५ ला निरा उजवा कालव्याला भगदाड पडले होते त्याची माहिती माजी आमदार राम सातपुते यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने सुचना करून लवकरात लवकर युध्दपातळीवर हे काम पूर्ण करावे असे सांगितले. त्यानुसार मजबुतीकरणाचें काम युध्दपातळीवर २४ तास न थांबता परिश्रम घेतले. त्यातून आज १८ मे २०२५ रोजी काम पूर्ण होऊन आज कालव्याला पाणी सोडण्यात आले असल्याची माहिती वेळापूर विभागाचे शाखा अभियंता दिनेश राऊत यांनी दिली. या कामासाठी मुख्य अभियंता अनंत पासलकर, कार्यकारी अभियंता शिवाजीराव जाधव, जलसंधारण विभाग फलटण विभाग तसेच आमदार उत्तमराव जानकर, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार रणजीत सिंह मोहिते-पाटील, माजी आमदार रामभाऊ सातपुते, माजी खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर, सांगोल्याचे आमदार बाबासाहेब देशमुख, पंढरपूर - मंगळवेढ्याचे आमदार समाधान आवताडे, सोलापूरच्या खासदार प्रणीती शिंदे तसेच आपल्या हातातील कामे सोडून जेसीपी टिप्पर आदी यंत्रसामुग्री पुरविल्याबद्दल दिपक इन्स्प्रा स्ट्रक्चर व पिलीव गावचे ठेकेदार प्रकाश जाधव, तहसीलदार सुरेश शेजुळ यांच्या मार्गदर्शनाखाली पिलीव मंडल अधिकारी विजय एखतपुरे, ग्राम महसुली अधिकारी अमोल कांबळे, पोलीस स्टाफ, पत्रकार तसेच माळशिरस व वेळापूर विभागाचे कर्मचारी पाठकरी सर्वांचेच सहकार्य लाभले.

माळशिरस तालुक्यातील खडूस चौकी ते सांगोला पंढरपूर विभागातील कालवा फुटल्यामुळे झालेल्या नुकसानीचा अनुशेष भरून काढला जाईल. त्यांना तेवढे दिवस जादा पाणी सोडले जाईल. निरा उजवा कालवा आठमोरीजवळ फुटून पाणी वाहून गेल्यामुळे खालील सांगोला भागाचे नुकसान झाले असले तरी माळशिरस तालुक्यातील कुसमोड, मळोली, व शेंडेचिंच पर्यंत ओढ्याला पाणी वाहून आल्यामुळे ओढ्यालगतच्या शेतकऱ्यांचा फायदा होऊन छोट्या-मोठ्या जनावरांची पिण्याच्या पाण्याची समस्या तात्पुरती सुटून लगतच्या विहिरीला पाझराच्या पाण्याचाही फायदा होणार असल्याचे मोहिते-पाटील समर्थक युवा कार्यकर्ते अरविंद जाधव यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले व दुष्काळच हटला असल्याचे सांगितले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्यागाचा जाज्वल्य इतिहास

**● प्रा. स्नेहल पाठक : मसाप बार्शी शाखेतर्फे व्याख्यानाचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२० मे-**

पुण्यशोक अहिल्यादेवी होळकर यांचे समग्र जीवन हे म हापराक्रमी, पुरोगामी, धर्मपरायण आणि त्याग व प्रचंड धिरोदात्तपणा यांचा जाज्वल इतिहास आहे', असे गौरोवोदगार प्रसिद्ध व्याख्यात्या प्रा. स्नेहल पाठक यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा बार्शी यांनी आयोजित केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन कार्यावर (त्रिशत जन्म शताब्दीनिमित्त) मातृमंदिर सभागृह बार्शी येथे बोलताना व्यक्त केले.

अध्यक्षस्थानी भारतीय सीताफळ संशोधन महासंघाचे अध्यक्ष नवनाथ कसपटे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.अशोक कदम, प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे, नेत्रतज्ज्ञ डॉ. स्नेहा मुरादे (खामकर) मसाप बार्शी शाखेचे अध्यक्ष पां. न. निपाणीकर व्यासपीठावर उपस्थित होते.



पुढे बोलताना प्रा. पाठक म्हणाल्या की, चौंडी येथे शिंदे पाटील घराण्यात जन्मलेली अहिल्या वयाच्या नवव्या वर्षी होळकर राज घराण्याची सून होती. पराक्रमी सासरे मल्हारराव होळकर यांचे मार्गदर्शनाखाली युद्ध व राज्य शिक्षण घेते आणि राज्य कारभारास मदत करते पण अहिल्यादेवी वर पुढे एका मागून एक संकटाची मालिका येते. पती खंडेराव यांचे मनस्ताप देणारे उपद्व्याप, चुकीचे निर्णय, इंग्रज, पेशवे यांचेशी म ुकाबला करत करत अहिल्यादेवी धाडसाने माळवा प्रांताची, होळकर घराण्याची राजगादी सांभाळण्यास सासरे मल्हारराव होळकर यांना निष्ठेने मदत करतात. पुण्यश्लोक आहिल्यादेवी प्रतिव्रता, धर्मशील, प्रजाहितदक्ष आणि न्यायनिष्ठ होत्या. पती खंडेरावांचे अकाली निधन झाल्यानंतर त्यांचे नऊ सवती बरोबर त्याही सती जाण्यास निघाल्या परंतु मल्हारराव यांनी महतप्रयासने त्यांना सती जाण्यापासून रोखले. पुढे अहिल्यादेवीने साध्वी वृत्तीने पण शूर बाण्याने होळकर घराण्याची गादी शौर्याने सांभाळली. सासरे, सासू व राज घराण्यातील अनेक स्वकीयांचे निधनांचे दुःख जड अंतःकरणाने पचवून राज्यकारभार केला. कन्या मुक्ताबाई हिचा विवाह करताना त्यांनी अशी अट घातली की, जो कोणी तरुण भिल्ल, गौंड आधी लोकांच्या उपद्रवापासून जनतेस मुक्त होण्यास मदत करेल. त्याच्याशी मी मुक्ताचा विवाह करुन देईन. ही कामगिरी यशवंतराव फणसे नावाच्या तरुणाने केली म्हणून राज घराण्यातील मुक्ताचा विवाह एका सामान्य तरुणांशी लावून दिला. अहिल्यादेवी राजगादीवर बसल्यानंतर नाते, स्वकीय हे न पाहता फक्त न्याय आणि प्रजेचे हित पाहत व निर्णय करीत असत. त्यांचे वैयक्तिक खासगी खजिन्यामधून अनेक मंदिरे, धर्मशाळा, नद्यांना घाट, अन्नछत्रे आणि शेती व पर्यावरण रक्षणाच्या योजना राबविल्या. सती प्रथा बंद केली. अध्यक्षीय भाषण नवनाथ कसपटे यांनी केले. प्रस्ताविक बी. आर. देशमुख यांनी तर प्रसंगोचित मनोगत प्राचार्य डॉ. अशोक कदम व डॉ. स्नेहा मुरादे यांनी वक्त केले. सूत्रसंचालन शिल्पा मठपती यांनी तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. रविराज फुरडे यांनी केले. म. सा. प. शाखा बार्शीचे अध्यक्ष पां. न. निपाणीकर यांनी मार्गदर्शन केले. हे सुंदर व उदबोधक व्याख्यान यशस्वी करण्यासाठी प्रकाश गव्हाणे, दिलीप कल्याणी, आबासाहेब घावटे, प्रा. कल्याण घळके, शिल्पा मठपती, शारदा पाणगांवकर, प्रा. प्रमिला देशमुख, गिरीष सोनार, प्रदीप गव्हाणे, दत्तात्रय लेंगर, प्रकाश म हामुनी यांनी परिश्रम घेतले.




# युवा शेतकरी पुरस्काराने वैशाली घुगे सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २० मे-**

सामाजिक कार्यकर्त्या,तथा स्वयं शिक्षण प्रयोग या संस्थेत सेंद्रिय शेती, शेतकरी विभाग प्रमुख वैशाली घुगे यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ यांचा युवा प्रगतिशील शेतकरी -२०२५ हा मानाचा पुरस्कार मिळाला असून नुकताच परभणी येथे समारंभ पूर्वक मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात आला.

सेंद्रिय शेती काळाची गरज या विषयावर त्यांनी मोठ्या प्रमाणात जनजागृती केली असून एक युवा महिला शेतकरी म्हणून त्यांचे कार्य अणदूर व परिसरात फार मोठे आहे. त्याचाच आधार घेऊन, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने त्यांना हा पुरस्कार दिला, नुकत्याच झालेल्या परभणी येथे झालेल्या खरीप पीक परिसंवाद व कृषी प्रदर्शन कार्यक्रम ात राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. यावेळी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ कुलगुरू प्रा डॉ इंद्र मणी यांची उपस्थिती होती.



# वटवृक्ष मंदिरामुळे स्वामी समर्थांची कीर्ती सर्वदूर : न्यायमूर्ती सूर्यवंशी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २० मे-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानामुळे व स्वामी समर्थांच्या जागृत वास्तव्यामुळे अनेक भाविकांना स्वामींच्या कार्याची प्रचिती येत आहे. येथील वटवृक्ष मंदिरातील उत्कृष्ट व्यवस्थापन, नियोजनबद्ध दर्शनसेवा, विनम्रभावे आदरातिथ्य या सर्व आध्यात्मिक पैलुंमुळे अक्कलकोट हे आजमितीस सर्वोच्च स्थानावर आहे. या निमित्ताने श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानम ुळे स्वामी समर्थांची कीर्ती सर्व दूर पसरली असल्याचे मनोगत मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन त्यांनी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी न्यायमूर्ती सूर्यवंशी यांचा सपत्निक श्री स्वामी सम र्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सत्कार केला.

स्वामी सेवेने इंगळे कुटुंबीय धन्य असल्याचे सांगून पुन्हा पुन्हा स्वामिंनी आपल्याला दर्शनास बोलवावे असे मनोगतही न्यायमूर्ती सूर्यवंशी याप्रसंगी व्यक्त केले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, दर्शन घाटगे, तुषार मोरे, धनराज स्वामी, संतोष जमगे, महेश काटकर, श्रीकांत मलवे, विपुल जाधव आदींसह भक्त उपस्थित होते.



### अक्कलकोट परिसरात अवकाळी

**अक्कलकोट, दि. २० मे**

अक्कलकोट शहर व परिसरात मंगळवारी दुपारी दोनच्या सुमारास वादळी वारा मेघ गर्जना ढगाचा गडगडाट विजेचा कडकडाट सह अवकाळी पावसाची दमदार हजेरी लागली.

मंगळवारी सकाळपासून उकाडा जाणवत हो होता उकाडयामुळे अंगतून पाण्याच्या धारा पडत होत्या उकाड्याचे पर्यवसन पावसात झालेच. दुपारी २ सुमारास ढगांचा गडगगट वादळी वारा विजेचा गडगडाटसह जोरदार पाऊसास सुरवात झाली. शहरातील रस्त्यावरून सखल भागात पाणी वाहत असल्याचे दिसून आले सुमारे अर्धातास हा पाऊस झाला. बोरी उमरग, राम पूर, इटगे, उडगी, बासलेगाव, नागनाळी, निमगाव, सांगवी, कोळी बेट, हसापूर, काळेगाव, कडबगाव स्टेशन, बॅगेळी, कोन्हाळी, हसापूर आदी परिसरात हा पाऊस झाला.



# बचेरीच्या यात्रेची जंगी कुस्त्यांनी सांगता

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २० मे-**

माळशिरस तालुक्यातील बचेरी येथील महालक्ष्मी देवीची यात्रा १५ ते १७ मे दरम्यान विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. १५ मे रोजी सकाळी ७.३० मिनीटांनी दंडवताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला यामध्ये जवळपास १ हजार महीला व पुरुषांनी सहभाग नोंदवला. दुपारी तीन वाजता जंगी कुस्त्याचे मैदान होऊन यात्रेची सांगता झाली.

यावेळी महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, माजी आमदार रामभाऊ सातपुते, पै. दत्ता मगर, शिवराज पुकळे उपस्थित होते. या कुस्ती मैदानास म ाजी आमदार सातपुते यांनी ५१ हजार, जीवन जानकर २१ हजार, हरी गोरड २१ हजार, माऊली काटे १० हजार तसेच दत्तात्रय ढवळे १ हजार १११ रुपयांची मदत केली. दि.१६ मे रोजी गझीढोल कार्यकमाचे आयोजन करण्यात आले. रात्री मनोरंजन कार्यक्रम पार पडले. यावेळी सरपंच राणी गोरड, उपसरपंच जयवंत भिसे, सदाशिव शिंदे, दत्तात्रय ढवळे, लक्ष्मण गोरड, दामोदर गोरड,माऊली काटे, सागर शिंदे यांच्या हस्ते श्रीफळ वाढविणयात आले. कार्यक्रमास खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, जिवन जानकर उपस्थित होते. तर १७ मे रोजी रात्री महालक्ष्मी देवीचा छबीना मिरवणूक पार पडली. यात्रा यशस्वी करण्यासाठी नारायण शिंदे, अधिकराव माने, म ाऊली काटे, सदाशिव शिंदे, दत्तुपंत ढवळे, शयामराव माने, माणीक काटे, संभाजी शिकारे, मच्छिंद्र थिटे, विश्वजित गोरड, सुदाम शिंदे, शंकर शिंदे, अण्णा शिकारे, जयवंत भिसे, दशरथ ढवळे,विकास पिसे, राम गोरड, बिराभाई शिंदे, सुहास पाटील, तानाजी खरात, सोमनाथ गाढवे, खंडु माने, शिवाजी सावळजकर, बंटी गाढवे, सागर वाघमारे, हैबत शिंदे, अभिजीत शिकारे यांनी परिश्रम घेतले.

# भारतीय सेनेच्या सन्मानार्थ करमाळा येथे तिरंगा रॅली

**भारतीय सेनेच्या सन्मानार्थ करमाळा येथे तिरंगा रॅली**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २० मे-**

जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे धर्म विचारून आतंकवाद्यांनी भारतीय नागरिकांना गोळ्या घालून ठार केले. यावर भारत सरकारने लष्कराला आदेश देऊन पाकिस्तानला धडा शिकवला. भारतीय सेनेने पहलगाम दहशतवादी हल्लयात दुर्दैवाने मृत्युमुखी पडलेल्या सर्व पीडितांना आपल्या भारतीय सशस्त्र दलाने न्याय मिळवून दिला. या ऑपरेशनदरम्यान भारतमातेच्या वीरपुत्रांनी दाखविलेल्या



शौर्य, संयम आणि बलिदानाच्या सन्म ानार्थ करमाळा शहरात 'भव्य तिरंगा यात्रा' काढण्यात आली.

आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील नवा भारत प्रसंगी दहशतवादाविरुद्ध किती कठोर, कणखर होऊ शकतो; हे 'ऑपरेशन सिंदूर' मुळे संपूर्ण जगाने पाहिले आहे.यानिमित्ताने दिसलेल्या नव्या भारताच्या लष्करी सामर्थ्या सोबतच कोट्यवधी भारतीयांची एकजूट हे 'ऑपरेशन सिंदूर'चे मोठे यश आहे हे या रॅलीतील दिसून आले.

श्री खोलेर मंदिर किल्ला विभाग येथून सुरू झालेली तिरंगा यात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे महाराजांना अभिवादन करून यात्रेचा राष्ट्रगीताने समारोप झाला. या रॅलीच्या मार्गात करम ाळा येथील नागरिकांनी रॅलीवर विविध ठिकाणी पुष्पवृष्टी केली,

यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे डॉ. श्रीराम परदेशी, भाजपा नेत्या रश्मी बागल, भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, शिवसेनेचे दिग्विजय बागल, जिल्हा उपाध्यक्ष अफसर जाधव, रामभाऊ ढाणे, करमाळा मंडल अध्यक्ष काकासाहेब सरडे, करमाळा ग्रामीण मंडल अध्यक्ष सचिन पिसाळ, माजी सैनिक हंसराज पाटील, किरण बोकण, दिपक चव्हाण, नितीन झिंजाडे, सोमनाथ घाडगे, आजिनाथ सुरवसे, संदिप काळे, विकास गायकवाड, लक्ष्मण शेंडगे, पत्रकार जयंत दळवी, दिनेश मडके, राजू सय्यद, अजिंक्य पाटील, आश्पाक जमादार, हर्षद गाडे, महिला आघाडीच्या राजश्री खाडे, संगिता नष्टे, प्रियांका गायकवाड, सागर गायकवाड, विष्णू रंदवे, भैय्या गोसावी, दत्तात्रय पोटे, नागनाथ केकान, बंडू शिंदे, प्रकाश ननवरे, मयुर देवी, सय्याजी जाधव, ईश्वर मोरे, दिगंबर राखुंडे, सचिन कानगुडे, गणेश वाळूंजकर, संतोष जम दाडे, गणेश वाशिंबेकर आदी यात्रेत सहभागी झाले होते.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## यमाई देवीला पाटील कुटुंबियांतर्फे चांदीचे छत्र अर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२० मे-**

श्री मोडनिंब (ता. माढा) येथील ग्रामदैवत श्री यमाई देवी मंदिरात श्रीमती संजीवनी दादासाहेब पाटील व कुटुंबियांच्या वतीने श्रद्धेने आणि भक्तिभावाने चांदीचे छत्र अर्पण करण्यात आले.

हा धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात, विधीवत पूजा करून पार पडला. देवीच्या चरणी अर्पण करण्यात आलेले चांदीचे छत्र हे श्रद्धेचे प्रतीक असून, यामुळे मंदिरात भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण होते.या वेळी मंदिर परिसर फुलांनी सजवण्यात आला होता. पूजन,महाआरतीचे आयोजन करण्यात आले.यावेळी या सोहळ्याला खजिनदार राजू राऊत, महेश पाटणे, निवृत्ती मराळ, संकेत पाटील, सिद्धांत पाटील, ग्रामस्थ, महिला, मंदिर समितीचे सदस्य तसेच पाटील कुटुंबातील सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महत्वाचे...



### मुळेगाव रोडवरील अमरज्योती नगरातील गुटख्याच्या गोडाऊनवर छापा

**सोलापूर, दि. २० मे-**

सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मुळेगाव रोडवरील अमर ज्योती नगरात असलेल्या प्रतिबंधित गुटख्याच्या गोडाऊनवर छापा टाकून ६ लाख ७९ हजार ६२० रुपये किंमतीचा गुटखा जप्त केला. या कारवाईत पोलिसांनी एकास अटक केली असून याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साजिद कय्युम नदाफ (वय २४, रा. घर नं. ३४८, उत्तर कसबा, पंजाब तालीमजवळ, सोलापूर) असे पोलिसांनी अटक केलेल्याचे नाव आहे. शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी हैदराबाद रोडवरील मुळेगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या अमर ज्योती नगरातील एका पत्रा शेडमध्ये अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसह छापा टाकला. या पत्राशेडमध्ये पोलिसांना महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा व सुगंधी तंबाखू साठवून ठेवल्याचे दिसून आले. याठिकाणाहून पोलिसांनी साजिद नदाफ यास ताब्यात घेतले. या पत्राशेडमधून पोलिसांनी विविध कंपन्यांचे लेबल असलेल्या गुटख्यांची पाकिटे व सुगंधी तंबाखूची पोती असा सुमारे ७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून साजिद नदाफ यास अटक करण्यात आली आहे. ही कारवाई प्रभारी पोलिस आयुक्त अजित बोऱ्हाडे, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड, अमंलदार नंदराम गायकवाड, वाजीद पटेल, संजय साळुंखे यांनी केली.

> **७ लाखांचा गुटखा जप्त; एकास अटक**
> **शहर गुन्हे शाखेची कारवाई**

### रिक्षाला ट्रॅक्टरची धडक; महिला जखमी

**सोलापूर, दि. २० मे -**


जूना पूना नाका ते मार्केट यार्ड रस्त्यावरील शिवदासमय मंगल कार्यालयजवळ रिक्षाला ट्रॅक्टरचालकाने धडक दिल्याने महिला जखमी झाली. पार्वती गजानन घोडके असे जखमी महिलेचे नाव आहे. याबाबत गजानन रूपसेन घोडके (वय ५१, रा. वळसंग, ता. दक्षिण सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन गणेश सुरेश काकडे (वय ३६, रा. मुळेगाव, ता. दक्षिण सोलापूर) याच्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ एप्रिल रोजी गजानन घोडके यांची पत्नी पार्वती या शिवदासमय मंगल कार्यालय येथे कार्यक्रमासाठी स्वयंपाक करण्यासाठी गेल्या होत्या. तेथील काम संपवून गावी जाण्यासाठी एमएच १३ सीटी ८५२६ क्रमांकाच्या रिक्षातून शांती चौकाकडे येत होत्या. त्यावेळी गणेश काकडे याने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टरने समोरून रिक्षाला धडक दिली. यामध्ये रिक्षामध्ये बसलेल्या पार्वती घोडके यांच्या हातास गंभीर दुखापत झाली होती. म्हणून याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार वाघमारे पुढील तपास करीत आहेत.




### इनोव्हा कारच्या धडकेने बुलेटस्वार जखमी

**सोलापूर, दि. २० मे -**

इनोव्हा कारच्या धडकेने बुलेटस्वार जखमी झाला. ही घटना पुणे रोडवरील नवीन जकात नाक्याजवळ १६ मे रोजी रात्री ११ च्या सुमारास घडली. विनोद रमेश पाटील (रा. केगाव) असे जखमीचे नाव आहे. याबाबत विश्वनाथ बाळू पाटील (वय २८, रा. केगाव, ता. उत्तर सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इनोव्हा कार क्र. एमएच २४ एएफ ३९२६ च्या चालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ मे रात्री ११ च्या सुमारास विनोद पाटील हे एमएच १३ डीसी १२१० क्रमांकाच्या बुलेटवरून नवीन जकात नाक्याकडून सर्व्हिस रोडने केगावकडे जात होते. त्यावेळी एमएच २४ एएफ ३९२६ क्रमांकाच्या इनोव्हा कारचालकाने कार भरधाव व निष्काळजीपणे चालवून पाटील यांच्या बुलेटला जोरदार धडक दिली. यामध्ये पाटील यांच्या डोक्याला, हाताला, पायाला गंभीर इजा झाली आहे. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.



### एसटी स्टॅन्डवर महिलेच्या गळ्यातील १८ हजारांचे दागिने लंपास

**सोलापूर, दि.२० मे-**

एस टी स्टॅन्डवर गर्दीचा फायदा घेत चोरट्याने महिलेच्या गळ्यातील १८ हजार रुपये किंमतीचे दागिने चोरले. याबाबत आशा ज्ञानेश्वर जाजनूरे (वय ४०, रा. अणदूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) या महिलेच्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ मे रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास सोलापूर एस टी स्टॅन्डमध्ये आशा जाजनूरे या अणदूर येथे जाण्यासाठी फलाट क्र. १ येथे लागलेल्या सोलापूर ते हैद्राबाद या एस टी बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने आशा जाजनूरे यांच्या गळ्यातील १८ हजारांचे मंगळसूत्र चोरून नेले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार कटारे पुढील तपास करीत आहेत.

# श्री पांडुरंगाच्या पालखी सोहळ्याचे मुक्ताईनगरला प्रस्थान

### संत मुक्ताबाईंच्या ७२८ व्या अंतर्धान समाधी सोहळ्यास राहणार उपस्थित

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० मे-**

टाळ, मृदुंगाचा गजर व हरीनामाचा जयघोष करीत श्री संत मुक्ताबाईंच्या ७२८ व्या अंतर्धान समाधी सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी श्री अनंतकोटी ब्रह्मांडनायक श्री पांडुरंगराय पादुका पालखी सोहळ्याने मंगळवारी (दि.२० मे) सकाळी ७ वाजता श्री क्षेत्र मुक्ताईनगरकडे प्रस्थान ठेवले. पहिल्या मुक्कामासाठी सायंकाळी हा सोहळा छत्रपती संभाजीनगर येथे मुक्कामी विसावला.

श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने मंगळवारी सकाळी ६ वाजता व्यवस्थापक मनोज क्षोत्री यांच्या हस्ते श्री विठ्ठल पादुकांची विधीवत प्रस्थान पूजा करण्यात आली. आरतीनंतर श्री संत मुक्ताई अंतर्धान समाधी सोहळ्यासाठी श्री पंढरीनाथ परमात्मा पांडुरंग यांच्या पादुकांचे मुक्ताईनगर कडे प्रस्थान झाले. यावेळी नित्योपचार विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे , श्री संत मुक्ताई संस्थांचे विश्वस्त पंजाबराव पाटील, संदीप पाटील, संग्राम पाटील , मुक्ताई पालखी सोहळा प्रमुख ह भ प रवींद्र महाराज हरणे, भागवत धर्म प्रसारक अध्यक्ष सूर्यकांत भिसे, ज्ञानेश्वर हरणे आदी उपस्थित होते. पांडुरंगाच्या पादुका विठ्ठल मंदिरातून मुख्य मंडपात आणण्यात आल्या. विश्वस्त व्यवस्थापक मनोज क्षोत्री यांनी या पादुका पंजाबराव पाटील यांच्याकडे सुपूर्द केल्या. या पादुका सभामंडपात ठेवण्यात आलेल्या पालखीमध्ये ठेवल्या. त्यानंतर श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्यावतीने सर्व मानकऱ्यांचा सत्कार करण्यात आला व हा सोहळा करमाळ्याकडे मार्गस्थ झाला.



**श्री पांडुरंग, संत नामदेव महाराज व संत निवृत्तीनाथांच्या भेटीचा बुधवारी सोहळा**

दरम्यान बुधवार (दि.२१) रोजी सिल्लोड, जामनेरमार्गे हा सोहळा भुसावळ मुक्कामी पोहोचेल. येथे श्री पांडुरंग, संत नामदेव महाराज व संत निवृत्तीनाथांच्या भेटीचा सोहळा होईल. पालखी सोहळ्यामध्ये १०० वारकरी सहभागी झाले आहेत.

श्री संत मुक्ताबाईंचा गुरुवार दि.२२ मे रोजी ७२८ वा अंतर्धान समाधी सोहळा आहे. या समाधी सोहळ्यासाठी प्रत्यक्ष पांडुरंग, माता रुक्मिणी, संत निवृत्तीनाथ, संत नामदेव आदि संत उपस्थित होते असे अभंगात वर्णन केले आहे. याप्रमाणे संत नामदेवांच्या पादुका घेवून नामदेव महाराजांचे वंशज गेली शेकडो वर्षे या सोहळ्यासाठी उपस्थित राहतात. नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प.गुरूवर्य केशवदास नामदास महाराज पंढरपूर यांचे येथे समाधी सोहळ्याचे किर्तनही होते.

**करमाळ्यात भव्य स्वागत**

सकाळी १०.३० वाजता पालखी सोहळा करमाळा येथे पोहोचला. येथे जैन स्थानक मध्ये पालखी सोहळ्याचे स्वागत प्रवीण कटारिया, सुधीर कटारिया , सचिन कटारिया , नितीन घोलप, यशवंत गाणबोटे, रितेश कटारिया, सुशील कटारिया, संजय शिंदे आदिंनी केले. वारकर्यांनी येथे सकाळची न्याहरी केली व सकाळी ११.३० वाजता हा सोहळा अहिल्यानगरकडे मार्गस्थ झाला.

**अहिल्यानगरमध्ये उत्साही स्वागत**

श्री पांडुरंगाचा पालखी सोहळा अहिल्यानगर येथील दिल्ली गेटजवळ पोहोचल्यानंतर मोठ्या उत्साहात सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. तेथून भव्य दिंडी मिरवणूक काढण्यात आली. दुपारी हा सोहळा अहिल्यानगर येथील श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरात पोहोचला. येथे सिद्धेश्वर महादेव देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप पांढरे, धनंजय जाधव, राजेंद्र जाधव, राहुल पांढरे, शिवदत्त पांढरे व असंख्य विठ्ठल भक्तांनी सोहळ्याचे स्वागत केले. येथे दुपारचा नैवेद्य व वारकर्यांना भोजन देण्यात आले. विश्रांतीनंतर सोहळा छत्रपती संभाजीनगर कडे मार्गस्थ झाला.

**संभाजीनगरात सोहळ्याचे भक्तीमय वातावरणात स्वागत**

सायंकाळी श्री पांडुरंग पादुका पालखी सोहळ्याचे छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये आगमन झाल्यानंतर सोहळ्याचे मोठ्या उत्साही व भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले. गारखेडा येथील श्री गजानन महाराज संस्थानच्या संत गजानन महाराज मंदिरात पालखी सोहळा पोहोचल्यानंतर संस्थानसह भाविकांनी सोहळ्याचे स्वागत केले. कीर्तन व समाज आरतीनंतर वारकर्यांना अन्नदान करण्यात आले. रात्रौ. किर्तनाची सेवा झाल्यानंतर सोहळा येथे विसावला.

## समर्थांची कृपासावली हे जीवनातील सर्वात मोठे भाग्य : मानसी नाईक

### स्वामी दर्शनानंतर अभिनेत्री मानसी नाईक यांचे मनोगत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० मे-**

ब्रम्हांडनायक दत्त अवतारी श्री स्वामी समर्थांची कृपासावली हेच आमच्या कुटुंबीयांच्या जीवनाचे सर्वात मोठे भाग्य असल्याचे मनोगत हिंदी व मराठी चित्रपटातील सुप्रसिद्ध मराठमोळी अभिनेत्री मानसी नाईक यांनी व्यक्त केले.

येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास त्यांनी नुकतीच भेट देवून श्री.स्वामी समर्थाचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांनी अभिनेत्री मानसी नाईक यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. यावेळी अभिनेत्री मानसी नाईक बोलत होत्या. पुढे बोलताना मानसी नाईक यांनी मी काम केलेल्या हिंदी व मराठी चित्रपटांना व मालिकांना व माझ्या भूमिकेला माझ्या बांधव भगिनींनी भरघोस प्रतिसाद देत असल्याचे पाहून मन गहिवरले आहे. ज्यामुळे दर्शनप्रित्यर्थ आज येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास भेट देवून श्री.स्वामी समर्थांचे दर्शन घेतले असल्याचे सांगून श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरकृत महेश इंगळे यांच्या स्वामी भक्ती प्रचार-प्रसार कार्य वाढीस प्रोत्सहान देण्यासाठी आपण कटीबध्द असल्याचे मनोगतही व्यक्त केले. यावेळी प्रथमेश इंगळे, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, प्रविण देशमुख, विश्वस्त महेश गोगी, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, स्वामीनाथ लोणारी, प्रसाद पाटील, शिवशरण अचलेर व अन्य उपस्थित होते.



## सांगोल्यात भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाची मोहीम

**भा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२० मे-**

सांगोला शहरातील भटक्या कुत्र्यांबाबत सांगोला नगरपरिषदेस जेष्ठ नागरीक संघामार्फत तक्रार प्राप्त झाली होती. शहरात भटक्या कुत्र्यांमुळे लहान मुले, वयोवृध्द नागरीक यांना त्रास होत असुन त्यांचा बंदोबस्त करावा तसेच भटक्या कुत्र्यांमुळे अपघात घडत असले बाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने सांगोला नगरपरिषदेने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी त्यांची निर्बीजीकरण करण्याची मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. सदर मोहिमेची तिसरी फेरी सुरु केली आहे अशी माहिती सांगोला नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी दिली.

यापुर्वी डिसेंबर-२०२३ व जुन-२०२४ या कालावधीत भटक्या कुत्र्यांना पकडुन निर्बीजीकरण करण्यात आलेले आहेत. सदर मोहिमेअंतर्गत शहरातील भटक्या कुत्र्यांना पकडुन निर्बीजीकरण शस्त्रक्रीया करणेपुर्वी तीन दिवस आधी व शस्त्रक्रीया झाल्यानंतर तीन दिवस पशुवैद्यकीय तज्ञांच्या देखरेखेखाली ठेवण्यात येते व त्यानंतर त्यांना रेबीज लस दिली जाते. सदर कालावधीमध्ये पकडलेल्या श्वानांना खानपान, औषधोपचार यांची व्यवस्था केली जाते. तसेच ज्या भागातुन त्यांना पकडण्यात आलेले असते त्या भागात त्यांना परत सोडण्यात येते. याकामी सांगोला नगरपरिषदेस पशुधन विकास अधिकारी डॉ. अस्लम सय्यद यांचेमार्फत वेळोवेळी तपासणी व मार्गदर्शन केले जाते.




> शहरातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या भागातील भटक्या कुत्र्यांबाबत काही तक्रार असल्यास सांगोला नगरपरिषदेतील आरोग्य विभागाकडे संपर्क करावा. तसेच शहरातील प्राणीमित्रांनी सदर ठिकाणी भेट द्यावी व याविषयी काही सुचना असल्यास नगरपरिषदेस कळविण्यात याव्यात.
> **- डॉ. सुधीर गवळी, मुख्याधिकारी, सांगोला न.प.**

# करकंब येथे जलतारा प्रकल्पास सुरूवात

### विकसीत गाव अभियानांतर्गत उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२० मे-**

ग्रामीण पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून विकसित गाव अभियानाअंतर्गत सुरु केलेल्या जलतारा प्रकल्पाचा फायदा शेतकऱ्यांना होणार असून पावसाळ्यातील पाणी घेतलेल्या खड्यात साचून व नंतर मुरल्यामुळे पाण्याची धारण क्षमता आपोआप वाढली जाईल तसेच जमीनीत वापसा रहाण्यास मोठी मदत होणार असल्याचे मनोगत निवृत्त पोलिस अधिकारी व सेवक मिशन विकसित गाव अभियानाचे समन्वयक नानासाहेब कदम यांनी व्यक्त केले.

रोटरी क्लब ऑफ करकंब व करकंब पोलीस स्टेशनच्यावतीने जलतारा प्रकल्पाचा शुभारंभ एस.आर.बार्डी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी करकंब येथे करण्यात आला. यावेळी करकंब रोटरीचे अध्यक्ष डॉ.अक्षय मोरे, प्रोजेक्ट हेड रो.रघुनाथ जाधव,करकंब पोलीस स्टेशनचे सपोनि सागर कुंजीर, पोलीस पाटील संघटना अध्यक्ष ॲड. नानासाहेब शिंदे, डॉ. प्रशांतकुमार मोरे, चेअरमन राजाभाऊ पाटील, सेवानिवृत्त पोलिस किसान सह.संस्थेचे व्हा.चेअरमन अनिल कदम, रो.धनंजय इदाते, सुनील दुधाणे, धनंजय गुळमे, आदित्य गुळमे उपस्थित होते. प्रास्तविक करकंब रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ.अक्षय मोरे यांनी केले.

यात सोलापूर, बुलढाणा, लातूर, धाराशिव, सांगली या जिल्ह्यांचा समावेश होतो. राज्यातील ८२ टक्के सिंचनक्षेत्र हे भूजलावर अवलंबून आहे. याचा भूजलसाठ्यावर ताण पडत आहे. पाणी जिरवले नाही तर उपसा करू शकणार नाही. त्यामुळे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मिशन विकसित गाव अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या जलतारा प्रकल्पाचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. असे मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन लक्ष्मण जाधव यांनी केले तर आभार रो. रघुनाथ जाधव यांनी मानले.



> पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी मोबाइलद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन करुन करकंब येथे सुरू केलेल्या जलतारा प्रकल्पाच्या कामाविषयी अभिनंदन करुन हे अभियान यशस्वी करुयात असे आवाहन केले. करकंब रोटरी क्लब व करकंब पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांना धन्यवाद दिले.

> डॉ.आदित्य गुळमे यांनी आंबा, मिरची, केळी यांची परदेशी निर्यात कशी केली जाते याबाबत माहिती देऊन भविष्यात मिशन विकसित गाव अभियान यासाठी सेवा देऊ असे आश्वासित केले.

> पोलीस अधीक्षकांच्या संकल्पनेतून सुरु करण्यात आलेला हा प्रकल्प सर्व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करुन मोठ्या प्रमाणात राबविण्यात येईल. त्यासाठी सर्वांचे सहकार्य हवे.
> **- सागर कुंजीर, सपोनि करकंब**

> जलतारा प्रकल्प अभियान करकंब येथे सुरू केल्याने सोलापूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांचे आभार.रोटरी क्लब,करकंब पोलीस स्टेशनचे कर्मचारी व शेतकरी यांच्या माध्यमातून ही चळवळ गतिमान करण्याचा नक्की प्रयत्न केला जाईल. प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतात जिथे जिथे गरज आहे त्याठिकाणी खड्डे घेऊन (६ बाय ४ फूट) पाणी मुरवल्यास शेतातील विहीरी, बोअर यांना नक्कीच फायदा होईल.